मराठी अस्मितेचा आवाज बुलंद करण्याचे कार्य गेली २७ वर्षे करणारे 'दैनिक वृत्तमानस' आता घरोघरी पोचवण्याचे काम आम्ही करणार आहोत. वाचकांना आमच्या लोकप्रिय दैनिकाची प्रत उपलब्ध होत नसेल तर या दूरध्वनींवर संपर्क साधावा.
**दातार अँड सन्स न्युज पेपर डिस्ट्रिब्युटर्स**
भ्रमणध्वनी - ८६५५१९४४५२, ८५९१६६२६१६,९८६७३०८०६३

मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.
https://epapervrittamanas. in/

# वृत्तमानस

Email : vrittamanas1@gmail. com
मुंबई/ पालघर | मुंबई, बुधवार, १४ ऑगस्ट २०२४ | वर्ष- २९ | अंक - ५५ | पाने- ८ | आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६ | किंमत : ३ रुपये



सुप्रीम कोर्टात पतंजलीवरील अवमानाचा खटला बंद पान 8

## म ह त्वा चे

### अनुराधा पौडवालांना गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार



**मुंबई :** सांस्कृतिक कार्य विभागामार्फत प्रदान करण्यात येणारे विविध पुरस्कार जाहीर काल करण्यात आले. सन २०२४ चा गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार ज्येष्ठ गायिका अनुराधा पौडवाल यांना जाहीर झाला आहे. यासोबतच, नटवर्य प्रभाकर पणशीकर रंगभूमी जीवनगौरव पुरस्कार, संगीताचार्य अण्णासाहेब किर्लोस्कर संगीत रंगभूमी जीवन गौरव पुरस्कार, भारतरत्न पंडित भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत बारा राज्य सांस्कृतिक पुरस्कारांचीही घोषणा सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केली आहे.

### पवारांनी मराठ्यांचे वाटोळे केले -जरांगे

**शिर्डी** : शरद पवारांनी मराठा समाजाचे आजवर वाटोळे केले. त्यांनी सुचवलेला पन्नास टक्क्यांवरील आरक्षणाच्या मार्गाशी आमचा संबंध नाही. तो त्यांनीच कसा देता येईल याबद्दल स्पष्ट करावे, अशा शब्दांत मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांनी आज ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्यावर टीकास्त्र सोडले.

**सविस्तर पान 6 वर**

# सुप्रिया सुळेंविरोधात सुनेत्रांना उभे करणे, ही आमची चूक!

## अजित पवारांची मोठी कबुली

**प्रतिनिधी**
**मुंबई**

बारामती लोकसभा निवडणुकीत सुप्रिया सुळे यांच्याविरोधात सुनेत्रा पवारांना उमेदवारी देऊन आम्ही मोठी चूक केली, अशी स्पष्ट कबुली राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांनी मंगळवारी दिली. राजकारण हे पार घरामध्ये शिरू द्यायचे नसते. पण त्या बाबतीत माझ्याकडून काहीशी चूक झाली, असे ते म्हणालेत. त्यांच्या या कबुलीनंतर महाराष्ट्रातील राजकारण पुन्हा कूस बदलते की काय? अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

बारामती लोकसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाने सुप्रिया सुळे यांना उमेदवारी दिली होती. त्यांना अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने सुनेत्रा पवार यांच्या माध्यमातून आव्हान दिले होते. सुनेत्रा या अजित पवार यांच्या पत्नी होत्या. त्यामुळे नणंद भावजयीमधील या सामन्याकडे अवघ्या राज्याचे लक्ष लागले होते. त्यात सुप्रिया यांनी सुनेत्रा पवारांचा दारुण पराभव केला होता. या पार्श्वभूमीवर अजित पवार यांनी सुप्रिया सुळेंविरोधात सुनेत्रा पवारांना उमेदवारी देऊन आपण मोठी चूक केल्याचे विधान केले आहे.

अजित पवार एका मराठी वृत्तवाहिनीशी बोलताना म्हणाले की, लोकसभा निवडणुकीत माझ्याकडून एक चूक झाली. बारामती लोकसभा मतदारसंघात माझ्या बहिणीविरोधात सुनेत्राला उभे करण्याची काहीच गरज नव्हती. पण तसे केले गेले. पक्षाच्या संसदीय मंडळाने तो निर्णय घेतला होता. त्यामुळे एकदा बाण सुटला की आपण काहीच करू शकत नाही. **पान 8 वर**



### राखी बांधण्यास जाण्याचेही संकेत

*भावा-बहिणीच्या पवित्र नात्याचा रक्षाबंधणाचा सण अवघ्या काही दिवसांवर आला आहे. त्यातच अजित पवार यांनी सुप्रियांना बारामतीत आव्हान देण्याची गरजच नव्हती असे विधान करून राज्याच्या राजकारणात खळबळ उडवून दिली आहे. यावेळी अजित पवार यांना तुम्ही रक्षाबंधनाच्या निमित्ताने सुप्रिया सुळे यांना भेटण्यासाठी जाणार का? असा प्रश्न केला असता त्यांनी सकारात्मक उत्तर दिले. सध्या माझा महाराष्ट्र दौरा सुरू आहे. रक्षाबंधनाच्या वेळी मी तिकडे असेन, तर मी राखी बांधून घेण्यासाठी निश्चितच माझ्या बहिणींकडे जाईन, असे ते म्हणाले.*



# आपल्यावर लाथा झाडणाऱ्या महाराष्ट्रद्वेष्ट्यांच्या तंगड्या पकडून खेचा

## मार्मिकच्या वर्धापनदिनानिमित्त उद्धव ठाकरे कडाडले

**प्रतिनिधी**
**मुंबई**

मुंबईत मंगळवारी मार्मिकच्या 64 वा वर्धापनदिन साजरा करण्यात आला. यावेळी झालेल्या कार्यक्रमात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मिंध्यांना आणि भाजपला चांगलेच फटकारे लगावले. हा फक्त एका साप्ताहिकाचा वर्धापनदिन नाही, तर एक वारसा आणि वसा यांचा वर्धापनदिन आहे. हा वसा आपल्याला पुढे न्यायचा आहे, असे उद्धव ठाकरे म्हणाले. तर महाराष्ट्रद्वेष्ट्यांच्या तंगड्या पकडून त्यांना खेचण्याची वेळ आली आहे, असेही उद्धव ठाकरे कडाडले.

अशा कार्यक्रमात बोलण्याची पंचायत असते, रंगलेल्या कार्यक्रमात व्यत्यय आल्यासारखे वाटते. आता बोलताना मार्मिकचे कार्यकारी संपादक मुकेश माचकर यांनी मार्मिकचे वय सांगितले. तेव्हा माझे सांगायची गरज नव्हती. सांगितले तरी हरकत नाही. शिवसेनाप्रमुखांचा पुत्र असल्याने त्यांच्याकडूनच काही धडे गिरवले आहे. शिवसेनाप्रमुख नेहमी म्हणायचे वय प्रत्येकाचे वाढत पण माणूस मनाने जो थकतो, तेव्हा तो वयस्कर होतो. मार्मिक 64 वर्षांचे झाले तरी आजही ताजातवाना आणि तरुण आहे. आतापर्यंतची सगळी व्यंगचित्रे आणि मुखपृष्ठ समोर आल्यानंतर तो काळ समोर उभा राहतो. याबाबतच्या आठवणी सांगण्यासाठी मार्मिकचा प्रवास असा कार्यक्रम ठेवावा लागेल, असेही ते म्हणाले.

# राज्यातील नगराध्यक्षांचा कालावधी 5 वर्षे

**मुंबई।** विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत अनेक निर्णय घेण्यात आले आहेत. राज्यात एकूण २८८ नगरपरिषदा आणि नगरपंचायत आहेत. निवडून आलेल्या नगरसेवकांच्या पाच वर्षांच्या कालावधीपैकी अडीच अडीच वर्षे दोन अध्यक्ष निवडले जातात. त्यानुसार, दुसऱ्या टर्ममधील नगराध्यक्षांची निवड काही दिवसांवर येऊन ठेपलेली असताना नगराध्यक्षांचा कालावधी अडीच वर्षांवरून पाच वर्षे करण्यात आला आहे. त्यातच काही नगरपालिकांमध्ये प्रशासन राजवट लागू असून तेथील निवडणुका लागणे बाकी आहे. यामुळे आता राजकीय वातावरण पेटण्याची शक्यता आहे. **संबंधित वृत्त पान 3 वर**

## केरळ राज्यात 31 ऑगस्टला होणाऱ्या

# भाजप-संघाच्या बैठकीत ठरणार राष्ट्रीय अध्यक्ष ?

**सुनील ओसवाल**
**मुंबई**



लोकसभा निवडणुकीनंतर भाजप आणि संघाची पहिली बैठक केरळ राज्यात होणार आहे. यात भाजपचा राष्टीय अध्यक्ष कोण होणार याचा निर्णय होणार असल्याचे संकेत मिळत आहेत. भाजपचा अध्यक्ष हा संघाचा कट्टर समर्थक असेल यावर संघाचा कटाक्ष राहणार असल्याचे सांगण्यात येते.

राज्यातील विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने भाजपने संघापुढे शरणागती पत्करण्याची तयारी सुरू केल्याचे वृत्त आहे.

लोकसभा निवडणुकीनंतर भाजप आणि संघाची पहिली बैठक ३१ ऑगस्ट रोजी केरळ राज्यात होणार आहे. या सभेच्या निमित्ताने भाजप अध्यक्ष जे पी नड्डा यांच्या वक्तव्यावरून सुरू झालेला वाद संपुष्टात येईल, असा दावा केला जात आहे. विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने भाजप संघाला शरण जाईल, असे संकेत राजकीय वर्तुळात मिळत आहेत.

केरळमधील पलक्कड येथे ३१ ऑगस्ट ते २ सप्टेंबर या कालावधीत संघाची समन्वय बैठक होणार आहे. या बैठकीत संघटना विस्तार, शाखा कार्य आणि लोकसभा निवडणुकीतील पराभवावरही चर्चा होणार असल्याचे सांगण्यात येत आहे. या बैठकीला सरसंघचालक मोहन भागवत, सरचिटणीस दत्तात्रेय होसाबळे, प्रसिद्धी प्रमुख सुनील आंबेकर आणि राष्ट्रीय कार्यकारिणीचे सदस्य आणि परिवारातील सर्व संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार असल्याचे सांगण्यात येत आहे. लोकसभा निवडणुकीदरम्यान भाजप अध्यक्ष जे पी नड्डा यांच्या वक्तव्यावरून सुरू झालेला वाद 31 ऑगस्टच्या या सभेच्या निमित्ताने संपुष्टात येईल, असा दावा केला जात आहे.

भाजप आणि संघ यांच्यात दर सहा महिन्यांनी समन्वय बैठक होत असली तरी ही बैठक अत्यंत महत्त्वाची आहे. या बैठकीनंतर देशातील तीन प्रमुख राज्यांमध्ये विधानसभा निवडणुका होणार आहेत. यामध्ये महाराष्ट्रासह हरियाणा आणि झारखंडचाही समावेश आहे.

या बैठकीत जे पी नड्डा यांना भाजपच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी कायम ठेवायचे की नवा अध्यक्ष निवडायचा याबाबत निर्णय होण्याची शक्यता आहे. अर्थात, भाजपचा अध्यक्ष हा संघाचा राहील यावर संघाचा कटाक्ष राहणार असल्याचे सांगण्यात येते. लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्र आणि उत्तर प्रदेशात भाजपच्या पराभवाने संघपरिवार हादरला आहे. यंदा भाजपला संघाकडून शेवटच्या क्षणी निवडणुकीचे नियोजन मिळाले नाही, त्यामुळे नुकसान सहन करावे लागले असे काहींचे म्हणणे आहे.



*पालघर : शिवसेना ग्राहक संरक्षण कक्षा तर्फे माजी मुख्यमंत्री व शिवसेना पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त शाळेतील गरीब गरजू विद्यार्थी यांना मोफत शालेय वस्तू आणि वह्या वाटप करण्याचा कार्यक्रम दिनांक 10/8/2024 रोजी अण्णासाहेब धामणे प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळा कामण येथे आयोजित केला होता.सदरच्या कार्यक्रमास सदानंद घोसाळकर (महाराष्ट्र कक्ष कार्यकारी सदस्य), जनार्दन म्हात्रे (उपजिल्हाप्रमुख पालघर),हरिहर पाटील (तालुकाप्रमुख ग्रामीण),विवेक पाटील (जिल्हा सचिव), अँड.भरत पाटील (विधी सेना पालघर), शंकर बने ,सुरेश भोगले, सचिन परब, राम नयन कश्यप, रजनीकांत म्हात्रे, वैभव म्हात्रे, दिगंबर देवळीकर, सुनील मिश्रा, भरत पाटील, महेश विरारकर आदी उपस्थित होते.*



## थोडक्यात

### चिंचोटी येथे 50 वर्षीय इसमाचा मृत्यू

**वसई:** नायगाव पूर्व चिंचोटी येथील सर्व्हे क्रमांक 5 येथील साडी कंपनीजवळ एका 50 वर्षीय इसमाचा कोणत्यातरी अज्ञात आजाराने दिनांक 26 जून 2024 रोजी मृत्यू झाला आहे. सिद्धार्थ जोहर माजुमदार असे त्याचे नाव आहे.मात्र अजूनपर्यंत त्याचे कुणीही नातेवाईक आले नाही. त्याचे डोक्याचे केस काळे असून सुमारे दोन इंच दाढी वाढलेली आहे. तरी सदर मयत इसमाबाबत कुणाला काही माहिती असल्यास त्यांनी नायगाव पोलीस ठाण्याच्या 9561262425 या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

### लाँग वीकेंडमध्ये बाहेर जाणाऱ्या प्रवाशांसाठी 18 विशेष ट्रेन

**मुंबई:** मध्य रेल्वे प्रवांशाच्या लाँग वीकेंडची अतरिक्त गर्दी लक्षात घेऊन १८ विशेष ट्रेन सेवा चालवणार आहे. यात लोकमान्य टिळक टर्मिनस, मुंबई ते नागपूर, लोकमान्य टिळक टर्मिनस, मुंबई ते मडगाव, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई ते कोल्हापूर, पुणे ते नागपूर आणि कलबुरगि ते बेंगळुरू अशा या रेल्वे गाड्या चालवणार आहे. या गाड्या १५ ऑगस्ट पासून चलाण्यात येणार आहेत. या सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर आणि www.irctc.co.in या वेबसाइटवर विशेष शुल्कासह वरील सर्व विशेष गाड्यांचे बुकिंग आधीच सुरू आहे. या विशेष गाड्यांच्या थांब्यांच्या तपशीलवार वेळेसाठी www.enquiry.indianrail.gov.in ला भेट द्या किंवा एनटीईएस ॲप डाउनलोड करा. असे आवाहन मध्य रेल्वेने केले आहे.

### शासकीय दंत रुग्णालय झाले 'हायटेक'

**मुंबई:** मुंबईचे शासकीय दंत महाविद्यालय आणि रुग्णालय आता अधिक हायटेक झाले आहे. या रुग्णालयात सेन्सरी अँडाप्टिव्ह डेंटल एन्व्हायर्नमेंट म्हणजेच 'सेड' नावाची आधुनिक उपचार पद्धती सुरू करण्यात आली आहे. याद्वारे, मुलांच्या दातांवर आधुनिक उपचार केले जाणार आहेत. ही सुविधा देणारे हे मुंबईतील पहिले रुग्णालय ठरले आहे. दंत उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांमध्ये एक वेगळीच भीती असते. ही भीती लहान मुलांमध्ये खूप सामान्य आहे. त्यामुळे, लहान मुले दंत उपचार घेण्यास इच्छुक नसतात आणि ते उपचारांसाठी सहजासहजी तयार होत नाहीत. त्यामुळे, त्यांच्या आरोग्यावरही विपरीत परिणाम होतो. दुसरीकडे, मुलांच्या आवश्यक सहकार्याशिवाय डॉक्टरांनाही त्यांच्या उपचारात अडचणी येतात. अनेक वैज्ञानिक अभ्यासात असे आढळून आले आहे की, जर मुलांच्या सर्व संवेदनांना योग्यरीत्या शांत केले, तर ते सहकार्य करतात. यासोबतच, त्यांच्या मनातील भीतीही कमी होते. या भीतीवर मात करण्यासाठी दंत रुग्णालयातील मुलांच्या विभागात 'एसईडी' ही नवीन संकल्पना सुरू करण्यात आली.

# नालासोपाऱ्यावर शिंदे गटाचा दावा?; विधानसभेची गणितं बदलणार?

**प्रतिनिधी**
■ **वसई**

नालासोपारा मतदारसंघात नुकताच शिंदे गटाचा मेळावा पार पडला. या मेळाव्यास मुख्यमंत्री पूत्र खासदार डॉ. श्रीकांत शिंदे अनुपस्थित असल्याने प्रवक्ते व उत्तर भारतीय नेते संजय निरूपम यांनी मेळाव्यात मार्गदर्शन केले. या मेळाव्यास उत्तर भारतीय नागरिकांची मोठ्या प्रमाणात गर्दी जमली होती. त्यामुळे नालासोपारा मतदारसंघावर शिंदे गटाने दावा सांगण्याच्या दृष्टीने बाण कमानीतून सोडल्याची चर्चा सुरू आहे.

सध्या विधानसभेची गणितं बदलण्याच्या टप्प्यावर आहेत. महाराष्ट्रात लोकसभेसाठी भाजप व शिंदे गटाला सारखेच राजकीय यश मिळाले आहे. त्यामुळे आता भाजप सांगेल ती पूर्व दिशा असे वातावरण न राहता शिंदे गटानेदेखील आपल्या राजकीय अस्मितेला वाट मोकळी करून दिली आहे. नालासोपाऱ्यात झालेल्या मेळाव्यात शिंदे गट नजिकच्या काळात नालासोपाऱ्यावर दावा करू शकतो. भाजपच्या तुलनेत शिंदे गटाकडे उत्तर भारतीय चेहरे मोठे आहेत. तसेच त्यांची नाल थेट जनतेशी जोडली असल्याने या मतदारसंघावर भाजपला शिंदे गटाच्या प्रभावामुळे पाणी सोडावे लागू शकते. दरम्यान, भाजपने नालासोपाऱ्यावर पाणी सोडले तर वसई व बोईसर हे दोन महत्वाच्या विधानसभा मतदारसंघांवर भाजप दावा करू शकते. नालासोपारा मतदारसंघावर भाजप व शिंदे गट या दोघांचा सध्या तरी दावा आहे. मात्र नालासोपारा मतदारसंघावर आजतागायत बविआचे वर्चस्व राहीले आहे. यावेळेस मात्र विधानसभा निवडणुकीत बविआला विजयासाठी संघर्ष करावा लागणार आहे. भाजपची या मतदारसंघात वाढलेली ताकद तसेच उत्तर भारतीय मतदारांचे या मतदारसंघातील वाढते प्राबल्य लक्षात घेता या विधानसभा मतदारसंघात बविआला यावेळी काँटे की टक्कर असणार आहे.

दिवाळीनंतर विधानसभा निवडणूक जाहीर होणार असल्याचे संकेत मिळत असले तरी ऑक्टोबर महिन्यात आचारसंहिता लागू शकते, असे अंदाज आहेत. त्यादृष्टीने शिंदे गटाने नालासोपाऱ्यात मेळावा घेत उत्तर भारतीय मतदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न केला आहे. दरम्यान, नालासोपाऱ्यात शिवसेनेला याआधी फारसे राजकीय यश आले नसले तरी यावेळेस मात्र नालासोपाऱ्यातील बदललेली राजकीय समिकरणे पाहता नालासोपाऱ्यावरील शिंदे गट आपला दावा सोडणार नाही, असे दिसून येते.

# वसईत बांगलादेशी नागरिकांची घुसखोरी !

## पोलिसांनी सर्च ऑपरेशन राबवावे; मनसे आक्रमक

**प्रतिनिधी**
■ **वसई**

बांगलादेशातून पश्चिम बंगालमार्गे घुसखोरी करुन बनावट कागदपत्रे तयार करून भारतात वास्तव्य करणाऱ्या बांग्लादेशी नागरिकांच्या वास्तव्याचे प्रमाण आता वसई -विरारमध्येही वाढू लागले आहे. सध्या बांग्लादेशात मोठ्या प्रमाणात अस्थिरता असून तेथील नागरिक लगतच्या भारतात प्रवेश करण्याच्या इराद्याने घुसखोरी करू लागले आहेत. याबाबत आता मनसेने पोलिसांना सर्च ऑपरेशन मोहिम राबवण्याची जोरदार मागणी केली आहे.

पालघर पोलीस दलाशी वसई-विरार शहर जोडलेले असताना तेव्हा वसई विभागाचे पोलीस उपअधीक्षक डॉ.महेश पाटील यांनी वसईत मोठ्या प्रमाणात कोबिंग ऑपरेशन राबवून अनेक बांग्लादेशी नागरिकांची धरपकड केली होती. या नागरिकांवर गुन्हे दाखल करून त्यांना हद्दपार करण्यात आले होते. मात्र त्यानंतर अशा प्रकारची कोंबिग ऑपरेशन मोहीम राबवण्यात आलेली नाही. त्यामुळे वसई- विरारमध्ये बांग्लादेशी नागरिकांचा आकडा वाढल्याची शक्यता व्यक्त होत आहे.

आधीच वसई,विरारची गुन्हेगारी वाढली आहे. जनता भयभित आहे. त्यात बांग्लादेशी नागरिकांच्या वाढत्या वास्तव्यामुळे येथील गुन्हेगारीत वाढ होण्याचा धोका आहे. गेल्या काही वर्षात अनधिकृत चाळींची, बकाल झोपड्यांची संख्या वाढत चालली आहे. यात बांग्लादेशी नागरिक वास्तव्याला आले असल्याचा संशय आहे. आत्ताच्या पोलीस आयुक्तालयाने या दाट लोकवस्तीच्या परिसरात सर्च ऑपरेशन करण्याची नितांत आवश्यकता आहे, अशी मागणी मनसेने केली आहे. दरम्यान, मनसेने हा महत्वाचा मुद्दा लावून धरल्याने पोलिसांनी या मागणीचा गांभिर्याने विचार करून सर्च ऑपरेशन राबवण्याची आवश्यकता असल्याचे बोलले जात आहे.

# पालिकेच्या पाणी खात्यातील सर्व रिक्त पदे भरा - कामगार सेना

■ **मुंबई**

जल अभियंता खात्यातील 'जलद्वार नियंत्रक'(सुलुसमन) संवर्गाची सुमारे ८० तसेच कामगार संवर्गाची सर्व रिक्तपदे तात्काळ भरावीत अशी मागणी 'म्युनिसिपल कर्मचारी कामगार सेने'चे अध्यक्ष बाबा कदम व उपाध्यक्ष डॉ.संजय कांबळे- बापेरकर यांनी अतिरिक्त आयुक्त (प्रकल्प) अभिजित बांगर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.पालिकेच्या जल अभियंता खात्याच्या मुंबई शहरातील ९ विभाग कार्यालयातील पाणी खात्याचे तसेच ६ जलाशय टेकडी येथील कर्मचारी मुंबई शहरास पाणी वाटप करतात. यामध्ये कामगार व सुलुसमन पाणी सोडण्याचे काम करतात तर चावीवाला संवर्गाचे कर्मचारी नियोजनाचे काम करतात. त्यामुळे मुंबई शहरातील जनतेला योग्यप्रकारे पाणी पुरवठा व्हावा याकरिता कामगार, सुलुसमन व चाविवाला या संवर्गातील कर्मचाऱ्यांची सर्व शेड्युल्ड पदे भरणे अत्यंत आवश्यक आहे. सुलुसमन संवर्गाची सुमारे ८० पदे रिक्त असल्याने, सुलुसमन ते 'चाविवाला' अशी पदोन्नती झालेल्या कर्मचाऱ्यांना सुलुसमन पदाचेच काम करावे लागत आहे. परिणामी पदोन्नती होऊनही खालच्या पदावर काम करावे लागत असल्याने संबंधित कर्मचाऱ्यांमध्ये असंतोषाची भावना निर्माण झाली असल्याचे युनियनचे म्हणणे आहे.पाणी खात्यातील सर्व रिक्त पदे भरावीत यासाठी उपायुक्त (अभियांत्रिकी) यांच्यासोबतही संघटनेने बैठक घेतली होती.मात्र, जलद गतीने कार्यवाही न झाल्याने सुलुसमन संवर्गाची सुमारे ८० पदे तसेच कामगारांमधुन पदोन्नतीने सुलुसमन पदे भरण्यात येणार असल्याने, रिक्त होणारी व रिक्त असलेली कामगार संवर्गाची सर्व रिक्त पदे तात्काळ भरावीत अशी मागणी अतिरिक्त आयुक्तांकडे करण्यात आली आहे.



*मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, दक्षिण मुंबई जिल्हा-ओबीसी विभाग आणि अत्रे स्मारक समिती यांच्या वतीने संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील अग्रगण्य व्यक्तिमत्व आचार्य प्रल्हाद केशव अत्रे यांना त्यांच्या शतकोत्तर रौप्य महोत्सवी जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी लोकमत वृत्तपत्र समूहाचे अध्यक्ष डॉ. विजय दर्डा, रिलायन्स जिओचे उपाध्यक्ष रवींद्र आवटी, अत्रे यांचे नातू राजेंद्र पै, नातसून बिना पै, पणतू अक्षय पै, अत्रे समितीच्या अध्यक्षा आरती सदावर्ते, माजी नगरसेवक अरविंद भोसले, सामाजिक कार्यकर्ते मोहन म्हामुनकर व ओबीसी जिल्हाध्यक्ष श्रीकांत मयेकर आणि दक्षिण मुंबई जिल्ह्याचे ओबीसी पदाधिकारी उपस्थित होते.*

# गिरणी कामगारांच्या घरांचा देखभाल खर्च माफ होणार म्हाडाच्या उपअधिकाऱ्यांकडून स्पष्ट

■ **मुंबई**

गिरणी कामगारांच्या पनवेल येथील घरांचा ताबा देताना म्हाडाने आकारलेला देखभाल खर्च माफ करण्यासाठी राष्ट्रीय मिल मजदूर संघाने सातत्याने प्रयत्न केले आहेत. हा प्रस्ताव गृहनिर्माण मंडळाने सरकारकडे मंजुरीसाठी पाठवला असता, त्यापैकी एक वर्षाचा ४२ हजार रुपये देखभाल खर्च माफ करण्यात आला असल्याचे म्हाडाच्या उपअधिकऱ्यांनी राष्ट्रीय मिल मजदूर संघाला सांगितले.

२०१९ पासून ४ वर्षे सोडतीतील विजेत्या कामगारांनी कर्जापोटी व्याज बँकेला दिले; परंतु कामगारांना घरांचा ताबा मात्र देण्यात आला नव्हता. त्याबदल्यात पुढील तीन वर्षाकरिता म्हणजेच २०२४ ते २०२७ या काळातील मेंटेनन्स माफ करा, अशी मागणी राष्ट्रीय मिल मजदूर संघाने निवेदनाद्वारे केली होती. निवेदनात घरांच्या दुरुस्तीबाबतही मागणी करण्यात आली होती. गिरणी कामगार कृती संघटना आणि राष्ट्रीय मिल मजदूर संघाच्या वतीने या प्रश्नावर आंदोलन करून आपल्या समस्या मांडण्यात आल्या होत्या. या सर्व प्रयत्नांना अखेर यश आल्याचे राष्ट्रीय मिल मजदूर संघांचे सरचिटणीस गोविंदराव मोहिते यांनी सांगितले.

# रुग्णालयाच्या ज्या इमारती पाडण्यात आल्या आहेत त्यांची पुनर्बांधणी तत्काळ करा!

## मंत्री लोढांच्या उपस्थितीत पालिकेत झाली बैठक

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

मुंबई महानगरपालिकेचे १० -१२ रुग्णालये मोडकळीस आल्यामुळे ते पाडण्यात आले आहेत.त्यामुळे स्थानिक नागरिकांना वेळेवर आरोग्यसेवा मिळणे कठीण झाले आहे. या रुग्णालयाची तत्काळ उभारणी करण्यात यावी. अशी मागणी काल भाजपच्या नगरसेवकांनी पालिका अधिकाऱ्यांकडे एका बैठकीत केली. या संदर्भात येत्या १५ दिवसात निर्णय घेण्यात येईल असे अधिकाऱ्यांनी सांगितल्याचे पालक मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी काल पत्रकार परिषदेत सांगितले.



मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या उपस्थित पालिका अधिकाऱ्याच्या बैठकीला भाजपचे ६० माजी नगरसेवक उपस्थित होते. ही बैठक झाल्यानंतर पत्रकार कक्षात घेतलेल्या पत्रकारपरिषदेत मंत्री लोढा यांच्या सह माजी गटनेते प्रभाकर शिंदे, माजी नगरसेवक भालचंद्र शिरसाट व विनोद मिश्रा उपस्थित होते.

पालिकेच्या परळ येथील के ई एम रुग्णालयात असलेल्या लिफ्ट जुन्या झाल्या आहेत. त्यातील अनेक लिफ्ट कायमच्या बंद केल्या आहेत. तर ज्या कार्यरत आहेत त्या कधीही मध्येच बंद पडतात. त्यावेळी अनेकदा लिफ्टमध्ये रुग्ण तसेच त्यांचे नातेवाईक अडकून पडतात. अशा घटना वारंवार घडतात. सर्व १३ लिफ्ट बदलून नवीन लिफ्ट बसविण्याची योजना आहे. पैकी ५ लिफ्ट चे साहित्य रुग्णालयात येऊन ८ महिने झाले आहे.पण के ई एम प्रशासनाला या ५ लिफ्ट बसविण्यास अद्याप मुहूर्त मिळाला नाही. त्यामुळे रूग्णांचे हाल सुरूच आहेत. या संदर्भात आपण लक्ष घालून त्या लिफ्ट कशा लवकर लागतील हे बघणार आहोत असेही मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी सांगितले.


### महत्त्वपूर्ण निवेदन

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.



वकील: वर्षा बिऱ्हाडे

## जाहीर नोटीस

**वसई येथील मा. श्री. के. जी. सावंत, सह दिवाणी न्यायाधिश, व. स्तर, वसई यांच्या न्यायालयात**

ने. ता. ३१/०८/२०२४
चौ.अ.क्र.१०६/२०२४
नि.क्र. ०६

1. **Mrs. Kavita Ramesh Talpade**
   Age 72 years, Occupation: Housewife.
   Residing at Room no.5, 2nd floor, Pathare Prabhu Building, Pandita Ramabai Road, Grant Road Mumbai-400007
   Mobile no.9969824460
2. **Mrs. Asha Suresh Talpade**
   Age 62 years, Occupation- Housewife,
   Flat no/ 302, 3rd floor, Gardenia Chs Ltd, Opp Petrol Pump, Karjat Murbad Road, Karjat - 410201
   Mobile no.: 9920174782

**....Applicants**

**V/S**

**Mrs. Nikita Mihir Morwale and Others**

1) **Mrs. Nikita Mihir Morwale**
   Age- 50 years, Occ- Housewife,
   having address at : Flat no. 201, 4th floor, Ekta Maplewood, 18th Road, Khar west, Mumbai- 400052
   Mobile no. 9821306118
2) **Mr. Rajesh Ramesh Talpade,**
   Age- 45 years, Occupation-Service,
   Residing at: 31, Ively Road, GU140JP, Farmborough, UK.
3) **Mrs. Sheetal Shahil Shah**
   43 years, Occ- Service,
   Residing at :2A Roy Road, Northwood HA61EH, UK.
4) **Mrs. Nivedita R. Vaidya**
   Age 38 years, Occ- Service,
   having address at Room no.6, 2nd Floor, Shlok Residency, Shivaji Nagar, Dahiwali, Karjat, Raigad-410201
5) **Mrs. Aparna Yogesh Ranjit**
   Age 72 years, Occ- Housewife
   Residing at: Siddha Kutir, N Dutta marg, 4 Banglows, Po: Azad Nagar, Andheri (W), Mumbai- 400053.

**...Respondents**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी दिनांक ०१/०४/२०२४ रोजी Late Shri. Vasantrao Javeri दि. ०६/०९/२००० रोजी मयत झाले, असुन त्यांच्या मालमलेसंबंधी वारस दाखला मिळणेसाठी या न्यायालयात चौकशी **अर्ज क्रमांक १०६/२०२४** (हेअरशिप प्रमाणपत्र) दाखल केला आहे.

**SCHEDULE OF THE PROPERTY**

**"SCHEDULE A"**

Flat No. 219, on 2nd floor, in the society "OM sadhana chs ltd", bearing survey no.97A, Hissa no.2, situate at Revenue Village Manickpur,. Admeasuring 515 Sq. Ft. (Built up), Tal. Vasai, Dist. Palghar.

हुकूमावरून,
सही/-
**अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय व स्तर, वसई**



## सार्वजनिक सूचना

श्री. हेमंतकुमार सुभाष मिर्चे आणि त्यांचे भाऊ श्री. नंदू सुभाष मिर्चे हे फ्लॅट क्रमांक ६०४, सहावा मजला, "तपन को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि." जांगीड इस्टेट, विजय पार्क जवळ, मीरा रोड पूर्व, जि. ठाणे - ४०११०७ ह्या फ्लॅटचे हे दोघेही १००% अविभाजित हक्क, टायटल आणि व्याजासह सोसायटीच्या ५ शेअर्सचे संयुक्त मालक सदस्य म्हणून ओळखले जात आहेत.

श्री. नंदू सुभाष मिर्चे यांचे ३०/०६/२०२४ रोजी निधन झाले, त्यांच्या मागे पत्नी श्रीमती. सोनिया नंदू मिर्चे मुलगा श्री. वंश नंदू मिर्चे वडील श्री. सुभाष बसवनप्पा मिर्चे आणि आई सौ. सुशीला सुभाष मिर्चे, सर्व वर्ग १ कायदेशीर वारस आहेत.

श्री.वंश नंदू मिर्चे, श्री. सुभाष बसवनप्पा मिर्चे, सौ. सुशीला सुभाष मिर्चे यांना वरील फ्लॅटमधील त्यांचे सर्व हक्क व समभागांच्या हक्कांसह श्रीमती सोनिया नंदू मिर्चे यांना दिवंगत श्री. नंदू सुभाष मिर्चे यांच्या रिलीझ डीडअनुसार देण्याचे ठरविले आहे, उप-निबंधक ठाणे येथील कार्यालयात त्याची नोंदणी केली जाईल, ज्यामध्ये श्री. हेमंतकुमार सुभाष मिर्चे हे कोणताही आक्षेप नसल्याची पुष्टी करणार आहेत.

माझ्या अशिल श्रीमती सोनिया नंदू मिर्चे यांच्या विनंतीवरून, मी, ॲड. रजत के. सिंग याद्वारे सर्व व्यक्तींना सूचित करतो कि ज्या दावेदार/चे किंवा आक्षेपकर्त्यांकडून या फ्लॅटमधील हक्क, व्याज किंवा शीर्षक हस्तांतरित करण्यासाठी, सोसायटीच्या शेअर्सच्या हस्तांतरणासह, दाव्या/आक्षेपाचे समर्थन करण्यासाठी कागदोपत्री पुराव्याच्या प्रतींसह, ही सूचना प्रकाशनाच्या १५ दिवसांच्या आत दावे किंवा आक्षेप आमंत्रित करत आहेत.

वरील विहित कालावधीत कोणतेही दावे/आक्षेप प्राप्त न झाल्यास, असे गृहित धरले जाईल आणि/किंवा असे कोणतेही दावे/आक्षेप नाहीत असे मानले जाईल आणि जर असतील तर ते माफ्र केले गेले आहेत किंवा सोडून दिले आहेत आणि अधोस्वाक्षरीने नो क्लेम जारी करण्यास पुढे जावे. त्यासंबंधीचे प्रमाणपत्र आणि माझे अशील रिलीझ डीडची नोंदणी करण्यासाठी पुढे जाईल आणि त्यानंतर कोणतेही दावे स्वीकारले जाणार नाहीत.

ठिकाण: मुंबई
सही /-
दिनांक: १४/०८/२०२४
**ॲड. रजत के. सिंग**
कार्यालय क्रमांक १३८, पहिला मजला, ओसवाल ऑर्नेट, इमारत क्रमांक २/ए, जैन मंदिराजवळ, जेसल पार्क, भाईंदर पूर्व, जि. ठाणे - ४०११०५
(मोबा. क्र. ८१६९८७५१९५)



**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, बृहन्मुंबई विभाग, मुंबई**
धर्मादाय आयुक्त भवन१ ला मजला, सासमीरा बिल्डिंग, सासमीरा रोड, वरळी, मुंबई - ४०००३०
दूरध्वनी क्र. २४९३५४३४, २४९३५४९०
फॅक्स- २४९७६४२०

**Public Trusts Registration Office, Greater Mumbai Region, Mumbai**
Dharmadaya Ayukta Bhavan, First Floor, Sasmira Building, Sasmira Road, Worli, Mumbai- 400 030.
Tel. No. 24935434, 24935490
Fax No. 24976420.

**PUBLIC NOTICE OF ENQUIRY**
**(Read Section 22-Rule 7 and 7A of the Maharashtra Public Trusts Act, 1950)**

**Application No. : ACC/11/3834/2024**
**Under Section 22 of the Maharashtra Public Trusts Act, 1950**
**Filed by : Tarun Shah**
**In the matter of : JAIKUMAR JAIN BENEVOLENT TRUST**
**P.T.R. NO. : E-24260 (Mumbai)**

To,
All concerned having interest:-

Whereas the Applicant has filed a Change Report Under Section 22 of the Maharashtra Public Trusts Act, 1950 on 30/04/2024 before the Hon'ble Asstt. Charity Commissioner -II, Greater Mumbai Region, Mumbai to delete the old board of trustee and to add the names of newly elected Board of Trustees viz.

**A. To delete names of following trustees from Schedule-I of the Trust of the trustees who are retiring as their term is over:**
1. Ashok Kumar Shahi
2. Sudhir Bagrodia
3. Gotam Kothari
4. Hermesh Shah

**B. To add the names of following on Schedule-I of the trust due to their re-appointment as Trustees for next term i.e. 2021-22 to 2023-24:**
1. Ashok Kumar Shahi
2. Sudhir Bagrodia
3. Gotam Kothari
4. Hermesh Shah

In view of Section 22 of the Maharashtra Public Trust Act, 1950 the present Change Report is accepted provisionally vide Order dated 16/07/2024, whereas all concerned persons with interest are call upon to submit your objection if any, in the above matter before the Hon'ble Assistant Charity Commissioner-II, Greater Mumbai Region, Mumbai on the above address in person or a pleader within 30 days from the date of publications of this notice, failing which the change report will be decided on its own merits. Given under my hand and seal of the Joint Charity Commissioner, Greater Mumbai Region, Mumbai.

14th August, 2024.
SD/-
Superintendent (J)
Public Trusts Registration Office,
Greater Mumbai Region, Mumbai



**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, बृहन्मुंबई विभाग, मुंबई**
धर्मादाय आयुक्त भवन१ ला मजला, सासमीरा बिल्डिंग, सासमीरा रोड, वरळी, मुंबई - ४०००३०
दूरध्वनी क्र. २४९३५४३४, २४९३५४९०
फॅक्स- २४९७६४२०

**Public Trusts Registration Office, Greater Mumbai Region, Mumbai**
Dharmadaya Ayukta Bhavan, First Floor, Sasmira Building, Sasmira Road, Worli, Mumbai- 400 030.
Tel. No. 24935434, 24935490
Fax No. 24976420.

**PUBLIC NOTICE OF ENQUIRY**
**(Read Section 22-Rule 7 and 7A of the Maharashtra Public Trusts Act, 1950)**

**Application No. : ACC/11/3833/2024**
**Under Section 22 of the Maharashtra Public Trusts Act, 1950**
**Filed by : Tarun Shah**
**In the matter of : JAIKUMAR JAIN BENEVOLENT TRUST**
**P.T.R. NO. : E-24260 (Mumbai)**

To,
All concerned having interest:-

Whereas the Applicant has filed a Change Report Under Section 22 of the Maharashtra Public Trusts Act, 1950 on 30/04/2024 before the Hon'ble Asstt. Charity Commissioner -II, Greater Mumbai Region, Mumbai to delete the old board of trustee and to add the names of newly elected Board of Trustees viz.

**A. To delete names from Schedule-I of the Trust of the trustees who are retiring as their term is over:**
1. Ashok Kumar Shahi
2. Sudhir Bagrodia
3. Gotam Kothari
4. Hermesh Shah

**B. To add the names of following on Schedule-I of the trust due to their re-appointment as Trustees for next term i.e. 2018-19 to 2020-21**
1. Ashok Kumar Shahi
2. Sudhir Bagrodia
3. Gotam Kothari
4. Hermesh Shah

In view of Section 22 of the Maharashtra Public Trust Act, 1950 the present Change Report is accepted provisionally vide Order dated 16/07/2024, whereas all concerned persons with interest are call upon to submit your objection if any, in the above matter before the Hon'ble Assistant Charity Commissioner-11, Greater Mumbai Region, Mumbai on the above address in person or a pleader within 30 days from the date of publications of this notice, failing which the change report will be decided on its own merits.

Given under my hand and seal of the Joint Charity Commissioner, Greater Mumbai Region, Mumbai.

14th August, 2024.
SD/-
Superintendent (J)
Public Trusts Registration Office,
Greater Mumbai Region, Mumbai



**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, बृहन्मुंबई विभाग, मुंबई**
धर्मादाय आयुक्त भवन१ ला मजला, सासमीरा बिल्डिंग, सासमीरा रोड, वरळी, मुंबई - ४०००३०
दूरध्वनी क्र. २४९३५४३४, २४९३५४९०
फॅक्स- २४९७६४२०

**Public Trusts Registration Office, Greater Mumbai Region, Mumbai**
Dharmadaya Ayukta Bhavan, First Floor, Sasmira Building, Sasmira Road, Worli, Mumbai- 400 030.
Tel. No. 24935434, 24935490
Fax No. 24976420.

**PUBLIC NOTICE OF ENQUIRY**
**(Read Section 22-Rule 7 and 7A of the Maharashtra Public Trusts Act, 1950)**

**Application No. : ACC/11/3836/2024**
**Under Section 22 of the Maharashtra Public Trusts Act, 1950**
**Filed by : Tarun Shah**
**In the matter of: JAIKUMAR JAIN BENEVOLENT TRUST**
**P.T.R. NO. : E-24260 (Mumbai)**

To,
All concerned having interest:-

Whereas the Applicant has filed a Change Report Under Section 22 of the Maharashtra Public Trusts Act, 1950 on 30/04/2024 before the Hon'ble Asstt. Charity Commissioner -II, Greater Mumbai Region, Mumbai to delete the old board of trustee and to add the names of newly elected Board of Trustees viz.

**A. To delete names of following trustees from Schedule-I of the Trust:**
1. Gotam Kothari
2. Hermesh Shah

**B. To add the names of following on Schedule-I of the trust due to their appointment** for the period commencing from 02nd December 2024:
1. Tarun Shah
2. Sandip Shukla

In view of Section 22 of the Maharashtra Public Trust Act, 1950 the present Change Report is accepted provisionally vide Order dated 16/07/2024, whereas all concerned persons with interest are call upon to submit your objection if any, in the above matter before the Hon'ble Assistant Charity Commissioner-II, Greater Mumbai Region, Mumbai on the above address in person or a pleader within 30 days from the date of publications of this notice, failing which the change report will be decided on its own merits.

Given under my hand and seal of the Joint Charity Commissioner, Greater Mumbai Region, Mumbai.

14th August, 2024.
SD/-
Superintendent (J)
Public Trusts Registration Office,
Greater Mumbai Region, Mumbai



**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, बृहन्मुंबई विभाग, मुंबई**
धर्मादाय आयुक्त भवन१ ला मजला, सासमीरा बिल्डिंग, सासमीरा रोड, वरळी, मुंबई - ४०००३०
दूरध्वनी क्र. २४९३५४३४, २४९३५४९०
फॅक्स- २४९७६४२०

**Public Trusts Registration Office, Greater Mumbai Region, Mumbai**
Dharmadaya Ayukta Bhavan, First Floor, Sasmira Building, Sasmira Road, Worli, Mumbai- 400 030.
Tel. No. 24935434, 24935490
Fax No. 24976420.

**PUBLIC NOTICE OF ENQUIRY**
**(Read Section 22-Rule 7 and 7A of the Maharashtra Public Trusts Act, 1950)**

**Application No. : ACC/11/3835/2024**
**Under Section 22 of the Maharashtra Public Trusts Act, 1950**
**Filed by : Tarun Shah**
**In the matter of : JAIKUMAR JAIN BENEVOLENT TRUST**
**P.T.R. NO. : E-24260 (Mumbai)**

To,
All concerned having interest:-

**Whereas the Applicant has filed a Change Report Under Section 22 of the Maharashtra Public Trusts Act, 1950 on 30/04/2024 before the Hon'ble Asstt. Charity Commissioner -II, Greater Mumbai Region, Mumbai to delete the old board of trustee and to add the names of newly elected Board of Trustees viz.**

**A. To delete names of following trustrees from Schedule-1 of the Trust:**
1. Ashok Kumar Shahi
2. Sudhir Bagrodia
3. Jaikumar Jain

**B. To add the names of following on Schedule-I of the trust due to their fappointment for the period commencing from 28th November 2023:**
1. Rohit Shah
2. Anil Maheshwari
3. Nilesh Madhusudan Kadu

In view of Section 22 of the Maharashtra Public Trust Act, 1950 the present Change Report is accepted provisionally vide Order dated 16/07/2024, whereas all concerned persons with interest are call upon to submit your objection if any, in the above matter before the Hon'ble Assistant Charity Commissioner-II, Greater Mumbai Region, Mumbai on the above address in person or a pleader within 30 days from the date of publications of this notice, failing which the change report will be decided on its own merits.

Given under my hand and seal of the Joint Charity Commissioner, Greater Mumbai Region, Mumbai.

14th August, 2024.
SD/-
Superintendent (J)
Public Trusts Registration Office,
Greater Mumbai Region, Mumbai


Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - **Sham Deulkar**

**As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts**

**Year - Twenty Nine**
**Issu - 55**
**R.N.I. Registration No. - 65609/96**

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे**, E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक - **शाम देऊलकर**

**पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.**

**वर्ष- एकोणतीसावे**
**अंक - ५५**
**आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६**

*मुंबई :महाराष्ट्र नवनिर्माण मलबार हिल उपविभागअध्यक्षा, मनसे वाहतूक सेनेच्या चिटणीस शितल घाणेकर यांच्या वतीने,प्रभाग क्र.२१५ मध्ये,याहीवर्षी सलग चौथ्या वर्षी, ज्येष्ठ नागरिकांना छत्री वाटप करण्यात आले, यावेळी वाहतूक सेनेचे सरचिटणीस आरिफभाई शेख यांनी वेळात वेळ काढून कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती दर्शविली, मलबार हिल मनसे विभाग अध्यक्ष निलेश शिरधनकर उपस्थित हो*



## मंत्रिमंडळ बैठकीत ८ महत्वपूर्ण निर्णयांना मंजुरी

# सहा हजार किमी रस्त्यांच्या डांबरीकरणाऐवजी सिमेंट काँक्रीटीकरण, यंत्रमागांना अतिरिक्त वीजदर सवलतीसाठी नोंदणीची अट शिथिल

प्रतिनिधी
■ मुंबई

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत अनेक निर्णय घेण्यात आले आहेत. पशूसंवर्धन व दुग्धविकास, महसूल विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, सहकार विभाग आदी विविध विभागासाठी निर्णय घेण्यात आले. सर्वांत महत्त्वाचा निर्णय म्हणजे नगराध्यक्षांचा कालावधी पाच वर्षे करण्यात आला आहे. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. मंत्रालयातील मंत्रिमंडळ सभागृहात झालेल्या या मंत्रिमंडळ बैठकीस उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांचेसह मंत्रिमंडळातील सदस्य उपस्थित होते.

विदर्भ व मराठवाड्यात दुग्ध विकासाला गती देणार असून यासाठी १४९ कोटी रुपयांची मान्यता देण्यात आली आहे. तर महसूल विभागात मराठवाड्यातील खालसा झालेल्या वर्ग दोनच्या इनाम व देवस्थानच्या जमिनी वर्ग एक करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत डेक्कन कॉलेज, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, टिळक महाराष्ट्र विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना वैद्यकीय प्रतिपूर्ती योजना राबवण्यात



येणार असल्याचे या मंत्रिमंडळ बैठकीत निश्चित करण्यात आले आहे.

सहकार विभागांतर्गत यंत्रमागांना अतिरिक्त वीजदर सवलतीसाठी नोंदणीची अट मार्च २०२५ पर्यंत शिथील करण्यात आली आहे. तर वैद्यकीय शिक्षण विभागात शासकीय, खासगी वैद्यकीय महाविद्यालयाच्या निवृत्त अध्यापकांना ठोक मानधन देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागातून सहा हजार किमी रस्त्यांचे डांबरीकरणाऐवजी सिमेंट काँक्रीटीकरण करण्यात येणार असून यासाठी सुधारित ३७ हजार कोटी खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

***मंत्रिमंडळ निर्णय***

- *विदर्भ व मराठवाड्यात दुग्ध विकासाला गती देणार; १४९ कोटी रुपयास मान्यता.*
- *मराठवाड्यातील खालसा झालेल्या वर्ग दोनच्या इनाम व देवस्थानच्या जमिनी वर्ग एक करण्याचा निर्णय; लाखो नागरिकांना लाभ.*
- *डेक्कन कॉलेज, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, टिळक महाराष्ट्र विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना वैद्यकीय प्रतिपूर्ती योजना.*
- *यंत्रमागांना अतिरिक्त वीजदर सवलतीसाठी नोंदणीची अट शिथील.*
- *शासकीय, खासगी वैद्यकीय महाविद्यालयाच्या निवृत्त अध्यापकाना ठोक मानधन.*
- *सहा हजार किमी रस्त्यांचे डांबरीकरणाऐवजी सिमेंट काँक्रीटीकरण.*
- *सुधारित ३७ हजार कोटी रुपये खर्चास मान्यता.*
- *सौर ऊर्जा प्रकल्पांच्या कर्जासाठी केएफ डब्ल्यू कंपनीशी स्थिर व्याजदराने करार.*

# एससी-एसटी वर्गीकरणावर चर्चा सत्र संपन्न

## मुंबईत लवकरच चर्चासत्रांची मालिका

प्रतिनिधी
■ मुंबई

सर्वोच्च न्यायालयाने अनुसूचित जाती जमातींचे वर्गीकरण तसेच क्रिमीलेयरची अट घातल्याचा निर्णयावर मुंबई सह देशभरात नाराजी व्यक्त होत आहे . न्यायालयाच्या या निकालावर मुंबईत नुकतेच एक चर्चासत्र संपन्न झाले . लवकरच मुंबईच्या विविध ठिकाणी चर्चासत्रांची मालिका सुरु करून जनजागृती करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे .

देशभरातील अनुसूचित जाती जमातींचे अ ब क ड असे वर्गीकरण करून त्यांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ देण्याचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने नुकताच घेतला आहे हे वर्गीकरण करीत असताना या समूहाला क्रिमीलेयरची अट लावण्याचा निर्णय देखील न्यायालयाने घेतला आहे. न्यायालयाच्या या निर्णयावर देशभरातून नाराजी व्यक्त होत आहे . सदर निकालावर एकत्र येऊन चर्चा करण्यासाठी ऑल इंडिया जनरल इन्शुरन्स एस सी एस टी एम्पॉईज असोसिएशनच्या वतीने मुंबईतील सामाजिक संघटना, विचारवंत तसेच सर्व एस सी एसटी युनियनच्या पदाधिकाऱ्यांचे चर्चा सत्र जनरल इन्शुरन्स कंपनीच्या मुंबई येथील मुख्यालयात आयोजित केले होते .

असोसिएशनचे संस्थापक सल्लागार दिलीप पवार यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या संपन्न झालेल्या या कार्यक्रमात इंदिराताई आठवले, संपादक प्रा. प्रेमरत्न चौकेकर, भीम आर्मीचे राष्ट्रीय महासचिव अशोक कांबळे ,दादाभाऊ अभंग ,रत्नागिरीचे मुख्य कार्यकारी अधिकारी, रघुनाथ बामणे,व विविध आस्थापनांमधील मागासवर्गीय कर्मचारी अधिकारी वर्ग मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते.

असोसिएशनचे राष्ट्रीय महासचिव सोपान पवार यांनी या कार्यक्रमाचे आयोजन व प्रास्ताविक केले तर प्रदीप चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले . पवार यांनी सदर चर्चासत्र आयोजित करण्यामागची भूमिका यावेळी मांडली. उपस्थित मान्यवरांनी न्यायालयाच्या निर्णयावर यावेळी तीव्र नाराजी व्यक्त करीत यासंदर्भात महाराष्ट्र आणि देशभरातील विचारवंत संघटना आणि युनियन यांनी एकत्र येऊन भूमिका घेण्याचे आवाहन केले . या आवाहनाला प्रतिसाद देत आयुर्विमा महामंडळ योगक्षेम या मुख्यालयात तसेच शिपिंग कॉरपोरेशन ऑफ इंडिया , आणि स्टेट बँक ऑफ इंडिया,या मुख्यालयात लवकरच अशा चर्चा सत्रांचे आयोजन करण्यात येणार असल्याची घोषणा यावेळी करण्यात आली .

# अंधेरीच्या गोखले पुलाची मुदत वाढवली; आता मे 2025 मध्ये सुरु होण्याची शक्यता

■ मुंबई

अंधेरी पूर्व - पश्चिम भागाला जोडणाऱ्या महत्त्वाच्या गोपाळकृष्ण गोखले पुलाच्या पूर्ण बांधकामाची मुदत मार्च 2025 ते मे 2025 पर्यंत वाढवण्यात आली आहे. प्लॅटफॉर्मच्या वरच्या पुलाच्या उंचीबाबत रेल्वेकडून वारंवार बदल करण्यात येत असल्याने पुलाच्या कामाला विलंब होत आहे. असे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त अभिजीत बांगर यांनी सांगितले.

गोखले पुलाचा गर्डर मुंबईपर्यंत पोहोचला आहे. गर्डर आणण्यास दिरंगाई केल्याबद्दल ठेकेदाराला दंड आकारण्यात येणार आहे. असे सांगितले. गर्डरचे टॉर्किंगचे काम केले जाणार आहे. टॉर्किंग काम 23 ऑगस्टपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर रेल्वेकडून मेगाब्लॉक घेतल्यानंतर गर्डरचे लोकार्पण करण्यात येणार आहे. कामात सातत्याने होत असलेल्या दिरंगाईचा ठपका कार्यकारी अभियंता पुल विभागावर पडला आहे. त्यामुळे कार्यकारी अभियंता एल. चौधरी यांची बदली करण्यात आली असून त्यांच्या जागी रावकाजी यांना आणण्यात आले आहे.

बांगर म्हणाले, गर्डर एकत्र करण्यासाठी 30 ते 60 दिवसांचा कालावधी लागतो. असेंब्लीनंतर गर्डरचे लोकार्पण व इतर कामे ७ सप्टेंबर ते १६ नोव्हेंबर दरम्यान पूर्ण करावी लागणार आहेत.

***... तर कंत्राटदाराला दंड***

*कामाला दिरंगाई केल्यामुळे पुल विभागाचे कार्यकारी अभियंता एल चौधरी यांच्यावर कारवाई करून त्यांना हटवण्यात आले आहे. त्यांच्या जागी आणखी एका अभियंत्याला आणण्यात आले आहे. 7 सप्टेंबर ते 14 नोव्हेंबर या कालावधीत काम पूर्ण न झाल्यास कंत्राटदाराला संपूर्ण खर्चाच्या 0.5 टक्के दंड आकारण्यात येणार आहे. दंडाची रक्कम सुमारे ३ कोटी रुपये असू शकते.*

***- अभिजीत बांगर, अतिरिक्त आयुक्त (प्रकल्प)***

# विधानपरिषद उपसभापती डॉ. गोऱ्हे यांना कॅबिनेट मंत्रीपदाचा दर्जा

प्रतिनिधी
■ मुंबई

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या उप सभापती डॉ. नीलम लतिका दिवाकर गोऱ्हे यांना मुख्यमंत्री सचिवालयाकडून सा.प्र.वि. राशि-१ (राजशिष्टाचार) २ ऑगस्ट, २०२४ च्या निर्णयानुसार कॅबिनेट मंत्रीपदाचा दर्जा देण्यात आला आहे. त्यानुसार त्यांना वित्त विभाग,शासनाने विहित केलेल्या सर्व सेवा सुविधा मिळणार आहेत,असे महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातर्फे एका ज्ञापनाद्वारे कळविण्यात आले आहे.



डॉ. नीलम गोऱ्हे या सन २००२ पासून विधानपरिषदेच्या सन्माननीय सदस्या असून सध्या त्यांची सदस्यत्वाची ४थी टर्म सुरू आहे. त्या सन २०१९ पासून विधानपरिषद सभागृहाच्या उप सभापतीपदी कार्यरत आहेत.

## शहापूर नगरपंचायत, शहापूर. जि. ठाणे.

कार्यालय दूरध्वनी क्र :- ०२५२७-२७२१८७
ई-मेल: shahapurnagarpanchayat@gmail.com/coud.shahapur@maharashtra.gov.in

जा.क्र.श.न.प/जाहिरात/ ७४१ /२०२४ — दिनांक :- २३/०८/२०२४

**जाहीर सुचना**

खालील कामाची ई - निविदा जा.क्र.सा.प्र./जाहिरात/६९१/२०२४ दि.०६/०८/२०२४ रोजी वृत्तमानस या वर्तमानपत्रात जाहीर सूचना प्रसिद्ध करण्यात आलेली होती. परंतु सदर जाहीर सूचनेला दि. १७/०८/२०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. सदर निविदा बाबत अधिक माहिती .mahatendergoin या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

सदर निविदांबाबत कोणतेही कारण न देता एक अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार शहापूर नगरपंचायतने राखून ठेवला आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदा फॉर्म फि | निविदा अनामत रक्कम |
|---|---|---|---|
| १. | शहापूर नगरपंचायत मधील विविध विभागांकरिता आर्थिक वर्ष सन २०२४ – २०२५ व सन २०२५ – २०२६ साठी कुशल/ अर्धकुशल/अकुशल कामगार पुरवठा करणे. | 1180/- | 20,000/- |

**सही/-**
**श्री. शिवराज वि.गायकवाड**
**मुख्याधिक**
**शहापूर नगरपंचायत, शहापूर**

## ठाणे महानगरपालिका, ठाणे

**सार्वजनिक बांधकाम विभाग**
**निविदा सुचना**

सार्व. बांधकाम विभाग या विभागातर्फे वर्तकनगर प्रभाग समिती अंतर्गत "रस्ते दुरुस्ती" या लेखाशिर्षका अंतर्गत विविध रस्त्यांची दुरुस्ती दुरुस्ती करणे (सन २०२४-२५) या कामाकरिता ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. सदर निविदा प्रक्रीयेमध्ये ज्या निविदाकारांवर शासकीय, निमशासकीय, सार्वजनिक उपक्रम, स्थानिक संस्था, महानगरपालिका ई. मार्फत नोंदणी रद्द करणेबाबत / काळ्या यादीत टाकणेबाबत कार्यवाही करण्यात आली आहे अथवा प्रस्तावीत आहे अशा निविदाकारांना निविदा भरता येणार नाही. निविदा सूचना व निविदा प्रपत्र ठाणे महानगरपालिकेच संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथे दि.१४/०८/२०२४ ते २१/०८/२०२४ पर्यंत उपलब्ध आहे. ऑनलाईन निविदा महापालिकेचे संकेतस्थळावर दि.२१/०८/२०२४ रोजी पर्यंत १६.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. सदर निविदा दि.२३/०८/२०२४ रोजी १६.३० वाजता निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधींसमक्ष उघडण्यात येतील.कोणतीही एक अथवा सर्व निविदा प्रपत्रके कारणे न दाखविता नाकारण्याचा अधिकार नगर अभियंता यांनी राखून ठेवला आहे.

ठामपा/पिआरओ/पिडब्ल्यूडी-व.प्र.स/२७५/२०२४-२५ सही/-
दि:१२.०८.२०२४ — कार्यकारी अभियंता, ठाणे महानगरपालिका, ठाणे

**Pls visit our oficial web-site**
**www.thanecity.gov.in**

## वांद्रे टर्मिनस – अहमदाबाद आणि जयपूर दरम्यान सुपरफास्ट उस्तव विशेष गाड्या चालवणार आहे

| गाडी क्र. | शुभारंभाचे स्थानक आणि गंतव्य | सेवांचे दिनांक | प्रस्थान | आगमन |
|---|---|---|---|---|
| ०९०५३ | वांद्रे टर्मिनस – अहमदाबाद | १४.०८.२०२४ | २१:३० वा. (बुधवार) | ०५.३० वा. (पुढील दिवशी) |
| ०९०५४ | अहमदाबाद – वांद्रे टर्मिनस | १५.०८.२०२४ | ०८.४५ वा. (गुरुवार) | १७.१५ वा. (त्याच दिवशी) |

**थांबे:** बोरीवली, पालघर, वापी, वलसाड, सुरत, भरूच, वडोदरा, आनंद आणि नडियाद स्थानके दोन्ही बाजूनी.

**रचना:** एसी-३ टियर, शयनयान वर्ग आणि साधारण द्वितीय वर्ग डब्बे.

| गाडी क्र. | शुभारंभाचे स्थानक आणि गंतव्य | सेवांचे दिनांक | प्रस्थान | आगमन |
|---|---|---|---|---|
| ०९०३७ | वांद्रे टर्मिनस – जयपूर | १५.०८.२०२४ | २१:४० वा. (गुरुवार) | १६.०० वा. (पुढील दिवशी) |
| ०९०३८ | जयपूर – वांद्रे टर्मिनस | १६.०८.२०२४ | १९.०० वा. (शुक्रवार) | १३.०० वा. (दुसऱ्या दिवशी) |

**थांबे:** बोरीवली, पालघर, वापी, वलसाड, सुरत, भरूच, वडोदरा, गोधरा, रतलाम, नागदा, कोटा आणि सवाई माधोपूर स्थानके दोन्ही बाजूनी.

**रचना:** एसी-३ टियर, शयनयान वर्ग आणि साधारण द्वितीय वर्ग डब्बे.

**वेळा, थांबे आणि रचनेच्या तपशिलवार माहितीसाठी कृपया www.enquiry.indianrail.gov.in संकेतस्थळाला भेट द्या.**

गाडी क्र. ०९०५३ करीता आरक्षण खुले झाले आहे आणि गाडी क्र. ०९०५४ आणि ०९०३७ करीता आरक्षण सर्व पीआरएस काऊंटर्स आणि आयआरसीटीसी संकेतस्थळावर १४.०८.२०२४ पासून सुरु होईल. वरील सर्व गाड्या विशेष दराने विशेष गाड्या म्हणून चालविण्यात येतील.

**पश्चिम रेल्वे**
wr.indianrailways.gov.in
आम्हाला लाईक करा: facebook.com/WesternRly
आम्हाला फॉलो करा: twitter.com/WesternRly

**कृपया सर्व आरक्षित तिकिटांसाठी वैध ओळखपत्रे सोबत ठेवा**

## मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

म्हाडा MHADA

**निविदा सुचना क्र. ३ (२०२४-२५)**

कार्यकारी अभियंता / वांद्रे विभाग/ मुं. गृ. व क्षे. वि. मंडळ, रुम नं. ३२१, दुसरा मजला, गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई- ५१, यांच्या कार्यालयामार्फत खालील दर्शविलेल्या कामाकीता म्हाडा / मुं. म. पा./ सा. बां. विभाग / के. सा. बां. वि. / रेल्वे/ बी.पी.टी., अथवा कोणतेही सरकारी किंवा निमसरकारी विभाग यांचेकडे योग्य त्या वर्गाच्या नोंदणीकृत व पात्र कंत्राटदाराकडून खालील कामाच्या मोहरबंद बी-१ (टक्केवारी दर) निविदा मागविण्यांत येत आहेत.

| अनु. क्र. | कामाचे नांव | निविदा रक्कम (रुपये) | इसारा रक्कम (रुपये) | सुरक्षा अनामत रक्कम (रुपये) | कोय निविदेची रक्कम (विना परतावा रुपये) (वस्तु व सेवा करासह) | कोऱ्या निविदा विक्रीची तारीख व वेळ | मोहरबंद निविदा स्वीकृतीची तारीख व वेळ | काम करावयाचा कालावधी | ठेकेदारांचा नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १ | भारत नगर, बांद्रा (पूर्व) येथे मोकळा भूखंड क्र. ४ येथील शौचालयाचे तुटलेले भांडे व दरवाजे बदलणे. | ७,८३,६३०.०० | ७८३६.०० | १६०००.० | ५९०.०० | दि. १४/०८/२०२४ ते दि. २१/०८/२०२४ वेळ १० स. ते १ दु. | दि. १६/०८/२०२४ ते दि. २३/०८/२०२४ वेळ १० स. ते १ दु. | ६ महिने | १० वर्ग-७व त्यावरी |
| २. | भारत नगर, बांद्रा (पूर्व) चाळ क्र. २९-३० व ३७-३८ मधील शौचालयाचे तुटलेले भांडे व दरवाजे बदलणे. | ३,०२,६००.०० | ३०२६.०० | ७०००.०० | ५९०.०० | दि. १४/०८/२०२४ ते दि. २१/०८/२०२४ वेळ १० स. ते १ दु. | दि. १६/०८/२०२४ ते दि. २३/०८/२०२४ वेळ १० स. ते १ दु. | ३ महिने | वर्ग-८व त्यावरील |
| ३. | १८४ टेनामेंन्ट, आझाद नगर, अंधेरी (प) येथील कंपाऊड भिंत दुरुस्त करणे, पाण्याच्या टाकी भोवती पी.सी.सी. कोबा करणे, व खिडक्या बदलणे | ३,५२,८०९.०० | ३५२८.०० | ८०००.०० | ५९०.०० | दि. १४/०८/२०२४ ते दि. २१/०८/२०२४ वेळ १० स. ते १ दु. | दि. १६/०८/२०२४ ते दि. २३/०८/२०२४ वेळ १० स. ते १ दु. | ३ महिने | वर्ग-८व त्यावरील |
| ४ | डी. एन. नगर अंधेरी (प) येथील उपवन इमारती मधील सेवा निवासस्थान सदनिका क्र. ४३ मध्ये अंतर्गत दुरुस्ती व रंगकाम करणे. | ३,८३,१११.०० | ३८३१.०० | ८०००.०० | ५९०.०० | दि. १४/०८/२०२४ ते दि. २१/०८/२०२४ वेळ १० स. ते १ दु. | दि. १६/०८/२०२४ ते दि. २३/०८/२०२४ वेळ १० स. ते १ दु. | ३ महिने | वर्ग-८व त्यावरील |
| ५. | दुकान क्र. ४/बी, मजासवाडी, जोगेशवरी (पूर्व) येथील भाडे वसुली कार्यालयाची दुरुस्ती करणे. | ४,२०,३२५.०० | ४२०३.०० | ९०००.०० | ५९०.०० | दि. १४/०८/२०२४ ते दि. २१/०८/२०२४ वेळ १० स. ते १ दु. | दि. १६/०८/२०२४ ते दि. २३/०८/२०२४ वेळ १० स. ते १ दु. | ३ महिने | वर्ग-८व त्यावरील |
| ६. | जी ९, इमारत क्र. २ गुलमोहर सोसायटी, खेर नगर, बांद्रा (पूर्व) मधील सदनिका क्र. ४५, श्रीम. सिमा मोटे यांना वितरीत केलेला सेवा निवासस्थानाची दुरुस्ती करणे. | ५,८७,०६९.०० | ५८७१.०० | १२०००.० | ५९०.०० | दि. १४/०८/२०२४ ते दि. २१/०८/२०२४ वेळ १० स. ते १ दु. | दि. १६/०८/२०२४ ते दि. २३/०८/२०२४ वेळ १० स. ते १ दु. | ६ महिने | वर्ग-७ व त्यावरील |
| ७. | न्यु डी. एन. नगर, इमारत क्र. १०, जुहू आदर्श इमारती मधील सदनिका क्र. १८६ सेवा निवासस्थान अंतर्गत दुरुस्ती करणे. | ४,१७,२०४.० ० | ४१७२.०० | ९०००.०० | ५९०.०० | दि. १४/०८/२०२४ ते दि. २१/०८/२०२४ वेळ १० स. ते १ दु. | दि. १६/०८/२०२४ ते दि. २३/०८/२०२४ वेळ १० स. ते १ दु. | ३ महिने | वर्ग-८व त्यावरील |
| ८. | न्यु डी. एन. नगर, सेवा निवासस्थान, इमारत क्र. १० व ११, जुहू आदर्श इमारतीच्या छतावर वॉटर प्रुफिंग करणे. | ४,४४,१०२.०० | ४४४१.०० | ९०००.०० | ५९०.०० | दि. १४/०८/२०२४ ते दि. २१/०८/२०२४ वेळ १० स. ते १ दु. | दि. १६/०८/२०२४ ते दि. २३/०८/२०२४ वेळ १० स. ते १ दु. | ३ महिने | वर्ग-८व त्यावरील |

२. अ) जर निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा १०% पर्यंत कमी दरांचा असेल तर ठेकेदारानी निविदाधीन किंमतीच्या १% एवढया रकमेचा धनाकर्ष (Demand Draft) परफॉर्मन्स स्विक्युरीटी म्हणून निविदेच्या लिफाफा क्र. २ मध्ये बँक पतवारी प्रमाणीत प्रतीसह सादर करावा. (उदा- १% ते १०% कमी दर १% रक्कम) ब) निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा १०% पेक्षा जास्त दराने कमी असेल तर देकार १०% पेक्षा जेवढया जास्त दराने कमी आहे तेवढया रकमेचा वरील बाब (अ) प्रमाणे येणाऱ्या रक्कमेसह एकत्रित धनाकर्ष (Demand Draft) निविदेसोबत सादर करावा (उदा :- १४% कमी दर - १०% पर्यंत १ टक्का व (१४% - १०%) - ४% असे एकूण ५%)
क) धनाकर्ष उपलब्ध करुण देणे बाबींबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.
(iii) धनाकर्ष मुख्य लेखाधिकारी / मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ यांचे नावे असावा., (ii) धनाकर्ष सरकारी बँका किंवा शेडयुल्ड बँकांकडून काढलेला असावा., (iii) धनाकर्ष मुदत निविदा भरण्याच्या दिनांकानंतर किमान ६ महिने पर्यंत असावी., (iv) धनाकर्षवर बँकेचा MICR व IFSC कोड नंबर असणे आवश्यक आहे.
२. कोऱ्या निविदा म्हाडा / मुं. म. पा./ सा. बां./ के. सा. बां. वि./ रेल्वे/ बी. पी. टी., अथवा कोणतेही सरकारी किंवा निमसरकारी विभाग यांच्याकडे योग्य त्या वर्गाच्या नोंदणीकृत व पात्र वर्गात असलेल्या नोंदणी प्रमाणपत्राच्या, पॅन कार्ड व पूर्वी अशा प्रकारची कामे केलेले पुर्वानुभवाचे प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच मिळू शकतील.
३. ठेकेदारांनी निविदा भरतांना ते कुठल्याही सरकारी/ निमसरकारी संस्थेमध्ये काळया यादीत नाव समाविष्ट नसल्याचे नोटरी सहीत शपथपत्र सादर करावे.
४. इसारा रक्कम फक्त राष्ट्रीयकृत / शेडयुल बँक १ वर्षाच्या अल्प मुदतीची अनामत राशी मुख्य लेखाधिकारी / मुं. गृ. व क्षे. वि. मंडळ यांच्या नावावर द्यावी.
५. कोऱ्या निविदाच्या प्रती कार्यकारी अभियंता / वांद्रे विभाग/ मुं. गृ. व क्षे. वि. मंडळ, रुम नं. ३२१, दुसरा मजला, गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१ यांचेकडून रकाना क्र. ६ मध्ये विहीत केलेल्या दिनांक व वेळेप्रमाणे निविदांची विक्री केली जाईल व सिलबंद निविदा याच कार्यालयात रकाना क्र. ७ प्रमाणे स्विकृती केली जाईल व मोहरबंद निविदा दि. २३/०८/२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजता कार्यकारी अभियंता / शहर विभाग/ मुं. गृ. व क्षे. वि. मंडळ, यांच्या कार्यालयात उघडण्यात येईल.
६. मागविण्यात आलेल्या निविदेमध्ये जीएसटी अंतर्भुत नाही. जीएसटी ची अदायगी स्विकृत करारनामा मुल्यावर होईल. ७. एक किंवा सर्व निविदा कोणत्याही कारणाशिवाय फेटाळण्याचे अधिकार सक्षम अधिकाऱ्यांकडे राखून ठेवण्यात येत आहेत. ८. सविस्तर निविदा सुचनेमध्ये नमूद केल्याप्रमाणे निविदांची विधी ग्राह्यता बंधनकारक राहील.

CPRO/A/597

Follow us:@mhadaofficial

**सही/-**
**कार्यकारी अभियंता/ वांद्रे विभाग**
**मुं. गृ. व क्षे. वि. मंडळ, मुंबई**

**म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था**

## एसपीव्ही ग्लोबल ट्रेडिंग लिमिटेड

सीआयएन: एल२७१००एमएच१९८५पीएलसी०३५२६८
२८/३०, अनंत वाडी, बिनानी भवन, तळ मजला, भूलेश्वर, मुंबई ४००००२
ई-मेल : spvglobaltrading@gmail.com संकेतस्थळ: www. spvglobal.in

**३० जून २०२४ रोजी संपलेल्या त्रैमासिकासाठी अलेखापरीक्षित वित्तिय निष्कर्षाचा आराखडा**

(रु. लाखामध्ये)


| अनु. क्र. | तपशिल | एकमेव | | | एकत्रिकृत | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संपलेले तिमाही | गेल्या गत वर्षांमधील याच कालावधीच्या संपलेले ३ महिने संपलेली तिमाही | संपलेले गत वर्ष | संपलेले तिमाही | गेल्या गत वर्षांमधील याच कालावधीच्या संपलेले ३ महिने संपलेली तिमाही | संपलेले गत वर्ष |
| | | ३०-जून-२४ | ३०-जून-२०२३ | ३१-मार्च-२४ | ३०-जून-२४ | ३०-जून-२०२३ | ३१-मार्च-२४ |
| १ | कार्यामधून एकूण उत्पन्न (निव्वळ) | २७४.१० | ६६४.२४ | ४,६७३.०८ | | १५,८०९.१७ | ६९,३१८.७५ |
| २ | सामान्य कार्यामधून कालावधीसाठी निव्वळ नफा/ (तोटा) (कर अपवादात्मक आणि/ किंवा अतिविशिष्ट बाबी पूर्व) | (१५.७४) | ६.६० | ६४.३६ | १,५५६.५२ | ६७.९५ | १,२१५.३५ |
| ३ | कर पूर्व कालावधीसाठी निव्वळ नफा/ (तोटा) (अपवादात्मक आणि/ किंवा अतिविशिष्ट बाबी पूर्व) | (१५.७४) | ६.६० | ६४.३६ | १,५५६.५२ | ६७.९५ | १,२१५.३५ |
| ४ | कर पश्चात कालावधीसाठी निव्वळ नफा/ (तोटा) (अपवादात्मक आणि/ किंवा अतिविशिष्ट बाबी पूर्व) | (१५.७४) | ४.९५ | ४८.०३ | १,०७४.७७ | (१.११) | ९६०.०७ |
| ५ | सम भाग भांडवल (दर्शनी मूल्य रु. १०/- प्रती समभाग) | १९६.०० | १९६.०० | १९६.०० | १९६.०० | १९६.०० | १९६.०० |
| ६ | गतवर्षाच्या लेखापरिक्षित ताळेबंदामध्ये दाखविल्यानुसार राखीव (पुर्नमुल्यांकित राखीव वगळता) | | | | | | १५.६७०.९६ |
| ७ | प्रती समभाग उत्पन्न (अतिविशिष्ट बाबी नंतर) (ए) मूळ (बी) सौम्यीकृत | (०.८०)<br>(०.८०) | ०.२५*<br>०.२५* | २.४५<br>२.४५ | २७.३०*<br>२७.३०* | (०.०६)*<br>(०.०६)* | २५.९५<br>२५.९५ |

१. वरील अलिखित आर्थिक परिणामांचे पुनरावलोकन ऑडिट समितीने केले आहे आणि शिफारस केली आहे आणि १३ ऑगस्ट २०२४ रोजी झालेल्या बैठकीत मंडळाने मंजूर केले आहे. वैधानिक लेखापरीक्षकांनी वरील निकालांचे मर्यादित पुनरावलोकन केले आहे. एक अपात्र मत जारी केले आहे. त्यावर त्यांच्याद्वारे. ३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या तिमाही आणि वर्षाच्या आर्थिक निकालाचे संपूर्ण स्वरूप www.bseindia.com आणि www.spvglobal.in वर उपलब्ध आहे.
२. कंपनीचे आर्थिक निकाल भारतीय लेखा मानके (इंड एएस) कंपनी (इंडिया अकाउंटिंग स्टँडर्ड्स) नियम, २१५ (वेळोवेळी फेरफार केल्यानुसार) नुसार तयार केले गेले आहेत आणि कंपनी कायदा २०१३ च्या कलम १३३ अंतर्गत अधिसूचित केले गेले आहेत..
३. गत कालावधीचे आकडे चालू कालावधीच्या आकड्यांशी सुसंगत करण्यासाठी आवश्यकते नुसार पुनर्गठीत करण्यात आले आहेत.

**एसपीव्ही ग्लोबल ट्रेडिंग लिमिटेड करीता**
**सही/-**
**बाळकृष्ण बिनानी**
**व्यवस्थापकीय संचालक**
**डीआयएन: ००१७५०८०**

**ठिकाण: मुंबई**
**दिनांकित: १३ ऑगस्ट, २०२४**

खोटं कौतुक करून
माणसाकडून कोणतंही निरर्थक
काम करून घेता येतं.



- हरिशंकर परसाई
प्रसिद्ध लेखक

वृत्तमानस
मुंबई, बुधवार, १४ ऑगस्ट २०२४

# सरकार बळीराजाचा आधार

आपला देश हा वाढ शेतीप्रधान असूनही चार येथे अर्थात नामधारी शेतकऱ्याला बळीराजालाच असंख्य अडचणींना कायमच सामोरे जावे लागते. एकीकडे बदलते लहरी हवामान, त्यातच सरकारने घेतलेल्या विविध धोरणांचा फटका आणि सरतेशेवटी शेतीमालाला योग्य भाव न मिळणे यामुळे हा बळीराजा मेटाकुटीला आला असून, त्याला वेळीच सावरणे ही काळाची गरज आहे. शेती आणि शेतकरी हे दोन्ही सध्या अडचणीत आले असताना शेती उत्पादनासाठी आवश्यक बी- बियाणे आणि खतावर कररूपाचा बोजा असल्याने पिकविण्यासाठी त्याचा दुप्पट खर्च होत आहे. या वेळी कमाई मात्र निम्म्याहून अधिक कमी होत असल्याने अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्येचा पर्याय स्वीकारला असल्याचे कायमच दिसते. एकीकडे ही व्यथा असताना कृषीपंपांच्या शेतकऱ्यांच्या हिश्श्यातील रकमेत अचानक वाढ केल्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असल्याचे चित्र आहे. अपारंपरिक ऊर्जेतील महत्त्वपूर्ण असलेल्या सौरऊर्जेला सरकारकडून प्रोत्साहन मिळत असताना सौर कृषीपंपांच्या शेतकऱ्यांच्या हिश्श्यातील रकमेत गेल्या वर्षीपेक्षा सहा ते बारा हजार रुपये इतकी झाली आहे. ही योजना गेल्या वर्षांपासून राबवली जात आहे. आता अचानक कृषीपंपांच्या शेतकऱ्यांच्या हिश्श्यातील रकमेत अचानक वाढ केल्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असल्याच्या शेतकऱ्यांच्या सार्वत्रिक तक्रारी आहेत. दुसरीकडे शेतकऱ्यांना हव्या त्या कंपनीचे सौर पंप मिळत नाहीत. पंपांविषयी संपूर्ण माहिती शेतकऱ्यांना दिली जात नाही. अनेक पंपांमधून सिंचन कमी होत असल्याच्या तक्रारी आहेत. शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध करून देण्यासाठी सध्या सौर कृषीपंपांना अधिक प्रोत्साहन व सवलती देण्याचे सरकारचे धोरण आहे. ही हरित ऊर्जा स्वस्तही आहे. त्यामुळे मागेल त्याला सौरऊर्जा पंप या योजनेत शेतकऱ्यांना दिवसा अखंडित मोफत वीजपुरवठा करण्यात येणार आहे. या योजनेत साडेआठ लाख शेतकऱ्यांना सौर कृषीपंप देण्यात येतील. त्यासाठी एकंदर १५ हजार कोटी रुपये निधी राज्य सरकार देणार आहे. सौर कृषीपंप विकत घेण्यासाठी शेतकऱ्याला १० टक्के रक्कम भरावी लागते आणि राज्य व केंद्र सरकारचे उर्वरित अनुदान मिळते. आताही सौर कृषीपंप योजनेचा लाभ मिळण्यासाठी शेतकऱ्यांना त्यांचा हिस्सा भरावा लागेल. मात्र त्यातून वीज मोफत उपलब्ध होईल, असे सांगण्यात आले आहे. तंत्रज्ञान दिवसेंदिवस विकसित होत आहे आणि त्यामुळे कृषी क्षेत्र सुधारण्यास मदत होत आहे. विजेवर काम करणारे तंत्रज्ञान प्रदूषण वाढवते. प्रदूषण हानिकारक आहे. कारण त्यामुळे वातावरणात बदल होतो जे वनस्पती, प्राणी तसेच मानवांसाठी योग्य नाही. शेतकऱ्यांना दिवसा सिंचन करता यावे, शेतीला पाणी देता यावे, यासाठी केंद्र सरकारने पंतप्रधान कुसुम योजना आणली आहे. या योजनेतून शेतकऱ्यांना सौर पंप घेण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकार अर्थसाहाय्य करते. ३, ५ आणि ७.५ अश्वशक्ती क्षमतेचे सौर पंप या योजनेतून दिले जातात. पात्र अर्जदार शेतकरी सर्वसाधारण प्रवर्गातील असेल तर पंपाच्या एकूण किमतीपैकी ९० टक्के; तर अनुसूचित जाती-जमाती प्रवर्गातील अर्जदारांना ९५ टक्के अनुदान दिले जाते. सरकारच्या योजनेनुसार सौर कृषीपंपांच्या किमतीच्या ३० टक्के रक्कम केंद्र सरकार, ३० टक्के रक्कम राज्य सरकार आणि ४० टक्के रक्कम लाभार्थी शेतकऱ्यांनीच द्यावयाची होती. तथापि, सर्वसाधारण शेतकरी लाभार्थी हिस्सा १० टक्के आणि अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती शेतकरी लाभार्थी हिस्सा ५ टक्के तसेच ६० ते ६५ टक्के रक्कम राज्य शासनाने अतिरिक्त वीज कराद्वारे भरावी, असा निर्णय राज्य सरकारने घेतला. या निर्णयानुसार राज्यातील कृषीपंप वीज जोडणीचे सौरऊर्जेद्वारे विद्युतीकरण करण्याचे अभियान सुरू करण्यात आले आहे. असे असले तरी सौर कृषीपंपांसाठी मागणी नोंदविल्यानंतर मंजुरीसाठी वर्षभर प्रतीक्षा करावी लागते. सौर कृषी पंप कंपन्या शेतकऱ्यांशी संपर्क साधून आपल्याच कंपनीच्या पंपाची निवड करण्याचा आग्रह धरतात, अशी शेतकऱ्यांची नेहमीची तक्रार असली तरी शासनाने त्याकडे अजूनही गांभीर्याने पाहिले नाही. देशात पंतप्रधान कुसुम योजनेची अंमलबजावणी करण्यात येते. या योजनेअंतर्गत केंद्र सरकार त्यांच्याकडील निर्धारित केलेली सौर कृषीपंपाची आधारभूत किंमत किंवा केंद्र सरकारद्वारे ई-निविदा प्रक्रियेतून क्षमतानिहाय दर आणि पुरवठादारांची नावे नोंदणीकृत करून राज्यांना कळवते. केंद्राने २०१९-२० आणि २०२०-२१ मध्ये सौर कृषी पंपाचे क्षमतानिहाय दर निश्चित केले होते. त्यानंतर २०२३-२५ साठी दर ठरविण्यात आले. या दरात वाढ झाल्याचे दिसून येते. त्यामुळे त्या प्रमाणात शेतकऱ्यांच्या हिश्शात वाढ झाली आहे, असे स्पष्टीकरण सरकार देत असले तरी ते शेतकऱ्यांना मान्य होताना दिसत नाही. अनेक पात्र शेतकऱ्यांची निवड झाल्यानंतरही महाऊर्जा किंवा महावितरणकडून लाभार्थ्यांना वेळेवर संदेश प्राप्त होत नाहीत. उपलब्ध कोटा असलेल्या कंपन्यांपैकी एका कंपनीचीच निवड करावी लागते. पंप, पंपाचा आकार, सौर यंत्राची क्षमता, हेडचा आकार दिवसभरात पाणी उपसण्याची क्षमता याची माहिती शेतकऱ्यांना दिली जात नाही. संयंत्राचा वापर पाणीउपसा करण्यासाठी केला जात नाही, अशा वेळी शेतकऱ्यांना घरगुती वापरासाठी वीजनिर्मितीची कुठलीही सुविधा उपलब्ध होत नाही, असे अनेक प्रश्न आहेत. या पंपांच्या किमतीत झालेली वाढ रद्द करण्यात यावी आणि कृषीपंप योजनेत पारदर्शकता आणावी, अशी शेतकऱ्यांची मागणी असली तरी त्याकडे अजून सरकारने लक्ष दिले नाही, असे म्हणावे लागेल. डिझेल आणि इतर इंधनाचे दरही झपाट्याने वाढत आहेत. अशा भागात राहणाऱ्या गरीब शेतकऱ्यांसाठी यामुळे फारच कमी पर्याय उरतो. सौरउर्जेची आवर्ती किंमत जवळपास शून्य आहे. महत्त्वाचे म्हणजे ती पर्यावरणास अनुकूल आहे आणि आपल्या समृद्ध देशात व्यावहारिकदृष्ट्या कुठेही वापरता येते. गरीब शेतकऱ्यांसाठी हा एक उत्तम उपाय आहे. सौरऊर्जे वर आधारित सिंचनाचा अलीकडील विकास या संधीचा फायदा घेतो. मध्यम आणि मोठ्या शेतकऱ्यांनी घेतलेल्या सामान्य पूर सिंचन क्षेत्रात पिकाला एका सिंचनात सरासरी २ इंच पाणी लागते. हे प्रमाण सुमारे ५०० घनमीटर किंवा ५ लाख लिटर प्रति हेक्टर इतके आहे. त्यामुळे पारंपरिक पद्धतीने मोठ्या भूभागाच्या सिंचनासाठी सौरऊर्जेवर चालणारे सिंचन योग्य नाही. त्यामुळे सौरऊर्जे वर चालणाऱ्या सिंचनाचा अवलंब लहान शेतकरी साधारणतः अर्धा एकरच्या खाली असलेल्या छोट्या भूखंडावर भाजीपाला पिके घेतात. अशा पिकांना नियतकालिक पूर सिंचनापेक्षा वारंवार सिंचनाची गरज असते. भारतात, शेती पिकांना पाणी देण्यासाठी २० टक्के वीज आणि १३ टक्के इंधन वापरते. सौरऊर्जेचा वापर करून आपण हे आकडे अर्धे करू शकतो. त्यामुळे दरवर्षी सुमारे २२५ दशलक्ष लिटरची बचत होते. सौर पंप २५ वर्षे टिकतात आणि ते डिझेलची जागा घेत आहेत. यामुळे पर्यावरणाला मदत होते आणि जुन्या ऊर्जास्रोतांवर अवलंबून राहणे कमी होते. सततची नापिकी, पावसाची अनियमितता अशा एक ना अशा अनेक कारणांमुळे शेतीबद्दलची निराशा वाढत चालली आहे. शेतीला केवळ पाणी व उत्कृष्ट निविष्ठा असल्यास शेतकरी आपल्या बळावर उत्पादनात मोठी वाढ करू शकतो. त्याचप्रमाणे शेतीमध्ये तंत्रज्ञान, अपारंपरिक ऊर्जेचा उपयोग केल्यास मोठ्या प्रमाणावर उत्पादनात वृद्धी होऊ शकते. एकूण शेती क्षेत्राला बळ देणाऱ्या या सौर शक्तीमुळे बळीराजा ऊर्जाहीन होणार नाही, याकडे सरकारने सातत्याने पाहिले पाहिजे. शेतकऱ्याला शेतीच्या व्यवसायात सधन करण्यासाठी सरकार हा त्याचा मोठा आणि मुख्य आधार आहे. सरकारने तो शेतकऱ्यांना दिला पाहिजे. सरकारची ती जबाबदारी आहे.

# वंदे मातरम् : भारतीय स्वातंत्र्य लढ्याचा बीजमंत्र




आपल्या स्वातंत्र्याला आज ७७ पूर्ण झाली आहेत. हे स्वातंत्र्य आपल्याला सहजासहजी मिळाले नाही त्यासाठी मोठा लढा लढावा लागला. या स्वातंत्र्य लढ्याचा बीज मंत्र वंदे मातरम हे गीत होते. स्वातंत्र्य लढ्यात हजरो क्रांतिकारकांनी प्राणांची आहुती दिली. या हजारो हुतात्म्यांचा फासावर लटकताना किंवा इंग्रजांच्या गोळ्या झेलताना शेवटचा शब्द होता तो म्हणजे वंदे मातरम. वंदे मातरम हे भारतीय स्वातंत्र्य लढ्याचे ब्रीदवाक्य होते असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. १८८५ पूर्वीचा तो काळ होता. इंग्रजांच्या जुलमी राजवटीला भारतीय जनता कंटाळली होती. इंग्रजांची ही जुलमी राजवट उलथवून लावण्यासाठी नागरिक एकत्र येत होते.अनेक छोटे मोठे समूह इंग्रजांविरुद्ध आवाज उठवत होते त्यामुळे भारतीयांमध्ये स्वातंत्र्याची भावना जागृत होऊ लागली होती. अशा वातावरणात वंदे मातरम या गीताचा जन्म झाला. बंकीमचंद्र चॅटर्जी यांनी कोलकाता विश्व विद्यालयातून बी ए ची पदवी पूर्ण केली होती. इंग्रज सरकारने त्यांची कोलकात्याच्या डिस्ट्रिक मॅजिस्ट्रेटपदी निवड केली. नंतर ते कोलकात्याचे डिस्ट्रिक कलेक्टर बनले. बंकीम चंद्र चॅटर्जी हे जरी इंग्रजांच्या सेवेत होते तरी ते प्रखर देशभक्त होते. १८५७ च्या स्वातंत्र्य लढ्याचे त्यांना खूप आकर्षण होते.

१८५७ साली इंग्रजांनी त्यांचे गॉड सेव्ह द क्वीन हे राष्ट्रगीत भारतात रुजू करण्याचा प्रयत्न केला. त्यांचे हे राष्ट्रगीत भरताचेच राष्ट्रगीत आहे असे भासवण्याचा प्रयत्न सुरू झाला. त्यामुळे बंकीम चंद्र चॅटर्जी खूप अस्वस्थ झाले. इंग्रज आपले राष्ट्रगीत भारतावर कसे थोपवू शकतात असा प्रश्न त्यांना पडला. भारतीय लोकही इंग्रजांच्या राष्ट्रगीताचा तिरस्कार करीत होते. त्यांनी यावर गहन अभ्यास केला तेंव्हा त्यांच्या लक्षात आले की हजारो वर्षांच्या गुलामगीरीमुळे भारत हा कधीच अखंड देश नव्हता त्यामुळे भारताला स्वतःचे राष्ट्रगीत नव्हते. म्हणून ७ नोव्हेंबर १८७६ रोजी त्यांनी भारत भूमीला मातृभूमी असे संबोधित करून तिचे नमन करणारे वंदे मातरम सहा कडव्यांचे एक देशभक्तीपर गीत लिहिले. त्यांनी हे गीत आपल्या मित्रांना म्हणून दाखवले. तेंव्हा मित्र त्यांना म्हणाले हे गीत भारताचे राष्ट्रगीत बनले पाहिजे.

१८८२ साली बंकीम चंद्र चॅटर्जी यांनी आनंद मठ नावाची एक कादंबरी लिहिली. या कादंबरीत त्यांनी वंदे मातरम हे गीत समाविष्ठ केले. आनंद मठ या कादंबरीला लोकांचा खूप प्रतिसाद मिळाला. अल्पावधीतच ही कादंबरी लोकप्रिय झाली. त्याकाळात लोकांनी त्या कादंबरीचे पारायण केले. त्यामुळे वंदे मातरम हे गीत देखील लोकप्रिय झाले. १८९६ साली काँग्रेसच्या कोलकता येथील अधिवेशनात रवींद्रनाथ टागोर यांनी वंदे मातरम हे गीत गायले. या गीताने संपूर्ण अधिवेशन देशभक्तीच्या भावनेने भारावून गेले. १९०१ साली कोलकाता मध्येच झालेल्या काँग्रेसच्या अधिवेशनात सामूहिक रित्या हे गीत गाण्यात आले. सर्व भारतीयांना हे गीत तोंडपाठ झाले. वंदे मातरम हे भारताचे राष्ट्रगीत आहे असे मानुनच लोक हे गीत गाऊ लागले त्यामुळे १९०५ साली इंग्रजांनी या गीतावर बंदी घातली. तरीसुद्धा बनारस विश्व विद्यालयात रवींद्र नाथ टागोर यांची पुतणी सरला देवी यांनी हे गीत गायले. १९०५ मध्ये इंग्रजांनी बंगालची फाळणी केली. या फाळणीच्या विरोधात झालेल्या प्रचंड आंदोलनात हे गीत जागृतीचा शंखनाद बनले.

हिंदू मुस्लिम सर्वांनी या गीताचे मुक्तकंठाने गायन केले. या फाळणी विरोधात लोक रस्त्यांवर उतरले अखेर इंग्रजांनी शरणागती पत्करून बंगालची फाळणी रद्द केली. इंग्रजांविरुद्ध लोकांना एकजूट करण्यात वंदे मातरम या गीताचा मोठा वाटा होता. वंदे मातरम हा शब्द क्रांतीचा समानार्थी शब्द बनला. जो तो आपल्या भारत भूमीला वंदन करुन म्हणजे वंदे मातरम गीत म्हणून स्वातंत्र्य लढयात सहभागी होऊ लागला. १९०४ साली भगिनी निवेदिता यांनी भारताच्या राष्ट्रध्वजाची रूपरेषा तयार केली यात या ध्वजात वर हिरवा मध्ये पिवळा व तळाशी केशरी रंग होता. वरच्या हिरव्या रंगावर कमळाची आठ फुले होती. खालच्या केशरी रंगावर चंद्राच्या आणि सूर्याच्या आकृत्या होत्या तर मधल्या पिवळ्या रंगावर वंदे मातरम असे लिहिले होते. १९०७ साली बर्लिन येथे वंदे मातरम लिहिलेला भारताचा हा ध्वज फडकवण्यात आला होता. लाला लजपतराय हे लाहोरहून एक पाक्षिक चालवत. या पाक्षीकाचे नावही वंदे मातरम हेच होते. देश स्वातंत्र्य झाल्यावर वंदे मातरम या गीताच्या पहिल्या कडव्याला राष्ट्रगीताचा दर्जा देण्यात आला आहे. आज स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करताना भारतीय स्वातंत्र्य लढ्याचा बीजमंत्र बनलेल्या वंदे मातरम चे स्मरण करणे हे आपले कर्तव्यच आहे. वंदे मातरम!

- श्याम ठाणेदार,
पुणे

## पत्र मानस

### राजकीय पक्षांकडून मतदारांना खुशीचे दिन

येत्या काही महिन्यात विधान सभा निवडणुका जाहीर होणार आहेत. त्या डोळयासमोर ठेवून सर्वच राजकीय पक्ष नेते जागृत होऊन मतदारांना आकर्षित करण्यासाठी सणासुदीचा वापर करून आगाऊ छुपा प्रचार करतील मतदारांना आपलेसे करण्याचा प्रयत्न करतील. काही पक्ष नेते दही हंडी उत्सवात उत्सवाचे प्रायोजक होतील. मुंबई, ठाण्यातील कोकणी माणूस गणपती सणानिमित्ताने कोकणात मोठ्या संख्येने जात असतो.त्यांच्यासाठी सद्या कोकणात जाण्यासाठी मोफत बस सेवा उपलब्ध करतील.पुढे दसरा,दिवाळी आहेच त्यानिमित्ताने काही फराळ,गोड पदार्थाचे वाटप केले जाईल.राज्य सरकारने यापूर्वीच लाडकी बहीण योजना जाहीर करून महिलांना खुश खबर दिलेली आहे.या पुढेही अनेक योजना आचार संहिता लागू होण्यापूर्वी जाहीर होतील.पण प्रश्न असा पडतो की सरकारी पक्ष वा विरोधी पक्ष असो त्यांना निवडणुका आल्या की मतदारांची आठवण होत असते. पण एकदा निवडून आल्यानंतर तेच नेते जनतेला विसरत असतात.ते फक्त मतदारांना गृहीत धरत असतात.अशा वेळी मतदार ही शहाणे होऊन राजकीय पक्षातर्फे मिळणारा लाभ घेवून जागरूकपणे मतदान करत असतात हे पक्ष नेते विसरत असतात.

**- नंदकुमार आ पांचाळ, घोडपदेव मुंबई**

### डॉक्टरांची सुरक्षा रामभरोसे ?

पश्चिम बंगालमधील आर.जी. कार वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे वरिष्ठ महिला निवासी डॉक्टरची बलात्कार करून निर्घृण हत्या करण्यात आली. या घटनेमुळे देशात डॉक्टरांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. परिणामी या घटनेच्या निषेधार्थ देशभरातील डॉक्टरांनी संप पुकारून आपला तीव्र संताप व्यक्त केला आहे. यावरून निर्भया कांडची पुनरावृत्ती रोखण्यात सरकारे अपयशी ठरत आहेत. डॉक्टरांच्या या संपामुळे राज्यातील सर्व सरकारी व महापालिका रुग्णालयांची सेवा विस्कळीत होणार असून फक्त अत्यावश्यक सेवाच सुरू राहणार असल्याचे सांगितले जाते. राज्यातील मार्ड या डॉक्टरांच्या संघटनेने सरकारला त्यांच्या मागण्यांचे निवेदन दिले आहे. या हत्याकांडामुळे सर्व डॉक्टरांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून त्यांच्या सुरक्षेची कोणीच हमी देऊ शकत नसल्याचे वास्तव आहे देशभरातील सर्व रुग्णालयांमधील डॉक्टर संपावर गेल्याने रुग्णांचे प्रचंड हाल होणार आहेत शासकीय रुग्णालयात निवासी डॉक्टर हा त्या ठिकाण आरोग्य व्यवस्थेचा कणा असतो त्याच्याशिवाय रुग्णालयाचे कामकाज सुरळीतपणे चालू शकत नाही. अर्थात याची कल्पना सरकार व प्रशासन यांना असूनही आपल्या मागण्यांसाठी डॉक्टरांना आंदोलन करावे लागते हे निंदनीय आहे. वैद्यकीय सेवा हे व्रत असल्याने डॉक्टरानी रुग्णांना वेठीस धरू नये अशी भावना असणे स्वाभाविक असते. अर्थात आपण डॉक्टरांमध्ये देवाचे रूप पाहत असतो. पण जेव्हा एखादा रुग्ण दगावतो, त्यावेळी त्याचे निकटवर्तीय मात्र हिंसक रूप धारण करून त्याच्यावर हल्ला करतत हे योग्य नाही. वास्तविक रुग्णाच्या मृत्यूस अनेक कारणे कारणीभूत असतात. त्याचा कोणीच विचार करीत नाही. परिणामी याचा राग काढला जातो, तो बिचाऱ्या डॉक्टरांवर ! यातून रुग्णालय प्रशासन मात्र सुटते. राष्ट्रीय महिला आयोग कुचकामी ठरला असून सरकार महिलांचे रक्षण करू शकत नाही हे या घटनेने अधोरेखित होते. रुग्णालयाचे रक्षकच जर भक्षक बनत असतील तर दाद मागायची कुणाकडे ? या प्रकरणी संघटनेने सरकारकडे केंद्रीय आरोग्य सेवा संरक्षण कायद्याची मागणी केल्याचे समजते. या घटनेमुळे संपूर्ण देश हादरला असून डॉक्टरांचे मनोधैर्य खच्ची झाल्यास त्यांच्या कामावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा भीतीदायक परिस्थितीत सरकार त्यांचे रक्षण करू शकत नसेल, तर त्यांच्याकडून चांगल्या सेवेची अपेक्षा करणे गैर आहे. त्यामुळे त्यांच्या सुरक्षेला प्राधान्य देऊन उत्तम सुरक्षा व्यवस्था पुरवणे सरकारचे काम आहे. रुग्णालय परिसरात आवश्यक ती सुरक्षा रक्षकांची फौज तैनात करून, सर्वत्र सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत. तसेच कामाशिवाय रुग्णालयाच्या आवारात फिरणाऱ्यांवर कडक निर्बंध घालणे अनिवार्य आहे. कायद्याचा धाक नसल्यामुळेच असे गुन्हे घडताना दिसतात. मात्र नेतेमंडळी तात्पुरत्या घोषणा करून वेळ मारून नेतात. सध्या त्यांचे 'खुर्ची माझी लाडकी' हे अभियान सुरू असल्याने बहिणींचे रक्षण करणे सोडून त्यांच्याकडून मतांची ओवाळणी मात्र अपेक्षित आहे. यावरून बंगाल प्रमाणे आपल्या राज्यातीलही डॉक्टरांची सुरक्षा रामभरोसे असल्याचे अनेकदा त्यांच्यावरील होणारे हल्ले पाहता दिसून आली आहे. योद्धा कर्मयोगी व चाणक्य यांनी राज्यात निर्भया कांडाची पुनरावृत्ती होणार नाही याची दक्षता घ्यावी हीच अपेक्षा!

**- पांडुरंग भाबल,भांडुप.**

### रोज मरे त्याला कोण रडे!

दररोज रेल्वे प्रवास करणा-या प्रवाशांना रेल्वे यंत्रणांच्या ढिसाळ कारभाराचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे.अलीकडच्या काळात रेल्वे गाड्यांना होणारा उशीर, कामकाजातील अनियमितता आणि वारंवार होणारे अपघात, रुळाला तडे जाणे, सिंग्नल यंत्रनेत बिघाड होणे,यामुळे भारतीय रेल्वे आधुनिकीकरणाच्या आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील सेवा पुरवण्याच्या दाव्याच्या तुलनेत कुठे आहे, असा प्रश्न पुन्हा उपस्थित केला जात आहे. ऊन असो की पाऊस मध्य आणि हार्बर रेल्वेची वाहतूक खोळंबलेली असते .त्यामुळे सकाळी घरातून निघालेल्या चाकरमान्यांना ऑफिस गाठण्यासाठी उशीर होतो. रेल्वे स्थानकात आली की अगोदरच प्रवाशांनी तुडुंब भरून आलेल्या या लोकलमध्ये चढण्यासाठी प्रवाशांची झुंबड उडत असते.उदासीन शासनकर्ते यांच्यामुळेच रेल्वे प्रवाशांना असुरक्षित प्रवास करण्याची वेळ येत आहे.निवडणूकी अगोदर रेल्वे प्लेटफार्म ची उंची मोजणारे निवडणूक झाली की कुठे गायब होतात हेच कळत नाही.मुंबईत मुसळधार पाऊस सुरु झाला की रेल्वेसेवेवर याचा परिणाम होत आहे. काही रेल्वे लाईनवर मोठ्या प्रमाणात पाणी साचते त्यामुळे गाड्या उशिराने धावतात परिणामी चाकरमानी, विद्यार्थी यांना त्याचा नाहक त्रास भोगावा लागतो. दर रविवारी दहा दहा तास मेगाब्लॉक घेऊनही रेल्वेची काहीच सुधारणा होत नाही.रोज मरे त्याला कोण रडे अशी अवस्था मध्य आणि हार्बर रेल्वेची झाली आहे.

**- शशिकांत रा. सावंत डोंबिवली**

### कुमकुवत लोकशाही असलेल्या देशातच अराजकता

भारताच्या शेजारी देशात भयानक अराजकता माजली आहे. दोन वर्षापूर्वी जे श्रीलंकेत घडले तेच आता बांगलादेशात घडत आहे. बांगलादेशच्या पंतप्रधान शेख हसीना यांना देश सोडून भारतात आश्रय घ्यावा लागला. आता बांगलादेशची सूत्रे राजकारणा बाहेरच्या व्यक्तीकडे गेली असली तरी राजकीय तरबेज व्यक्तीला देशाबाहेर घालवण्या इतपित तिथे उलथापालथ घडवली गेली. तर मग राजकीय छक्के पंजे, गुंतागुंतीचे डावपेच नीटसे माहीत नसलेल्या ला लष्कर व अन्य लोक कळसूत्री बाहुली बनवून ठेवणार नाहीत कशावरून ? बांगलादेशमधील या अराजकतेमागे चीन आणि पाकिस्तान आहेत हे आता लपून राहिले नाही. जे श्रीलंका आणि बांग्लादेशात घडले तेच भारतातही घडवण्यासाठी काही मूलतत्ववादी, अतिरेकी, देशद्रोही घटक व येथील पाताळयंत्री राजकारणी उतावीळ असल्याचे दिसते. आशिया खंडातील भारताचे वर्चस्व सहन न होणाऱ्या हित शत्रूंचा भारतातही अराजकता माजवून भारताला कुमकुवत करण्याचा डाव आहे मात्र त्यांचा हा डाव यशस्वी होणार नाही कारण भारतातील नागरिक सुज्ञ असून लोकशाही मानणारे आहेत. भारतीय लोकशाही जगातील सुदृढ लोकशाही आहे. कुमकुवत लोकशाही असलेल्या देशातच अराजकता माजत आहे. भारतासारख्या सुदृढ लोकशाही असलेल्या देशात कधीही अराजकता माजू शकत नाही.

**- श्याम ठाणेदार, पुणे**

### शेजारच्या देशात लागलेल्या आगीची झळ भारताला बसू नये?

गेल्या काही दिवसांत बांगलादेशात महागाई वाढली आहे त्यामुळेच लोकांमध्ये नाराजी होती.आरक्षण विरोधी आंदोलन सुरु झाले होते,परंतु सत्ता उलथून टाकण्यात ऐवढी ताकद नव्हती. १९७१ साली भारताच्या सहकार्याने बांगलादेशची निर्मिती झाली.पंतप्रधान शेख हसीना यांचे भारताशी असलेले सलोख्याचे संबंध प्रस्थापित देशांना सहन होत नव्हते.अशा कारणाने आंतरराष्ट्रीय महाशक्ती त्यांच्यावर नाराज होत्या.चीनला बांगलादेशात आपले स्थान बळकट करायचे होते.पंतप्रधान महाशक्तिच्या दबावाला वळी पडत नव्हत्या त्यांच्यासाठी देश महत्वाचा होता.म्हणूनच त्यांनी कडक शिस्त पाळली होती.भारताने परिस्थितीचे गांभीर्य ओळखून पावले उचलली नसती तर पंतप्रधान शेख हसीना यांना धोका निर्माण झाला असता त्या भारतात येऊ शकल्या आणि भारताने त्यांना मदत करून जगाला दाखवून दिले संकट काळात भारत बांगलादेश बरोबर आहे.शेजारी आग लागली की त्याच्या झळा आपल्यालाही बसतात. हे आपण जाणतो बांगलादेश देशात शांतता प्रस्थापित करून कट्टर पंथापासून देश वाचवणे सर्वांच्या कर्तव्य आहे.आंतरराष्ट्रीय महाशक्तीकडून भारतात अशी परिस्थिती निर्माण होणार नाही याची दक्षता भारताने घ्यायला हवी.चीनने भारत घुसखोरी सुरूच ठेवली आहे.पाकिस्तान येन केन प्रकारेण भारतात दहशतवाद माजवत आहे. आशिया खंडातील भारताचे वर्चस्व प्रस्थापित देशांना सलते आहे. बांगलादेशच्या इतिहासात भारताचे नाव अग्रस्थानी आहे. भारत हिंदुराष्ट्र आहे माहीत असूनही विश्वास ठेवत आहेत हेच भारताचे कर्तृत्व आहे.भारत महाशक्तिच्या दिशेने वाटचाल करीत आहे हेच शल्य प्रस्थापित देशांना सतावत आहे.भारताने शेख हसीना यांना केलेले सहकार्य योग्य आहे.बांगलादेशला मदत करताना भारतावर कोणी राग काढणार नाही याची दक्षता घ्यायलाच हवी.तेव्हाच शेजारच्या देशातील आगीची झळ भारतात बसणार नाही.

**- महादेव गोळवसकर, कुर्ला**

### घुसखोरी स्थानिकांच्या मदतीने रोखावी लागेल

देशाच्या सीमेवर सुरक्षा लष्कराचे जवान तैनात असतानाही घुसखोरी कशी होते? असा सवाल माजी मुख्यमंत्री फारुख अब्दुल्ला यांनी उपस्थित केला आहे.त्यांनी भारतीय लष्कराच्या शौर्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित करणे हे देशासाठी दुर्दैवी आहे. काश्मीरमधील घुसखोरी स्थानिकांच्या मदतीने होत आहे. सीमेवर बॉम्बहल्ले, गोळीबार व हत्या करीत दहशतवादी संघटना सक्रीय होऊन घुसखोरी करत आहेत.दीर्घकाळ सैन्याला गोळीबारात गुंतवून ठेवणे ह्या रणनितीच्या आडून घुसखोरी वाढली आहे. स्थानिक दहशतवाद्यांना आश्रय देतात.दहशतवादी घुसखोरीच्या वेळी मदत करणा-याला पैसे देतो. अतिरेक्यांची माहिती, गुप्तवार्ता याबाबत स्थानिकांचा विश्वास साध्य करणे महत्त्वाचे आहे. तज्ज्ञ व अभ्यासकांच्या मते स्थानिक आणि प्रशासनातील समन्वयाच्या अभावातून अनेकदा अतिरेकी आपला हेतू साध्य करण्यात यशस्वी ठरताहेत. दहशतवाद्यांना मदत करणा-यांवर कठोर कारवाई करण्यात याव्यात. स्थानिकांचा विश्वास संपादन करण्यासाठी काय केले जात आहे?

**- विवेक तवटे , कळवा ,ठाणे**

### जय महाराष्ट्र म्हणणे गुन्हा होऊ शकत नाही

कर्नाटक राज्यात आता जय महाराष्ट्र बोलणे गुन्हा होऊ शकत नाही असे कर्नाटक उच्च न्यायालयाने एका याचिकेच्या सुनावणी दरम्यान स्पष्ट केले आहे. कर्नाटक आणि महाराष्ट्र या दोन राज्यातील सीमावाद सर्वांना माहिती आहे. महाराष्ट्र परिवहन सेवेच्या बसचे कर्नाटक मार्केट मध्यवर्ती बस स्थानकात येताच जवळपास आठजणांनी जय महाराष्ट्र म्हणत स्वागत केले होते यामध्ये बस चालक आणि बस वाहक यांचा देखील समावेश होता. दुर्दैवाने मार्केट पोलिसांनी जय महाराष्ट्र म्हटले म्हणून गुन्हा दाखल केला होता आणि आता त्याच याचिकेच्या अंतिम सुनावणी वर कोर्टाने निकाल देताना स्पष्ट केले आहे की कोणीही जय महाराष्ट्र म्हटल्यास कदापि कुठलीही शांतता भंग होत नसते थोडक्यात जय महाराष्ट्र म्हटले म्हणून आता यापुढे तुरुंगात टाकता येणार नाही एवढीच बाब मराठी भाषिकांसाठी कायम समाधानकारक आहे असे वाटते.

**- संजय गंगाराम साळगांवकर, कुर्ला**

### बालकवींचे स्मारक केव्हां !

निसर्ग कवितांनी जनमनाला आनंद देणारे, बालकवी उर्फ त्र्यंबक बापूजी ठोंबरे यांचे धरणगाव या जन्मगावी स्मारक व्हावे अशी सुमारे दहा वर्षांपूर्वी त्यांच्या जयंतीनिमित्ताने साहित्यिक, साहित्य प्रेमींची इच्छा, संकल्पना मांडण्यात आली. परंतु या प्रदीर्घ कालावधीतही दुर्दैवाने आजवर स्मारक पूर्णत्वास मात्र गेलेले नाही किंबहुना ते दुर्लक्षित राहिलेय याची खंत वाटते. निधी अभावी अथवा अन्य कारणास्तव बालकवींचे रखडलेले स्मारक शक्य तितका लवकर संबंधितांकडून पूर्णत्वास जाऊन देखण्या स्वरूपात उभे रहावे.

**- विश्वनाथ पंडित, ठाणे**

## जाणीव फाउंडेशनच्यावतीने वृक्षारोपण

**पनवेल :** जाणीव फाउंडेशन यांच्या वतीने वृक्षारोपण करण्यात आले. निसर्ग देवतेचे रक्षण करण्यासाठी एक छोटस सहकार्य करण्याचं भाग्य जाणीव फाऊंडेशनच्या वतीने मिळाले असल्याचे यावेळी सांगण्यात आले. जाणीव फाउंडेशन यांच्या माध्यमातून सुकापुर त्याचबरोबर आदई डोंगर या ठिकाणी वृक्ष लागवड करण्यात आली. पुढील दोन दिवसात विहिघर येथे देखील वृक्षारोपण होणार आहे. या कार्यक्रमाला जाणीव फाउंडेशनचे सदस्य मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. भर पावसात देखील सदस्यांनी वृक्षारोपण केले. केलेले वृक्षारोपण फक्त झाडे लावून नाहीतर पुढे जगण्याच्या दृष्टीने देखील नियोजन करण्यात आल्याचे जाणीवचे प्रमुख राजेश केणी यांनी सांगितले.



## म ह त्त्वा चे

### वावंजेतील रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य

**पनवेल :** पनवेल तालुक्यातील वावंजे गावात येणाऱ्या रस्त्यांवर खड्यांचे साम्राज्य पसरले आहे. याचा त्रास येणाऱ्या जाणाऱ्या प्रवासी, नागरिक विद्यार्थ्यांना होत आहे. वावंजे गावात जाण्या येण्यासाठी दोन रस्ते पर्यायी आहेत. पावसाळा सुरू होऊन जवळपास तीन महिने होत आले आहेत. मात्र शासनाकडून कोणत्याही प्रकारची डागडुजी करण्यात येत नाही. त्यामुळे खड्ड्यातूनच नागरिकांना प्रवास करावा लागत आहे. पाले खुर्द ते वावंजे रस्ता आणि देवीचा पाडा ते वावंजे रस्ता हा पूर्ण खड्ड्यात गेला आहे. वावंजे ग्रामपंचायत मध्ये आगामी काळात निवडणुका होणार आहेत. त्यामुळे काही दिवसांपूर्वी या ठिकाणी गावातील रस्त्याचे भूमिपूजन करण्यात आले. मात्र पनवेल महानगरपालिकेकडून गावात जाण्यासाठी लागणाऱ्या रस्त्याची डागडुजी देखील करण्यात आली नाही. लोकप्रतिनिधीनी लक्ष न दिल्याने स्थानिक ग्रामस्थ नाराज असून या संदर्भात वावंजे ग्रामपंचायत माजी सरपंच डी.बी. म्हात्रे यांनी आपली प्रतिक्रिया व्यक्त केली.

### नोकरीच्या बहाण्याने पाच लाखांची फसवणूक

**नवी मुंबई :** बृहन्मुंबई महानगरपालिकेत नोकरीला लावून देण्याचे आमिष दाखवून पेण तालुक्यातील रहिवासी स्वप्निल सदानंद म्हात्रे यांच्या जवळून पावणे पाच लाख रुपयांची रक्कम घेऊन, स्वप्निल म्हात्रे यांना बनावट ओळखपत्र व व खोटे युनियनचे कार्ड दिले. मात्र सत्य परिस्थिती समोर आल्यावर आपली फसवणूक झाल्याची लक्षात येतात स्वप्निल म्हात्रे यांनी प्रवीण शांताराम वाघमारे यांच्या विरुद्ध एनआरआय पोलीस ठाण्यात तक्रार नोंद केली आहे. प्रवीण वाघमारे यांनी स्वप्नील म्हात्रे यांना बृहन्मुंबई महानगरपालिकेत कामाला लावतो असे सांगून म्हात्रे यांच्या जवळून रक्कम घेऊन स्वप्निल मात्रे यांना खोटे ओळखपत्र व खोटे युनियनचे कार्ड दिले. मात्र कालांतराने सत्य परिस्थिती समोर आल्यावर आपल्याला देण्यात आलेली ओळखपत्र व युनियनचे कार्ड हे खोटे असल्याचे आढळून आल्याने, स्वप्नील म्हात्रे यांनी प्रवीण वाघमारे यांना दिलेल्या रकमेपैकी उर्वरित रक्कम 4 लाख 80 हजार रुपये परत देत नसल्याने स्वप्निल म्हात्रे यांनी एनआरआय पोलीस ठाणे गाठून प्रवीण शांताराम वाघमारे यांच्या विरोधात तक्रार दाखल केली.

### बसमध्ये चढताना तीन भामट्यांनी प्रवाशाला लुटले

**कल्याण:** कल्याण पश्चिमेतील वल्लीपीर रस्त्यावरील वाशी बस थांबा येथे सोमवारी रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास नवी मुंबई मधील एक प्रवासी आणि त्याचे दोन मित्र वाशी बसमध्ये चढत होते. यावेळी तीन भामट्यांनी बसमध्ये चढत असताना हुल्लडबाजी करून एका प्रवाशा बरोबर वाद घालून त्याच्या जवळील १२ हजार रूपये किमतीचा मोबाईल जबरदस्तीने हिसकावून पळून गेले. आतापर्यंत राज्य परिवहन महामंडळाच्या कल्याण पश्चिमेतील बस आगारात प्रवाशांजवळील वस्तू चोरणे, आगारा बाहेरील प्रवाशांच्या हातामधील वस्तू लुटून नेण्याचे प्रकार घडत होते. हे प्रकार आता वल्लीपीर रस्त्यावरील वाशी बस थांब्यावर सुरू झाल्याने प्रवाशांनी विशेषता महिला प्रवाशांनी धसका घेतला आहे.

## कळवा, मुंब्रा, दिव्यात एकाच कामावर दोनदा खर्च?

### आमदार जितेंद्र आव्हाडांचा गंभीर आरोप

**प्रतिनिधी**
■ **ठाणे**

येत्या काही महिन्यावर येऊन ठेपलेल्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण तापू लागले असतानाच, कळवा, मुंब्रा आणि दिवा या भागामध्ये गेल्या तीन वर्षात झालेल्या विकासकामांमध्ये अपहार झाल्याचा संशय राष्ट्रवादीचे नेते आणि स्थानिक आमदार जितेंद्र आव्हाड यांनी व्यक्त केला आहे. एकाच विकासकामांवर दोनदा खर्च झाल्याचा आरोप करत या कामांच्या चौकशीसाठी त्रयस्थ संस्थेमार्फत लेखापरिक्षण करावे, अशी मागणी करत यासंबंधीचे पत्र त्यांनी पालिका आयुक्तांना दिल्याने खळबळ उडाली आहे.



राज्यातील सत्तातरणाचा केंद्रबिंदू असलेल्या ठाणे जिल्ह्यातील राजकीय घडामोडींवर सर्वांचे लक्ष लागलेले असते. याच जिल्ह्यातील राष्ट्रवादीचे नेते जितेंद्र आव्हाड यांना सातत्याने कोंडीत पकडण्याचे प्रयत्न सत्ताधारी पक्षाकडून केले जात आहे. सत्तेत सामील झालेल्या अजित पवार गटाकडूनही आव्हाड यांच्यावर टिका केली जात आहे. तसेच अजित पवार गटाने कळवा आणि मुंब्रा भागावर लक्ष केंद्रीत करत आव्हाड यांच्याविरोधात निवडणुक लढविण्याची तयारी सुरू केली आहे. मुख्यमंत्री पुत्र व खासदार श्रीकांत शिंदे यांच्या मतदार संघात हा परिसर येतो. आव्हाड आणि श्रीकांत शिंदे यांचे फारसे जमत नसून हे दोन्ही नेते एकमेकांविरोधात शहकाटशहाचे राजकारण करताना दिसून येतात. राज्यातील सत्ताबदलानंतर राज्य शासनाने दिलेल्या निधीतून ठाणे महापालिकेने कळवा, मुंब्रा आणि दिवा भागात विविध विकास कामे केली असून या कामांमध्ये अपहार झाल्याचा संशय जितेंद्र आव्हाड यांनी व्यक्त केल्याने खळबळ उडाली आहे.

जितेंद्र आव्हाड यांनी सोमवारी ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांची पालिका मुख्यालयात जाऊन भेट घेतली. या भेटीनंतर महापालिकेचे जेवढे आयुक्त होऊन गेले आहेत, तेवढ्यांनी कळवा मुंब्र्यात प्रचंड सहकार्य केले आहे. अशाच प्रकारे सहकार्याची अपेक्षा आम्हाला या आयुक्तांकडे असल्याचेही त्यांनी भेटीनंतर पत्रकारांशी बोलताना सांगितले. खूप दिवसात सगळ्या माजी नगरसेवकांची भेट झाली नव्हती. त्या सगळ्यांनी भेटायची इच्छा होती. त्यांच्या वॉर्ड मधील छोटी छोटी काम होती, ती मार्गी लागावी म्हणून आम्ही आयुक्तांची भेट घेतल्याचे त्यांनी सांगितले. मात्र, या भेटीदरम्यान त्यांनी पालिका आयुक्तांना एक पत्र दिले असून त्यात कळवा, मुंब्रा आणि दिवा भागात गेल्या तीन वर्षात झालेल्या कामात अपहार झाल्याचा संशय व्यक्त केला आहे. कळवा, मुंब्रा आणि दिवा भागात विकास कामे करण्यासाठी राज्य शासनाकडून विकास निधी वर्ग करण्यात आला.


## नवी मुंबईकरांना होतोय स्वच्छ, शुद्ध पाणीपुरवठा

### पाण्याच्या दोन हजार नमुन्यांच्या तपासणीतून स्पष्ट

**प्रतिनिधी**
■ **नवी मुंबई**

नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने पाणी तपासणीसाठी दोन आठवडे रविवारी विशेष पाणी गुणवत्ता तपासणीत २ हजार पाणी नमुन्यांची तपासणी करण्यात आली असून नवी मुंबईकरांना स्वच्छ ,शुद्ध आणि सुरक्षित पाणीपुरवठा केला जात असल्याचे तपासणीतून स्पष्ट झाले आहे. ९५ नमुने उत्तम असल्याचे विशेष पाणी तपासणीत स्पष्ट झाले आहे.

पावसाळी कालावधी म्हणून तपासणीत वाढ करावी, असे निर्देश महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी पाणीपुरवठा विभागास दिले होते. त्यास अनुसरून अतिरिक्त शहर अभियंता



अरविंद शिंदे व त्यांच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी पाणी गुणवत्ता तपासणीची विशेष मोहीम रविवारी ४ व ११ ऑगस्ट रोजी राबविली. या दोन्ही वेळेस नेहमीपेक्षा दहा पट अधिक म्हणजे प्रत्येक रविवारी १ हजारांहून अधिक म्हणजे लागोपाठ दोन रविवारी २ हजारपेक्षा अधिक पाणी नमुने वेगवेगळ्या ठिकाणाहून तपासण्यात आले. महापालिका क्षेत्रातील घरे, सोसायट्या, गावठाण व झोपडपट्टी भाग, वाणिज्य संकुले, शैक्षणिक व इतर संस्था अशा विविध ठिकाणांहून तसेच मुख्य जलवाहिनी, भोकरपाडा जलशुद्धीकरण केंद्र, जलकुंभ अशा ठिकाणांवरूनही पाण्याचे नमुने घेऊन त्यांची तपासणी करण्यात आली.

या गुणवत्ता चाचणीमध्ये पिण्याच्या पाण्यातील विविध घटकांची चाचणी नवी मुंबई महानगरपालिकेच्या ८ ठिकाणी असलेल्या स्वत:च्या प्रयोगशाळांमध्ये करण्यात आली आहे. महानगरपालिकेच्या मध्यवर्ती प्रयोगशाळेत तसेच कोकण भवन येथील शासनाच्या प्रयोगशाळेमध्ये करण्यात येत आहे.

## उल्हासनगरमध्ये भररस्त्यात तरुणाला भोसकलं

**प्रतिनिधी**
■ **अंबरनाथ**

जेवणाचं पार्सल घरी घेऊन निघालेल्या एका तरुणावर जीवघेणा हल्ला झाल्याची धक्कादायक घटना उल्हानगर शहरात घडली. सोमवारी रात्री घडलेल्या या घटनेनं परिसरात एकच खळबळ उडाली. आरोपीने तरुणाला वाटेतच अडवून त्याच्या पाठीत चाकू खुपसला. मूठ तुटल्याने हा चाकू तरुणाच्या पाठीतच अडकून पडला. आरडाओरड झाल्यानंतर आजूबाजूचे लोक जमा झाले.

त्यानंतर आरोपी घटनास्थळावरून पसार झाला. या घटनेत तरुण गंभीर जखमी झाला असून त्याला उपचारासाठी खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. सध्या




त्याची प्रकृती स्थिर असून डॉक्टरांनी शस्त्रक्रिया करून पाठीत अडकलेला चाकू बाहेर काढलाय.

या घटनेनं परिसरात एकच खळबळ उडाली आहे. सौरभ म्हात्रे असं गंभीर जखमी झालेल्या तरुणाचं नाव आहे. याप्रकरणी अंबरनाथ पोलिसांनी आरोपी रोहन उर्फ वाघ्या याच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. सध्या आरोपी फरार असून पोलिसांकडून त्याचा कसून शोध घेतला जातोय.

## अनधिकृत बांधकामावर पालिकेची कारवाई

**प्रतिनिधी**
■ **नवी मुंबई**

नवी मुंबई महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबंधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामांविरोधात नवी मुंबई महानगरपालिका अतिक्रमण विभागामार्फत आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व डॉ. राहुल गेठे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने तुर्भे व ऐरोली विभागात पाडकामाची कारवाई करण्यात आली.

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील तुर्भे विभागाअंतर्गत एपीएमसी, सेक्टर 19, तुर्भे, नवी मुंबई मधील मसाला मार्केट मधील पदपथावर अनधिकृतपणे लोखंडी ग्रीलवर पत्रा टाकुन पत्राशेड बांधलेबाबतची तक्रार या कार्यालयास प्राप्त झालेली होती.



सदर तक्रारीच्या अनुषंगाने स्थळ पाहणी करुन डी विभाग तुर्भे, नवी मुंबई महानगरपालिका यांचेमार्फत तोडक कारवाईच्या मोहिमेचे आयोजन करुन सदरचे अनधिकृत पत्राशेड निष्कासित करण्यात आलेले आहे.

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील अे विभाग बेलापूर कार्यालया अंतर्गत करावे गांव नवी मुंबई मंगेश यशवंत नाईक, मधूर नाईक, यांनी नवी मुंबई महानगरपालिकेची कोणतीही परवानगी न घेता घर क्र-843, से-36, करावे गाव, नवी मुंबई येथे अनधिकृतपणे बांधकाम सुरु केले होते.

मंगेश यशवंत नाईक, मधूर नाईक, घर क्र-843, से-36, करावे गाव, नवी मुंबई अनधिकृत बांधकामास अे विभाग बेलापूर कार्यालयामार्फत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 मधील कलम 54 अन्वये नोटीस बजाविण्यात आलेली होती. या धडक मोहिमेसाठी बेलापूर विभागाचे सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी शशिकांत तांडेल, मयुरेश पवार, कनिष्ठ अभियंता, तुर्भे विभागाचे सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी भरत धांडे, अमित पवार, कनिष्ठ अभियंता इत्यादी अधिकारी/कर्मचारी पोलिस बंदोबस्तासह उपस्थित होते.

## 22 वर्षीय विवाहितेची आत्महत्या

**प्रतिनिधी**
■ **दिवा**

दिवा शहरात २२ वर्षीय विवाहीतेने गळफास लावून आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. दिवा पूर्वेतील मुंब्रादेवी कॉलनी येथील विष्णूदादा अपार्टमेंट रूम क्र ५०७ मध्ये सदर घटना घडल्याचे उघडकीस आले आहे. अनिता अतिश बागडे (वय २२ वर्षे ) ही आपले पती अतिश सुधाकर बागडे (वय २८) व सासू सासरे यांसोबत रहात होती. घरात कोणीही नसतात अनिताने गळफास लावून आत्महत्या केल्याचे उघडकीस आले. प्रसंगी मुंब्रा पोलीस स्टेशन अंतर्गत दिवा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असून सदर मृतदेह



पुढील कारवाईसाठी कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात पाठविला आहे.

सदर घटनास्थळी कोणत्याही प्रकारची चिठ्ठी आढळून आली नसून आत्महत्येच कारण समजले नाही. प्रकरणी मुंब्रा पोलीस स्टेशन अंतर्गत दिवा पोलीस सदर आत्महत्या प्रकरणी पुढील पोलिस तपास सुरु आहे.

## बहिणीसाठी मुलाने केला सावत्र बापाचा खून

**प्रतिनिधी**
■ **नवी मुंबई**

बहिणीवर वाईट नजर ठेवणाऱ्या सावत्र वडिलांची तरुणाने हत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. कल्याणनजीकच्या टिटवाळा येथे ही घटना घडली आहे. टिटवाळ्यातील बल्यानी परिसरात ही घटना घडली. मित्राच्या मदतीने या तरुणाने आपल्या सावत्र बापाचा काटा काढला. याप्रकरणी टिटवाळा पोलिसांनी दोघांविरोधात गुन्हा दाखल करत त्यांना अटक केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कल्याणजवळील टिटवाळा परिसरातील बल्याणी गावात हार्डवेअरच्या दुकानात काम करणारा कदीर सिद्दीकी याची रविवारी रात्री निर्घृण हत्या करण्यात आली. या हत्येनंतर परिसरात एकच खळबळ उडाली होती . कदीर हा त्याच्या कुटुंबासोबत राहत होता. त्याने काही वर्षांपूर्वी वयाने मोठी असलेल्या महिलेशी लग्न केले होते. त्या महिलेला पहिल्या पतीपासून एक मुलगा आणि मुलगी आहे. या हत्येप्रकरणाच्या तपासादरम्यान टिटवाळा पोलिसांना धक्कादायक माहिती मिळाली. पोलिसांनी १२ तासांच्या आत या प्रकरणाचा छडा लावला. याप्रकरणी हत्या करण्यात आलेल्या कदीर यांचा सावत्र मुलगा कबीर सिद्दीकी आणि त्याचा साथीदार मित्र अल्ताफ शेख या दोघांना पोलिसांनी अटक केली. आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली.

## बदलापूरात अघोषित डम्पिंग

■ **बदलापूर**

कुळगांव बदलापूर नगरपालिका परिसरात ठिकठिकाणी घाणीचे साम्राज्य पसरले आहे. शहरात ठिकठिकाणी कचऱ्याचे ढीग दिसून येत आहेत, गावदेशी डीपी रस्त्यावर अघोषित डम्पिंग तयार होत आहे. सद्यस्थितीत पालिकेच्या आरोग्य विभागाच्याही कामकाजाचे तीनतेरा वाजलेले दिसून येत आहेत. शहरात ठिकठिकाणी, तसेच मुख्य रस्ता आणि बाजारपेठेत सर्वत्र कचरा साचलेला आहे. काही वर्षांपूर्वी सोयीचा म्हणून तयार झालेल्या गावदेवी स्टेशनकडील डीपी रोडवर अघोषित डम्पिंग तयार होत आहे. साचलेली घाण, कचरा यामुळे रस्त्यावरून येणाऱ्या-जाणाऱ्या नागरिकांना दुर्गंधीचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

## गवळी हत्येप्रकरणी पत्नी आणि प्रियकराला 16 ऑगस्टपर्यंत पोलिस कोठडी

**प्रतिनिधी**
■ **पनवेल**

उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाचे ज्येष्ठ नेते विष्णू गवळी यांची हत्या केल्याप्रकरणी त्यांची पत्नी अश्विनी गवळी आणि समीर ठाकरे या दोघांना खांदेश्वर पोलिसांनी अटक केली. या दोघांना न्यायालयात हजर केले असता त्यांना न्यायालयाने 16 ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. खांदा कॉलनी येथे राहणारे विष्णू गवळी यांची नऊ ऑगस्ट रोजी राहत्या घरात त्यांच्या पत्नीने हत्या केली. अनैतिक संबंधातून प्रियकर आणि पत्नी यांनी संगनमत करून हे कृत्य केले असल्याची माहिती खांदेश्वर पोलिसांनी दिली. यातील अश्विनी गवळी यांना रविवारी 11 ऑगस्ट रोजी पनवेल न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने त्यांना 16 ऑगस्ट पर्यंत पोलीस कोठडी सुनावली तर समीर ठाकरे याला सोमवार 12 ऑगस्ट रोजी पनवेल न्यायालयात हजर करण्यात आले. त्याला देखील न्यायालयाने 16 ऑगस्टपर्यंत पोलिस कोठडी सुनावली असल्याची माहिती खांदेश्वर पोलिसांनी दिली. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.

## कल्याणमधील शहाड, रामबाग परिसराचा पाणी पुरवठा रात्रीपासून बंद

**प्रतिनिधी**
■ **कल्याण**

कल्याण डोंबिवली पालिकेची उल्हास नदी काठच्या मोहिली येथील जलशुध्दीकरण केंद्राची कल्याण पश्चिमेतील शहाड, रामबाग, बिर्ला महाविद्यालय परिसर, जोशीबाग, मिलिंदनगर परिसराला पाणी पुरवठा करणाऱ्या जलवाहिनीला सोमवारी मध्यरात्री दीड वाजता गळती सुरू झाली आहे. या गळतीमुळे पुरेशा दाबाने कल्याण पश्चिमेच्या



काही भागाला पाणी पुरवठा होणार नसल्याने पश्चिमेतील काही भागाचा पाणी पुरवठा सोमवारी मध्यरात्रीपासून पाणी पुरवठा विभागाने बंद केला आहे.

मोहिली येथील जलशुध्दीकरण केंद्रातून कल्याण पश्चिमेच्या भोईरवाडी, बिर्ला महाविद्यालय रस्ता, शहाड, मिलिंदनगर, सह्याद्रीनगर, योगीधाम, सिंडीकेट, चिकणघर, कल्याण पूर्वेतील अशोकनगर, शिवाजीनगर, पश्चिम परिसराला मुख्य जलवाहिनीवरून सुमारे २० दशलक्ष लीटर दररोज पाणी पुरवठा केला जातो. या मुख्य जलवाहिनीला सोमवारी मध्यरात्री अचानक गळती सुरू झाली.

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता, दक्षिण मुंबई विद्युत विभाग, सा. बां. विभाग, मुंबई.**
ई निविदा सूचना क्रमांक : ११/२०२४-२५

कार्यकारी अभियंता, दक्षिण मुंबई विद्युत विभाग, मुंबई हे सा. बां. विभागात नोंदणीकृत / अनुभवी ठेकेदार यांचेकडून कामांच्या ऑन लाईन ई निविदा मागवित आहेत. को-या निविदा नमुना कार्यकारी अभियंता, https://mahapwd.gov.in या संकेत स्थळावर दिनांक १४.०८.२०२४ वेळ दुपारी ०१.00 ते २८.०८. २०२४ वेळ दुपारी ०१.०० पर्यंत ऑन लाईन डाऊनलोड करण्यांकरिता उपलब्ध होतील. तसेच शक्य असल्यास ऑन लाईन ई निविदा कार्यकारी अभियंता, दक्षिण मुंबई विद्युत विभाग, सा. बां. विभाग, बांधकाम भवन, फट, मुंबई हे दिनांक २९.०८.२०२४ वेळ दुपारी ०२.०० वाजता उघडतील. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार निम्न स्वाक्षरीकारांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

टीप : निविदेत भाग घेण्यासाठी निविदाकारांनी क्लास D व त्यावरील डिजिटल सिगनेचर आणि वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर निविदा संदर्भात सर्व दस्ताऐवज ऑन लाईन सादर करणे करिता स्वतः नाव नोंदणी करून घ्यावी. वरील निविदा सूचनेमध्ये एकूण ६३ कामे समाविष्ठ असून सविस्तर निविदा सूचना कार्यकारी अभियंता, दक्षिण मुंबई विद्युत विभाग, सा. बां. विभाग, मुंबई यांचे कार्यालयामध्ये सूचना फलकावर निविदा सूचना पहावयास मिळेल. कार्यकारी अभियंता यांना | विनंती केल्यास नोटीसची प्रत विनामुल्य मिळू शकेल.

**(उपरोक्त काम हे ३ ते १० लाखामधील आहे.)**

जा.क्र. काअ / दमुंविवि / निविदा / ४५६१/२०२४-२५
दि. ०८.०८. २०२४
डी.जी.आय.पी.आर/आरओसी२०२४-२५/क्र.५/सी१६१९

**स्वाक्षरी/-**
**कार्यकारी अभियंता,**
**दक्षिण मुंबई विद्युत विभाग,**
**सा. बां. विभाग, मुंबई.**

**मार्लेश्वर**
नागरी सहकारी पतपेढी मर्यादित
रजि. नं.: बी.ओ.एम. / डब्ल्यू. एफ. एम. आर. एस. आर. (सी.आर.) १९४७ सन २००२
५/२४१ कोहीनूर कंपाऊंड, महात्मा फुले रोड, नायगांव, गांधी चौक, दादर, मुंबई-१४,फोनः ९२२२०२४७५५

**२२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस**
**(फक्त सभासदांकरीता )**

सन्माननीय सभासद बंधू भगिनींनो,
आपल्या संस्थेची २२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दि. २४ ऑगस्ट २०२४ रोजी सायंकाळी ५.०० या प्रा. सुरेंद्र गावसकर सभागृह, २ रा मजला, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय बिल्डिंग, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय मार्ग, दादर (पूर्व), मुंबई ४०००१४. येथे आयोजित केलेली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे हि विनंती.

**सभेपुढील विषय**
१) दि. २६ ऑगस्ट २०२३ रोजीच्या २१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२) सन २०२३-२०२४ सालचा वार्षिक अहवाल, ताळेबंद पत्रक, नफा-तोटा पत्रक वाचून मंजुरी देणे.
३) सन २०२३-२०२४ च्या अहवाल सालातील नफा विभागणीस मंजुरी देणे.
४) सन २०२४ २०२५ सालच्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे.
५) सन २०२३ - २०२४ सालचा शासकीय लेखापरीक्षकांनी सादर केलेल्या लेखापरीक्षण अहवालास मंजुरी देणे व सन २०२२-२०२३ च्या लेखापरीक्षण अहवालाचा दोष दुरूस्ती अहवाल मंजुर करणे.
६) सन २०२४-२०२५ या कालावधीकरीता अंतर्गत व वैधानिक लेखापरीक्षकांची नेमणूक करणेबाबत.
७) मा. संचालक व त्यांचे नातेवाईक यांनी घेतलेल्या कर्जाचा तपशील जाहीर करणे.
८) संस्था पोटनियम दुरूस्ती प्रस्तावास मान्यता देणेबाबत.
९) संस्थेसाठी कायमस्वरूपी जागा खरेदी करणेबाबत.
१०) अनुपस्थित सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.
११) मा. अध्यक्षांच्या पुर्व परवानगीने आयत्यावेळी येणा-या इतर विषयांवर चर्चा करणे.

**स्थळ : मुंबई**
**दिनांक : ०५/०८/२०२४**

**आपला नम्र**
**श्री विजय भि. गुरव**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**

**विशेष सुचना :**
१) गणसंख्ये अभावी हि सभा स्थगित झाल्यास पोटनियमातील तरतुदीप्रमाणे सदर सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने घेण्यात येईल. या सभेला गणसंख्येचे बंधन असणार नाही.
२) ज्या सभासदांना काही सुचना अथवा शंका असल्यास लेखी स्वरूपात सभेच्या तारखेपूर्वी ७ दिवस अगोदर कार्यालयत सादर कराव्यात.
३) ज्या सभासदांचे राहण्याचे पत्ते, वारसाची नावे बदलली असतील त्यांनी त्याची नोंद कार्यालयीन दफ्तरी करून घ्यावी.
४) सर्व खातेदारांनी के. वाय. सी. (K.Y.C.) ची पूर्तता करावी.
५) सन २०२३- २०२४ सालच्या वार्षिक अहवालाची प्रत संस्थेच्या मुख्य कार्यालयात उपलब्ध आहे.

वसई विरार शहर महानगरपालिका
**घरोघरी तिरंगा अभियान**
दि.9 ऑगस्ट ते दि.15 ऑगस्ट
घरो घरी तिरंगा

क्रीडा व सांस्कृतिक विभाग आयोजित
श्री.शशांक कल्याणकर संचालित एक संगीत संध्या प्रस्तुत

**“स्वातंत्र्य” गाथा**

सर्व नागरिकांना प्रवेश विनामुल्य

देशभक्तीपर सुरेल गीतांचा कार्यक्रम
बुधवार, दि.14 ऑगस्ट 2024 रोजी सायं.6.00 वाजता
स्थळ- शेषवंशी क्षत्रीय भंडारी समाज विश्वस्त मंडळाचे श्री.अनंतराव ठाकूर नाट्यगृह, पारनाका, वसई गाव

सर्व नागरिकांना आग्रहाचे निमंत्रण

निमंत्रक
अनिलकुमार पवार (भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक, वसई विरार शहर महानगरपालिका
सर्व अधिकारी व कर्मचारी वृंद- वसई विरार शहर महानगरपालिका

**बृहन्मुंबई महानगरपालिका**

**वृक्ष प्राधिकरण**
**- जाहिर सूचना -**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ (जानेवारी २०१८ सुधारलेला) कलम ८ (३) (क) मधील तरतूदी नुसार **परिमंडळ - २** मधील 'एफ / उत्तर' विभागातील ०१ प्रस्ताव, जी / उत्तर' विभागातील ०१ प्रस्ताव म्हणजेच एकूण ०२ प्रस्ताव, म.न.पा. आयुक्त, अध्यक्ष वृक्ष प्राधीकरण / वृक्ष प्राधिकरण समिती यांचा मंजुरी प्राप्त झाले आहेत.

उपरोक्त प्रस्तांवामधील झाडे कापणे / पुनरोपित करणेबाबतचा तपशील हा म. न. पा. च्या **www.mcgm.Gov.in** संकेतस्थळावर, बृहन्मुंबई महानगरपालिकेविषयी विभाग आणि खाते खातेनिहाय माहिती पुस्तिका उद्याने व वृक्ष प्राधिकरण कागदपत्रे या लिंक वर उपलब्ध आहे. ९६३ (एफ / उत्तर ) ९६४ ( जी / उत्तर )

**उद्यान अधीक्षक यांचे कार्यालय,**
पेंग्विन इमारत, २ रा माळा,
वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग,
भायखळा (पूर्व) मुंबई - 400027.
दुरध्वनी क्र. २३७४२१६२ Email-sggardens@mcgm.gov.in

पीआरओ/९४३/जाही/२०२४-२५
स्वमर्जीने औषधोपचार करू नका.

**स्वाक्षरी/-**
**उद्यान अधीक्षक**
**व वृक्ष अधिकारी**

# रेल्वे रुळावर अडकलेली स्कूल बस थोडक्यात बचावली

**सांगली :** सांगलीमध्ये स्कूल बस आणि रेल्वेचा अपघात थोडक्यात हुकल्याचं समोर आलंय. भरधाव स्कूल बस रेल्वेचं गेट तोडून रुळावर अडकली होती. तेवढ्यात समोरून भरधाव वेगात रेल्वे येत होती. परंतु बसमध्ये विद्यार्थी नसल्याने या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाहीये. सांगलीच्या पलूसमधल्या विठ्ठलवाडी रेल्वेगेटवर ही घटना घडली आहे. चालकाचा ताबा सुटल्यामुळे भरधाव स्कूल बस रेल्वे गेटला जाऊन धडकली आणि थेट रुळावर जाऊन अडकली होती. आमणापूर- विठ्ठलवाडी रेल्वे गेटवर गेट लावत असताना सकाळी सातच्या सुमारास ही घटना घडलीय. थेट बस थेट रुळावर जाऊन अडकली होती.दरम्यान याचवेळी या ठिकाणाहून जाणारी डेमो देखील काही अंतरावर दाखल झाली. पण, गेटमन आणि नागरिकांनी ती गाडी तात्काळ थांबवली. दुसऱ्या ट्रॅकवरुन रेल्वे वाहतूक सुरू करण्यात आली होती. दरम्यान रुळावरून अडकलेली बस नागरिकांनी मिळून हटवत रेल्वे रूळ मार्ग मोकळा केला.



## म ह त्वा चे

### भरधाव डंपरने महिलेला चिरडले

**अकोला :** अकोल्यामध्ये भरधाव डंपरने महिलेला चिरडल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. महिलेच्या दोन्ही पायांवरून डंपर गेला. अकोला शहरातील मुर्तीजापूर मार्गावर ही घटना घडली. अपघातामध्ये गंभीर जखमी झालेल्या महिलेला उपचारासाठी अकोल्याच्या सर्वोपचार रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अपघाताची ही घटना सीसीटीव्हीत कैद झाली आहे. हा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. खदान पोलिस ठाण्यात या अपघाताची नोंद करण्यात आली आहे. अकोला शहरातील मुर्तीजापूर मार्गावर आज सकाळी १० वाजताच्या सुमारास हा अपघात झाला. राष्ट्रीय महामार्गावरील मूर्तिजापूर रस्त्यावरील महाकाली हॉटेलजवळ डंपरने सायकलवरून जाणाऱ्या महिलेला धडक दिली. महिला डंपरच्या पुढच्या चाकाखाली आली. महिलेच्या दोन्ही पायांवर डंपरचे चाक गेले. हा अपघात सीसीटीव्हीत कैद झाला आहे. महिलेच्या दोन्ही पायांवरून डंपरचे चाक गेल्याचे स्पष्टपणे दिसत आहे. चालकाने अचानक डंपर वळवल्यामुळे महिला चाकाखाली आली.

### ड्रग्जचा 1 कोटींचा साठा जप्त, तिघे अटकेत

**पुणे :** पुणे ड्रग्ज प्रकरणात पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. याप्रकरणात आणखी एकाला पोलिसांनी अटक केली आहे. अटक केलेला आरोपी कुरिअरद्वारे ड्रग्ज विकत असल्याची माहिती उघड झाली आहे. आरोपी पुणे शहरासह पुण्याच्या बाहेर देखील ड्रग्जची विक्री करत होता. विश्रांतीवाडीतून आरोपीला अटक करण्यात आली असून त्याच्याकडून मोठा ड्रग्जचा साठा जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी तिघांना अटक करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पुणे ड्रग्स प्रकरणात आणखी एका आरोपीला पुणे पोलिसांनी अटक केली. अटक केलेला आरोपी कुरिअरने ड्रग्स विकत असल्याची माहिती उघड झाली आहे. गेल्या अनेक दिवसांपासून हा आरोपी कुरिअरने ड्रग्सचा पुरवठा करत होता. आरोपीकडून कुरिअर सेवेच्या माध्यमातून ड्रग्सची विक्री सुरू होती. पुणे शहरासह पुण्याच्या बाहेर देखील आरोपी कुरिअरने ड्रग्ज विकत होता. विश्वनाथ कोनापूरे असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. पुण्यातील विश्रांतवाडी येथून पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने त्याला अटक केली आणि त्याच्याकडून तब्बल १ कोटी रुपयांचा ड्रग्सचा साठा जप्त केली.

### कोल्हापुरातील उद्योजकाच्या घरात चोरीचा थरार

**कोल्हापूर :** कोल्हापुरातील शाहूपुरी इथं राहणारे तरुण उद्योजक संदीप नष्टे यांना काल रात्री एका अज्ञाताने घरात घुसून बंदुकीचा धाक दाखविला. स्वतः पोलीस असल्याची बतावणी करत या अज्ञाताने संदीप नष्टे यांच्या घरात प्रवेश केला. तसेच संदीप यांना तुमच्याबद्दल ठाणे शहरतील पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद झाला असून याबद्दल सेटलमेंट करावी लागेल अशी बतावणी दिली. तसेच संदीप नष्टे यांचे आई-वडील , पत्नी, मुलगा आणि मुलगी यांना एकत्र हॉलमध्ये बोलावून सर्वांवर बंदूक रोखली. संदीप नष्टे यांच्या बद्दल अनेक तक्रारी असल्याचं हा अज्ञात व्यक्ती त्यांच्या कुटुंबीयांना सांगत होता तसेच या व्यक्तीने या सर्वांचे मोबाईल काढून घेऊन सर्वांना जीवे मारण्याची धमकी दिली.

# अरे वेड्यांनो, भाऊबीज दिली तर ती परत घेतली जात नाही

## फडणवीसांनी आ. रवी राणा आणि आ. महेश शिंदेंचा घेतला खरपूस समाचार

प्रतिनिधी
■ जळगाव

लाडकी बहीण योजनेवरून काहीजण म्हणाले की पैसे परत घेतले जातील, अरे वेड्यांनो भाऊबीज दिली तर ती परत घेतली जात नाही, असं स्पष्टीकरण राज्याचे उपमुख्यंत्री देवेंद्र फडणवीसांनी केले. तर त्यांनी आमदार रवी राणा व शिवसेनेचे आमदार महेश शिंदे यांची अप्रत्यक्ष कानउघाडणी केली. जळगावात मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या कार्यक्रमात ते बोलत होते.

पुढे बोलताना फडणवीस म्हणाले की, कुणाचा बापही लाडकी बहीण योजना बंद करू शकणार नाही.



राज्य सरकारने सुरू केलेल्या लाडकी बहीण योजनेवरून विरोधकांनी अनेक प्रश्न विचारले आहेत. ही योजना फक्त निवडणुकीपुरती असल्याची टीकाही केली. त्यातच महायुतीमधील आमदार रवी राणा आणि शिंदेंचे आमदार महेश शिंदे यांनी केलेल्या वक्तव्यावरून वाद निर्माण झाला होता. त्यावर देवेंद्र फडणवीसांनी स्पष्टीकरण देत, या योजनेचे पैसे परत घेतले जाणार नसल्याचे स्पष्टीकरण केले.

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून आपण निर्णय घेतला तर कुणाच्या पोटात दुखायला लागलं. कुणी म्हणालं लाच देताय का, कुणी म्हणालं मतं खरेदी करताय. अरे नालायकांनो, कुणीही बहिणीचं प्रेम विकत घेऊ शकत नाही. प्रसंगी त्या उपाशी राहतील मात्र भावाला जेऊ घालतील. कुणी म्हणालं की 1500 रुपये माघारी घेऊ. अरे वेड्यांनो, दिलेली भाऊबीज परत घेत नाहीत.

### मुख्यमंत्र्यांच्या ताफ्यातील गाड्या आपडल्या एकमेकांमवर

*महायुतीने आज (मंगळवार) मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियानांतर्गत जळगावात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या अनुषंगाने भव्य मेळाव्याचे आयोजन केले आहे. त्याच दरम्यान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे मेळाव्यासाठी जळगाव विमानतळावर पोहचल्यानंतर तिथून मेळाव्याच्या ठिकाणी जात होते. त्यावेळी त्यांच्या वाहनांच्या ताफ्यातील चार वाहने एकमेकांवर आदळल्याने अपघात झाला आहे. सुदैवाने यामध्ये कोणतीही जीवितहानी झाली नाही. जळगाव विमानतळावरून मेळाव्याच्या ठिकाणी जात असताना विमानतळ परिसरातच हा अपघात झाला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे मेळाव्यासाठी जळगाव विमानतळावर दाखल झाल्यानंतर तिथून मेळाव्याच्या ठिकाणी जात असताना त्यांच्या ताफ्यातील चार वाहने एकमेकांवर आदळली आहेत. जळगाव विमानतळावरून मेळाव्याच्या ठिकाणी जात असताना विमानतळ परिसरातच हा अपघात झाल्याची माहिती आहे. सुदैवाने या अपघातात कोणतीही जिवितहानी झालेली नाही.*

# शरद पवारांनी मराठा समाजाचे वाटोळे केले...

## मनोज जरांगेंचं टीकास्त्र



प्रतिनिधी
■ शिर्डी / नाशिक

शरद पवारांनी मराठा समाजाचे आजवर वाटोळे केले. त्यांनी सुचवलेला पन्नास टक्क्यांवरील आरक्षणाच्या मार्गाशी आमचा संबंध नाही. तो त्यांनीच कसा देता येईल याबद्दल स्पष्ट करावे, अशा शब्दांत मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांनी आज ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्यावर टीकास्त्र सोडले. पवारांना आजवर जमले नाही म्हणून तर आम्ही तुमच्याकडे मागत आहोत, असे सांगत त्यांनी महायुतीला विचारणा केली आहे.

जरांगे यांच्या शांतता रॅलीचे सोमवारी रात्री उशिरा शिर्डीत आगमन झाले. आज मंगळवारी सकाळी नाशिकला जाण्यापूर्वी जरांगे यांनी साई समाधीचे दर्शन घेतले. यानंतर पत्रकारांशी बोलताना जरांगे यांनी पवारांवर वरील टीका केली. पवार यांनी काल ५० टक्क्यांपेक्षा अधिक आरक्षण दिल्याशिवाय मराठा आरक्षणाचा प्रश्न सुटणार नाही. आरक्षणाची टक्केवारी वाढवणे हाच त्याला मार्ग असून त्यासाठी राजकीय मतभेद बाजूला ठेवून सहकार्याची भूमिका जाहीर केली आहे. पवारांच्या या विधानाचा संदर्भ देत जरांगे यांनी त्यांच्यावर टीका केली आहे.

जरांगे म्हणाले, की मराठा आरक्षणाचा हा प्रश्न अगोदरच्या सरकारांनी देखील भिजत ठेवला. महाविकास आघाडीतील पक्षांनी याबाबत काहीही केले नाही. विशेषत: पवारांनी देखील या प्रश्नावर काही न करता समाजाचे वाटोळे केले. परंतु हे पक्ष असे वागले म्हणून तर मराठा समाज महायुतीकडे आरक्षण मागतो आहे. पण तुम्हीही तसेच वागत आहात. साधे मराठा आंदोलकांवरील गुन्हे मागे घेऊ असे म्हटले होते. पण आज ११ महिने झाले. तरी संपूर्ण गुन्हे मागे घेतलेले नाहीत. या वेळी जरांगे यांनी महायुतीतील मराठा नेते नारायण राणे, राधाकृष्ण विखे, प्रवीण दरेकर यांच्यावरही टीका केली. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर सातत्याने टीका करणाऱ्या जरांगे यांनी येथेही त्यांच्यावर हल्लाबोल केला. त्यांनी आरक्षण द्यावे, मग आम्ही त्यांच्यावर टीका करणे बंद करू असे ते म्हणाले.

# अखेर खेडकरांनी भीतीपोटी थर्मोव्हेरिटा कंपनीचा कर भरला

प्रतिनिधी
■ पुणे

बडतर्फ ट्रेनी आयएएस अधिकारी पूजा खेडकरने अखेर थर्मोव्हेरिटा इंजिनिअरिंग कंपनीचा थकीत कर अदा केला आहे. याच कंपनीचा पत्ता वापरून पूजा खेडकरने अपंगत्वाचे प्रमाणपत्र मिळवले होते. कंपनी सील केल्यानंतर 21 दिवसांमध्ये कर अदा न केल्यास मालमत्तेचा लिलाव केला जातो. त्यामुळे खेडकर कुटुंबाकडून भीतीपोटी हा कर अदा करण्यात आला आहे.

गेल्या तीन वर्षांचा 2 लाख 87 हजार 591 रुपयांचा मालमत्ता कर तर 1 लाख 78 हजार 680 रुपयांची पाणीपट्टी रोख स्वरुपात अदा करण्यात आली आहे. खेडकर कुटुंबीयांनी किमान कंपनीच्या लिलावाची कारवाई तरी रोखली आहे. रोख रकमेच्या रुपात पिंपरी पालिकेचा थकलेला कर अखेर अदाकरण्यात आला आहे.

वादग्रस्त आयएएस पूजा खेडकर यांनी दिव्यांग प्रमाणपत्र मिळवण्यासाठी याच थर्मोव्हेरिटा कंपनीचा पत्ता रहिवासी पत्ता म्हणून दिला होता. त्यानंतर पिंपरी पालिकेचा कर थकवल्याप्रकरणी थर्मोव्हेरिटा कंपनीवर कारवाईचा बडगा उगारण्यात आला होता. 2 लाखांचा कर थकविला म्हणून ही कंपनी सील करण्यात आली होती.

या कंपनीवर कारवाई झाली तेव्हा पिंपरी पालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे म्हणाले होते "कंपनी ज्या भागात येते, तो भाग रेड झोनमध्ये येतो, त्यामुळे त्या भागातील सर्व कंपन्या अनधिकृत आहेत. त्यामुळे या कंपनीवर कारवाई केली.

# रत्नागिरीतील देउडमधील कातळशिल्प अखेर संरक्षित स्मारक

प्रतिनिधी
■ रत्नागिरी

कोकणात अनेक ऐतिहासिक स्थानं आहेत. हा ऐतिहासिक ठेवा जपण्यासाठी अनेक स्तरावर प्रयत्न केले जातात. कोकणातील अनेक भागात कातळशिल्प मोठ्या प्रमाणात आढळतात. अश्मयुगीन काळातील ही काताळशिल्प म्हणजे जणू गुढच आहे. इतिहासपूर्व काळातील मानवी संस्कृतीच्या या पाउलखुणा आहेत. कोकणातील कातळशिल्प ही संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्यात आले आहे. त्यात आता आणखी एका कातळशिल्पाची भर पडली आहे. राज्य सरकारने रत्नागिरी जिल्ह्यातील देउड कातळशिल्प संरक्षित स्मारक म्हणून घोषित केले आहे. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाने यासंदर्भात अधिसूचना



जारी केली आहे.

रत्नागिरीसह राजापूर तालुक्यातील अश्मयुगीन कातळशिल्प आढळून आली आहेत. राज्याच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य मंत्रालयाच्या पुरातत्व आणि वस्तुसंग्रहालय संचालनायाच्यामार्फत कातळशिल्प परिसराचा व्यवस्थापन आणि विकास उपक्रम हाती घेण्यात आला आहे. त्याअंतर्गत कातळशिल्प संरक्षित स्मारक म्हणून जाहीर केले जात आहेत.

रत्नागिरी जिल्ह्यातील देउड येथे प्रसाद शंकर आपडे यांच्यासह काहींच्या मालकीच्या जागेत कातळशिल्प आढळून आले होते. हे कोरलेले मध्याश्मयुगीन कातळशिल्प आहे. या कातळावर एकशिंगी गेंडा, गाढव, वानर, हरिण आणि इतर पावलांचे ठसे रेखाटण्यात आले आहे. एकूण 10 बाय 10 चौरस मीटर असे एकूण 100 चौरस मीटर इतके आहेत. कातळशिल्प परिसरातील 310 चौरस मीटर क्षेत्रफळ जागा संरक्षित स्मारक म्हणून घोषित केली आहे.

# येत्या शुक्रवारी पुण्यात पाणीपुरवठा राहणार बंद

प्रतिनिधी
■ पुणे

पुणेकरांसाठी महत्त्वाची बातमी आहे. पुणे शहराच्या निम्म्या भागाचा पाणीपुरवठा शुक्रवारी बंद राहणार आहे. १६ ऑगस्ट रोजी पुण्यातील अनेक भागातील पाणीपुरवठा बंद करण्यात येणार आहे. त्यामुळे पुणेकरांनी पाण्याचा गैरवापर करु नये, पाणी साठवून ठेवावे, असे



आवाहन केले जात आहे.

पुणे शहरातील ससून रुग्णालय परिसरातील पाण्याची मुख्य वाहिनी फुटली आहे. पाण्याची मुख्य वाहिनी फुटल्याने मोठ्या प्रमाणात पाणी गळती झाली आहे. त्यामुळे खूप जास्त पाणी वाया गेले आहे. याच जलवाहिनी दुरुस्तीचे काम शुक्रवारी करण्यात येणार आहे. त्यामुळेच शुक्रवारी पुणे शहरातील निम्म्याहून अधिक भागात पाणीपुरवठा पूर्णपणे बंद राहणार आहे. तर शनिवारी कमी दाबाने पाणीपुरवठा केला जाणार आहे.

# विद्यार्थ्यांनी हस्तकौशल्यातून साकारल्या आकर्षक राख्या

## पेंडूर न्यू इंग्लिश स्कूलच्या सभागृहात प्रदर्शन आणि विक्री

प्रतिनिधी
■ मालवण

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्याच्या उद्देशाने मालवण तालुक्यातील पेंडूर माध्यमिक शिक्षण संस्था नेहमी विविध उपक्रम राबवते. यावेळी न्यू इंग्लिश स्कूल मधील विद्यार्थ्यांनी हस्त कौशल्यातून आकर्षक राख्या आणि नागोबा तयार केले. शाळेच्या सभागृहात मांडण्यात आलेल्या प्रदर्शनाची पाहणी करताना ग्रामस्थांनी त्याची खरेदी ही केली. यावेळी



श्रमसाफल्य, नवनिर्मितीचा आनंद बाल व्यावसायिकांच्या चेहऱ्यावर दिसून येत होता.

न्यू इंग्लिश स्कूल पेंडूर या प्रशालेत कौशल्य निर्मिती, विक्री कौशल्य, प्रभुत्व संपादन या अंतर्गत मुलींसाठी राख्या बनविणे उपक्रम घेण्यात आला. यात इयत्ता पाचवी ते आठवी मधील मुलींनी सहभाग दर्शवला. बाजारभावापेक्षा कमी म्हणजेच २ रुपयांपासून ते १५ रुपयांपर्यंत एवढ्या माफक किमतीत राख्यांची विक्री केली. इयत्ता ८ वी ते १०वी पर्यंतच्या मुलांसाठी नागनिर्मिती व विक्री हा उपक्रम घेण्यात आला. मुलांनीही अगदी माफक किमतीत म्हणजेच ३० ते ५० अशी नागोबाची विक्री केली.

# राखेला समस्या न मानता संधी समजा - डॉ. धनंजय सावळकर

## राख उपयोगिता शिबीर यशस्वीरीत्या संपन्न



प्रतिनिधी
■ नागपूर

आपण निसर्गाचे रक्षण केले तर निसर्ग आपले रक्षण करेल अन्यथा अवकाळी निसर्ग अवकृपा पाहायला मिळेल. त्यामुळे नैसर्गिक संसाधनांचा सजगतेने वापर करायला हवा,राखेला समस्या न मानता संधी समजायला हवे. महानिर्मिती राख धोरण २०२४ नुसार शासकीय, निमशासकीय, सार्वजनिक उपक्रमाच्या रस्ता कामांसाठी राख उचल करणाऱ्या संस्थांना रु.१००/- प्रती टन आर्थिक सहाय्य करण्याचे महानिर्मितीचे धोरण असल्याचे त्यांनी सांगितले. सोबतच महानिर्मितीच्या कोराडी-खापरखेडा-चंद्रपूर वीज केंद्रात राख उचल करण्यासाठी अत्याधुनिक सोयी सुविधा उभारणार असल्याचे डॉ. धनंजय सावळकर यांनी प्रतिपादन केले. ते नागपुरात आयोजित महानिर्मितीच्या राख उपयोगिता शिबिराच्या उद्घाटन सत्रात बोलत होते.

आगामी २० वर्षे औष्णिक विद्युत केंद्रांची गरज भासणार असून जसजशी विजेची मागणी वाढत आहे त्याप्रमाणात कोळशाचा वापर देखील वाढत आहे. राखेला संधी समजले तर अनेक उपयोग आहेत, राखेतून पैसा कमविणे हा महानिर्मितीचा उद्देश नसून राखेचा शास्त्रीय उपयोग करून नवनवीन संधी आणि रोजगारासोबतच विकासाची संधी उपलब्ध होऊ शकते. राखेचा जास्तीत जास्त वापर करा "तुमची मदत करण्यासाठी आम्हाला मदत करा" असे डॉ.सावळकर यांनी राख उचल करणाऱ्या ग्राहकांना आवाहन केले.

शिबिराच्या अध्यक्षस्थानी महानिर्मितीचे संचालक(इंधन) डॉ.धनंजय सावळकर, प्रमुख अतिथी म्हणून कार्यकारी संचालक पंकज सपाटे, डॉ. नितीन वाघ तसेच प्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ हेमा देशपांडे प्रामुख्याने मंचावर उपस्थित होते. प्रारंभी राख उपयोगिता आधारित चित्रफित दाखविण्यात आली. प्रास्ताविकातून डॉ. नितीन वाघ यांनी सांगितले कि, पर्यावरणीय बदलते निकष, वने, पर्यावरण आणि वातावरण बदल मंत्रालय भारत सरकारच्या अधिसूचनेनुसार महानिर्मितीने राख धोरण २०२४ नुसार शास्त्रीयदृष्ट्या जास्तीत जास्त राखेची उचल व्हावी म्हणून महानिर्मितीने आर्थिक सहकार्याची भूमिका आपल्या धोरणात स्वीकारली आहे.

## सुपारीबाजची टीका करणारे झळकले पोस्टर

# ठाकरे बधूंतील संघर्षाची धग अहमदनगर जिल्ह्यात

प्रतिनिधी
■ अहमदनगर

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर आलेले असताना त्यांच्या गाडी समोर सूपाऱ्या टाकून आंदोलन करण्यात आले. यावर राज ठाकरे यांनी माझ्या नादी लागू नका असा इशारा दिला होता. यानंतर अवघ्या काही तासांतच मनसैनिकांनी ठाणे येथे उद्धव ठाकरे यांच्या कार्यक्रमाच्या आधी त्यांच्या गाडीच्या ताफ्यावर नारळ फेक करून आंदोलन केले. यानंतर याचे पडसाद कोल्हापूरमध्ये उमटले. मनसेचे बॅनर




उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या शिवसैनिकांनी फाडले.

याचे लोन आता अहमदनगर जिल्ह्यामध्ये पोहोचले आहेत. अहमदनगर जिल्ह्यातील कर्जत येथे बेन रोडवर मोठ्या प्रमाणामध्ये सुपारी बाज असे बॅनर लावण्यात आले आहेत. त्यामुळे हा संघर्ष आता नगर जिल्ह्यामध्ये पोहोचला आहे. या मोठ्या फ्लेक्सवर 'लवकरच घेऊन येत आहेत, पुढील अपडेट १६ ऑगस्ट या दिवशी' असे लिहिले असून सुपारी व खाटाचे चित्र काढण्यात आले आहे. ह्या बॅनरची कर्जत मध्ये जोरदार चर्चा सुरू झाली आहे. हे बॅनर कोणी लावले याबाबत नगरपंचायतचे मुख्याधिकारी किंवा कार्यालयामध्ये विचारणा केली असता त्यांनी याबाबत आम्हाला काहीही माहिती नाही, असे सांगितले. सुपारी बाज या बॅनर वरून जोरदार चर्चा मात्र सुरू आहे.

## लातूरमध्ये भीषण अपघाताचा थरार

# जेसीबी चालकाने 10 ते 12 जणांना उडवलं, एक ठार

प्रतिनिधी
■ लातूर

राज्यात ड्रंक अँड ड्राइव्हच्या घटनेत दिवसेंदिवस वाढ होत आहे. मुंबई, पुण्यानंतर आता लातूरमध्ये मद्यधुंद वाहन चालकाने १० ते १२ जणांना उडवल्याची घटना घडली आहे. लातूरच्या कन्हरी चौकात सोमवारी रात्री उशिरा ही अपघाताची घटना घडली आहे. या भीषण अपघातात एक जण जागीच ठार झाला आहे. या घटनेने सर्वत्र एकच खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, लातूरमध्ये भीषण अपघाताची घटना घडली. लातूरमध्ये मद्यधुंद अवस्थेत वाहन चालवून चालकाने १० ते १२ जणांना उडवलं आहे. या भीषण अपघातात एका तरुणाचा जागीच मृत्यू झाला आहे. जालिंदर मुळे या तरुणाचा मृत्यू झाला आहे. भाजीपाला आणण्यासाठी गेलेल्या जालिंदर मुळे या तरुणाचा जागीच मृत्यू झाला आहे.

# खासदार वसंत चव्हाण यांची प्रकृती बिघडली

■ नांदेड

नांदेडचे काँग्रेस खासदार वसंत चव्हाण यांना श्वास घेण्यास अडचण होत असल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं. वसंत चव्हाण यांचा अचानक बीपीदेखील कमी झाला. तसेच अस्वस्थ देखील वाटू लागलं. त्यामुळे त्यांच्या नातेवाईकांनी त्यांना तातडीने नांदेडच्या खाजगी रुग्णालयात दाखल केलं. संबंधित रुग्णालयात डॉक्टरांनी वसंत चव्हाण यांच्यावर उपचार केले. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार उपचारासाठी एअर ॲम्ब्युलन्सने हैद्राबाद येथील रुग्णालयात हलवण्यात येणार असल्याची माहिती मिळत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, किम्स हॉस्पिटलमध्ये वसंत चव्हाण यांना दाखल करण्यात येणार आहे. त्यांच्या उपचारासाठी सर्व तयारी केली आहे.

# राजे फाऊंडेशनने राबवली किल्ले संवर्धन व वृक्षारोपण मोहिम

## तोरणा किल्ल्याच्या साफसफाईसोबत लावली झाडे

प्रतिनिधी
■ पुणे

'राजे फाऊंडेशन'(महाराष्ट्र राज्य) ही संस्था २०१२ पासून मुंबई तसेच महाराष्ट्रात कार्यरत आहे, महाराष्ट्राचे आराध्दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचे शिवविचार व शिवसंस्कार यांचा महाराष्ट्रभर प्रसार करणे हे संस्थेचे मूळ ध्येय आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांचे गड व किल्ले हे महाराष्ट्राचे वैभव आहे, तो आपला इतिहास आहे, त्याबाबत आपली पुढची पिढी जागृत असायला हवी, त्यासाठी महाराजांचे गड व किल्ले यांची जपणूक ही व्हायलाच हवी हा विचार समोर ठेवून संस्था किल्ले संवर्धन ही मोहीम हाती घेत असते.त्यासाठी यावर्षी छत्रपती शिवरायांनी वयाच्या अवघ्या १६ व्या वर्षी मुघलांकडून किल्ले श्री तोरणा (प्रचंडगड) हा किल्ला जिंकून स्वराज्याचे तोरण बांधले होते. आणि तोच किल्ला या



संस्थेने मोहिमेसाठी यावर्षी सौदायिकरण आणि वृक्षारोपण मोहिमेसाठी निश्चित केलेला आहे. तेथे स्वच्छता असणे फार गरजेचे आहे.

राजे फाऊंडेशन महाराष्ट्र राज्य आयोजित किल्ले संवर्धन व वृक्ष रोपण मोहिमेत मुंबई , पुणे, येथून जवळपास ५० शिलेदार यावेळी उपस्थित होते. त्यात संस्थेचे अध्यक्ष - सिद्धांत अशोक पिसाळ, उपाध्यक्ष - योषित नागावकर,मयुरेश पाटील, सचिव - रोहित अशोक पिसाळ, उपसचिव- संतोष पवार खजिनदार - पंकज कोल्हे, उपखजिनदार - अमित जाधव, कार्यकारणी सदस्य - अशोक कुडले, गजानन सावंत, प्रवीण पड्याल , सुदर्शन देसाई, प्रशांत गुप्ता, महादेव जगदाळे, रवींद्र सडेकर, निलेश कांबळे, अनिकेत पवार हे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते .या सर्व शिलेदारांनी किल्ले तोरणा चढून सर केला. गड सर करत असताना जी पायवाट आहे ,ती साफ करण्यात आली, कचरा उचलून गोळा केला. गडावर पोचल्यावर महादेवाचे मंदिर दर्शन घेण्यात आले. किल्ल्याच्या पायथ्याशी वेल्हे गाव परिसरात आणि इतरत्र जवळपास ५० झाडे लावण्यात आली. त्यात प्रामुख्याने फळझाडे, फुलझाडे वटवृक्ष व औषधी वनस्पती यांचा समावेश होता. यावेळी वनपरिक्षेत्र अधिकारी वेल्हे गोविंद लंगोटे साहेब ,वनपाल वैशाली हाडवळे मॅडम, वनरक्षक सारिका बैलुमे, भाग्यश्री जगताप आणि स्वप्निल उंबरकर यांच्या मार्गदर्शनाखाली वृक्षारोपण कार्यक्रम करण्यात आला. विशेष म्हणजे रविवार सुट्टीचा दिवस असून देखील सुद्धा सर्व वनरक्षक अधिकारी शासकीय कर्मचारी मोहिमेसाठी स्वतः जातीने उपस्थित होते. . बुधला माची व हत्तीचा बुरुज येथील वाढलेले गवत आणि शेवाळे साफ करण्यात आले तेथे पाण्याचा निचरा होत नव्हता पाणी एका जागी साचून होते त्याला आउटलेट काढण्यात आला.

## आयुष पाटणकरला 'सिंधुदुर्ग गुणवंत खेळाडू' पुरस्कार

**सावंतवाडी :** महाराष्ट्र राज्य क्रीडा आणि युवक सेवा संचालनालय अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, सिंधुदुर्ग द्वारा सन 2023-24 चा 'सिंधुदुर्ग पुरुष गुणवंत खेळाडू' पुरस्कार सावंतवाडी येथील आयुष दत्तप्रसाद पाटणकर याला जाहीर झाला आहे. येत्या स्वातंत्र्यदिनी सिंधुदुर्ग जिल्ह्याचे पालकमंत्री आणि राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते आयुषला हा पुरस्कार प्रदान केला जाणार आहे. राज्यस्तरीय नेमबाजी स्पर्धेत आयुषने सुवर्ण पदक मिळवून भोपाळ येथे झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्र राज्याचं नेतृत्व केलं होतं. राज्यस्तरीय स्पर्धेत आयुष याला 400 पैकी 378 गुण मिळाले होते. यापूर्वी दिल्ली आणि भोपाळ येथे झालेल्या शूटींग असोसिएशनच्या स्पर्धेत आयुषला 'राष्ट्रीय खेळाडू' घोषित करण्यात आलंय. महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनसह महाराष्ट्र राज्य ऑलिम्पिक स्पर्धा आयोजित करण्याचा निर्णय घेतला होता. या स्पर्धेत नेमबाजी या खेळाचाही समावेश करण्यात आला. या स्पर्धेत आंतरराष्ट्रीय खेळाडू अंजली भागवत, तेजस्विनी सावंत या सहभागी झाल्या होत्या.



पॅरिस पॅरालिम्पिक २०२४ स्पर्धेआधीच भारताला धक्का

## टोकियोत सुवर्ण पदक जिंकणाऱ्या खेळाडूवर बंदी

**वृत्तसंस्था**
■ **पॅरिस**

पॅरिस ऑलिम्पिक २०२४ संपल्यानंतर आता वेध लागले आहेत ते पॅरालिम्पिक स्पर्धेचे. कारण, गेल्यावर्षी टोकियो येथे झालेल्या पॅरालिम्पिक स्पर्धेत भारताने तब्बल १९ पदके जिंकून इतिहास रचला होता. यावेळी भाताच्या नावावर तब्बल ५ सुवर्ण पदके होती. मात्र, ही स्पर्धा सुरु होण्याआधीच भारताला मोठा धक्का बसला आहे. कारण, टोकियो पॅरालिम्पिक २०२० मध्ये सुवर्ण पदक जिंकणाऱ्या प्रमोद भगतवर १८ महिन्यांची बंदी घालण्यात आली आहे.

विश्व बॅडमिंटन संघाने (बीडब्ल्यूएफ) जाहीर केलेल्या निवेदनात डोपिंगविरोधी नियमांचे उल्लंघन केल्याने प्रमोद भगतवर १८ महिन्यांसाठी बंदी घालण्यात आल्याचे सांगितले आहे. त्यामुळे पॅरालिम्पिक २०२४ स्पर्धेआधी भारताला हा मोठा धक्का मानला जात आहे. या निवेदनात सांगण्यात आले आहे की, १ मार्च रोजी



आंतरराष्ट्रीय क्रीडा लवादाच्या (CAS) डोपिंग विरोधी विभागाने प्रमोद भगतला १२ महिन्यांच्या आत ३ वेळा योग्य माहिती न दिल्याबद्दल डोपिंग विरोधी नियमांचे उल्लंघन केल्याचे आढळले. त्यामुळे त्याच्यावर १८ महिन्यांसाठी बंदी घालण्यात आली आहे.२९ जुलैला सीएएस अपील विभागाने प्रमोद भगतचे अपील फेटाळले. तसेच, १ मार्चला खटल्यातील डोपिंग विरोधी विभागाच्या निर्णयाची पुष्टी केली. या वर्षाच्या सुरुवातीला प्रमोद भगतने थायलंड पॅरा बॅडमिंटन वर्ल्ड चॅम्पियनशिप २०२४ मध्ये आपले सुवर्णपदक पटकावले आहे.प्रमोद भगत हा भारतातील पॅरा बॅडमिंटनपटू आहे. तो सध्या पॅरा बॅडमिंटन पुरुषांच्या एसएल ३ गटामध्ये दुसऱ्या स्थानवर आहे.

पॅरिस ऑलिम्पिक 2024

## लॉस एंजेलिस ऑलिम्पिकमध्ये क्रिकेटचे पुनरागमन

### लॅक्रॉस शेवटचा 1908 मध्ये खेळला, फ्लॅग फुटबॉल डेब्यू करणार

**वृत्तसंस्था**
■ **लॉस एंजेलिस**

पॅरिस ऑलिम्पिकच्या समारोप समारंभात 2028 मध्ये होणाऱ्या ऑलिम्पिकचे यजमान लॉस एंजेलिसकडे प्रसिद्ध पाच रिंग असलेला ऑलिम्पिक ध्वज सुपूर्द करण्यात आला. या वर्षी पॅरिस ऑलिम्पिक पाहण्यासाठी गेलेल्या अमेरिकनांना 2028 पासून मोठ्या अपेक्षा आहेत. चार वर्षांनंतर होणाऱ्या या खेळांच्या महाकुंभात हॉलिवूडचे ग्लॅमरही पाहायला मिळेल, असा विश्वास काही चाहत्यांना आहे. आता एलए गेम्सची उलटगणती सुरू झाली आहे, सोमवारी लॉस एंजलिसच्या महापौर कॅरेन बास ऑलिम्पिक ध्वज घेऊन लॉस एंजलिस विमानतळावर पोहोचल्या.

लॉस एंजेलिस ऑलिम्पिकचा उद्घाटन समारंभ 14 जुलै 2028 रोजी होईल, तर समारोप समारंभ दोन आठवड्यांनंतर 30 जुलै रोजी होईल. त्याचवेळी, पॅरालिम्पिक खेळांचा उद्घाटन समारंभ 15 ऑगस्ट रोजी आणि समारोप समारंभ 27 ऑगस्ट रोजी होणार आहे. ऑलिम्पिक आणि पॅरालिम्पिकमध्ये एकूण 50 खेळांमध्ये 800 हून अधिक स्पर्धा होणार आहेत.

या अमेरिकन शहराला तिसऱ्यांदा ऑलिम्पिकचे आयोजन करण्याची संधी मिळाली आहे. यापूर्वी एलएने 1932 आणि 1984 मध्ये ऑलिम्पिकचे आयोजन केले होते. मात्र, येथे प्रथमच पॅरालिम्पिक होणार आहे. जवळपास 3 दशकांनंतर अमेरिकेत ऑलिम्पिक होणार आहे. अखेरचे 1996 मध्ये अटलांटा येथे झाले होते. लॉस एंजेलिस 1984 मध्ये 6 हजार 829 खेळाडूंनी सहभाग घेतला होता.

पुरुष आणि महिला फ्लॅग फुटबॉल 2028 पासून ऑलिम्पिकमध्ये पदार्पण करेल. 2028 मध्ये स्क्वॅश अधिकृत खेळ म्हणून पदार्पण करेल. टोकियोनंतर बेसबॉल आणि सॉफ्टबॉल परत येतील. क्रिकेट आणि लॅक्रॉस शतकाहून अधिक काळानंतर परततील. शेवटचे क्रिकेट 1900 मध्ये आणि लॅक्रोस 1908 मध्ये खेळले गेले.



***कोणत्या ठिकाणी सामने खेळवले जातील?***
*पर्यावरणाचा विचार करून नवीन स्टेडियम बांधण्याची गरज भासणार नाही. ट्रॅक आणि फील्ड लॉस एंजेलिस कोलिझियम येथे आयोजित केले जाईल. 1932 आणि 1984 मध्येही येथे खेळ झाले होते. 97 वर्षे जुन्या सोफी स्टेडियममध्ये जलतरण आणि बास्केटबॉलचे आयोजन केले जाईल. त्याच वेळी, एनबीए संघ एलए लेकर्सच्या क्रिप्टोडॉटकॉम एरिनामध्ये बास्केटबॉल नसून जिम्नॅस्टिक्स असेल.पॅरिसमध्ये 4 सुवर्णपदके जिंकणारा फ्रेंच जलतरणपटू लिओन मार्चंड, 100 मीटर वर्ल्ड चॅम्पियन नोहा लायल्स, 800 मीटर ऑलिम्पिक चॅम्पियन केली हॉजकिन्सन यांसारखे उगवते तारेदेखील एलएमध्ये आव्हान देतील.*

बीओबी १४ वर्षाखालील बुद्धिबळ स्पर्धा

## जेविनने जोविनला चकवत विजेतेपद पटकावले



**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

आयडियल स्पोर्ट्स अकॅडमीतर्फे स्वातंत्र्य दिनानिमित्त बँक ऑफ बडोदा-मुंबई विभाग प्रायोजित बीओबी कप १४ वर्षाखालील बुध्दिबळ स्पर्धेचे विजेतेपद पटकाविताना जेविन पलायुरने (४.५ गुण) सरस सरासरीच्या बळावर त्याचाच भाऊ जोविन पलायुरला (४.५ गुण) चकविले. चौथ्या साखळी फेरीपर्यंत अपराजितपणे संयुक्त आघाडी गाठणाऱ्या दोघा भावांनी पाचव्या निर्णायक फेरीत चुरशीचा खेळ केला. प्रतिस्पर्ध्याला नामोहरण करणाऱ्या डावपेचांची आतषबाजी अखेर ४.५ साखळी गुणांच्या बरोबरीत संपली. आयडियल ग्रुप, आरएमएमएस व मुंबई शहर जिल्हा बुध्दिबळ संघटना सहकार्यीत स्पर्धेमधील विविध वयोगटाचे विजेतेपद मुलांमध्ये जेविन पलायुर, अनय भांगरे, अगस्त्य गुरव, राघव संचेती आणि मुलींमध्ये जीयाना धरमसी, सिम्रिता बुबना, मृणमयी डावरे, प्रकृठी एस. यांनी जिंकले. मुंबई शहर व उपनगर, ठाणे व पालघरमधील १५८ सबज्युनियर बुध्दिबळपटूनी स्पर्धेत रंगत आणली. बँक ऑफ बडोदा-मुंबई विभाग सौजन्याने एकूण १२० विजेत्या-उपविजेत्यांना पुरस्काराने गौरविण्यात आले.

१४ वर्षाखालील मुलांमध्ये जेविन पलायुरने (४.५ गुण) प्रथम, जोविन पलायुरने (४.५ गुण) द्वितीय, अमोघ त्रिपाठीने (४ गण) तृतीय तर मुलींमध्ये जीयाना धरमसीने (३.५ गुण) प्रथम, मैत्रेयी बेराने (३ गुण) द्वितीय, पुण्या कुमारने (३ गुण) तृतीय; ११ वर्षाखालील मुलांमध्ये अनय भांगरेने (४ गुण) प्रथम, दीप फुणगेने (४ गुण) द्वितीय, योहान्न जैनने (४ गुण) तृतीय तर मुलींमध्ये सिम्रिता बुबनाने (३ गुण) प्रथम, अरीहा देवरुखकरने (२ गुण) द्वितीय, शरण्या साळवीने (२ गुण) तृतीय; ९ वर्षाखालील मुलांमध्ये अगस्त्य गुरवने (४ गुण) प्रथम, शिवांश गिरीने (४ गुण) द्वितीय, अयान पुणेकरने (३.५ गुण) तृतीय तर मुलींमध्ये मृणमयी डावरेने (५ गुण) प्रथम, साराह जेकबने (३.५ गुण) द्वितीय, नित्या बंगने (३ गुण) तृतीय आणि ७ वर्षाखालील मुलांमध्ये राघव संचेतीने (४.५ गुण) प्रथम, वेदांत चिदंबरमने (४ गुण) द्वितीय, आर्शिव गोयलने (४ गुण) तृतीय तर मुलींमध्ये प्रकृठी एस.ने (३.५ गुण) प्रथम, मायरा झुनझुनवालाने (३.५ गुण) द्वितीय, कैरा दोशीने (३ गुण) तृतीय क्रमांक मिळविला. महाराष्ट्र चेस असोसिएशनचे सहसचिव पी.बी. भिलारे, बुध्दिबळ प्रशिक्षक नेव्हिल अल्वारीस, क्रीडाप्रेमी उदय पवार, सल्लागार नामदेव घाग, क्रीडापटू चंद्रकांत करंगुटकर, क्रीडा शिक्षक अविनाश महाडिक, शिवछत्रपती पुरस्कार विजेते लीलाधर चव्हाण आदी मंडळींच्या प्रमुख उपस्थितीत पारितोषिक वितरण समारंभ पार पडला.

## भारतातील बंदर व गोदी कामगारांचा 28 ऑगस्टपासून राष्ट्रव्यापी बेमुदत संप

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

भारतातील प्रमुख बंदरातील बंदर व गोदी कामगारांना १ जानेवारी २०२२ पासून नवीन वेतन करार लागू आहे. आत्तापर्यंत द्विपक्षीय वेतन समितीच्या ७ मिटिंग झाल्या, परंतु कोणतीही सन्माननीय तडजोड न झाल्यामुळे नाईलाजाने २८ ऑगस्ट २०२४ पासून किंवा त्यानंतर केव्हाही बंदर व गोदी कामगार आपल्या मागण्यांसाठी बेमुदत संपावर जातील, असा स्पष्ट इशारा अखिल भारतीय बंदर व गोदी कामगारांच्या पाचही मान्यताप्राप्त महासंघाच्या नेत्यांनी केंद्र सरकारला दिला आहे. प्रमुख बंदरातील कामगार संघटनांनी १२ ऑगस्ट २०२४ रोजी पोर्ट प्रशासनाला संपाची नोटीस दिली आहे.

भारतातील प्रमुख बंदर व गोदी कामगार महासंघांच्या राष्ट्रीय समन्वय समितीची मिटिंग ७ आणि ८ ऑगस्ट २०२४ रोजी व्हीओसी पोर्ट, तुतीकोरीन येथे झाली. या राष्ट्रीय समन्वय समितीच्या बैठकीत



एकमताने प्रमुख बंदरांच्या सर्व गोदी कामगार व पेन्शनर्स यांच्या वेतन आणि भत्त्यांमध्ये सुधारणा करण्यासाठी बेमुदत राष्ट्रव्यापी संप करण्याचा निर्णय घेण्यात आला.

बंदर व गोदी कामगारांच्या मान्यताप्राप्त पाचही महासंघांनी वेतन कराराची मुदत संपण्यापूर्वीच ५ सप्टेंबर २०२१ रोजी संयुक्त मागणी पत्र केंद्र सरकार व इंडियन पोर्ट असोसिएशनला दिले आहे. वेतन कराराची मुदत संपल्यानंतर जहाजबांधणी मंत्रालयाने गोदी कामगारांच्या मागण्यावर चर्चा करण्यासाठी २ जून २०२२ रोजी द्विपक्षीय वेतन समितीची (BWNC) स्थापना केली. परंतु दुर्दैवाने, ३१ महिन्यांचा कालावधी लोटल्यानंतरही द्विपक्षीय वेतन समिती महत्त्वाच्या मागण्यांबाबत कोणत्याही निष्कर्षापर्यंत पोहोचू शकली नाही. कारण मंत्रालयाने लादलेल्या जाचक अटी आणि बेकायदेशीर मार्गदर्शक तत्त्वे यामुळे मुख्य अडथळा निर्माण झाला आहे.

फेडरेशनच्या नेत्यांनी या मार्गदर्शक तत्त्वांना कडाडून विरोध केला असून, वेतनश्रेणीची पुनर्रचना, फिटमेंट लाभ, विद्यमान लाभांचे संरक्षण, मागील वेतन कराराची अंमलबजावणी, महागाई भत्त्याचे मूळ पगारात विलनीकरण यासह अनेक महत्त्वाच्या मागण्या आहेत. जहाज मंत्रालयाने मार्गदर्शक तत्त्वांनुसार कामगार व अधिकाऱ्यांच्या वेतनाची तुलना करण्याचा आग्रह धरला आहे.

## खादी हे शाश्वत विकासाचे साधन - सभापती रविंद्र साठे

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

खादी हे कापड नसून जीवनाकडे पाहण्याचा एक दृष्टिकोन आहे. खादी हे शाश्वत विकासाचे एक साधन आहे. खादीबद्दल देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी 'मन की बात' कार्यक्रमांत देशातील जनतेने खादी वापरण्याचे आवाहन केले आहे. त्याचबरोबर राज्यातील लघुउद्योजकांना सक्षम करण्यासाठी खादी व ग्रामोद्योग मंडळाने गेली ६४ वर्ष अविरतपणे काम केले आहे, असे मत राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाचे सभापती रवींद्र साठे यांनी व्यक्त केले.

राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या ६४ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून ग्रामीण भागात यशस्वी उद्योग करणाऱ्या उद्योजकांना ग्रामोद्योग भरारी पुरस्काराचे वितरण यशवंतराव चव्हाण सभागृह, मुंबई येथे करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाला मुख्य कार्यकारी अधिकारी आर.विमला,



सह मुख्य कार्यकारी अधिकारी रेश्मा माळी, अर्थसल्लागार स्मिता खरात, उप मुख्य कार्यकारी अधिकारी बिपीन जगताप, खादी आयोगाचे संचालक योगेश भामरे, नित्यांनद पाटील, जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी तसेच राज्यातील विविध भागातील यशस्वी उद्योजक उपस्थित होते.

सभापती साठे पुढे म्हणाले की, पुरस्काराने ग्रामीण उद्योजकांना प्रेरणा मिळते. ग्रामीण रोजगार निर्मिती व्हावी यासाठी मंडळ अनेक योजना राबवित आहे. मधाचे गाव ही नावीन्यपूर्ण योजना राज्यात प्रभावीपणे राबवण्यात येत आहे. मधमाशी पालन हा शेतीला पूरक असणारा हा व्यवसाय लोकाभिमुख होत आहे. मंडळ गेली 64 वर्ष ग्रामीण जनतेसोबत असून त्यांच्याकरिता रोजगार निर्माण करून लोकांना अर्थसहाय्यासोबत अनुदान देखील मंडळाकडून देण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

मुख्य कार्यकारी अधिकारी आर.विमला म्हणाल्या, रोजगार, पर्यावरण आणि लोकाभिमुख काम करण्यासाठी मंडळाचे योगदान मोठे आहे आज अखेर हजारो लोकांना मंडळाने हाताला काम देऊन स्वावलंबी केले आहे. ग्रामीण उद्योजक खऱ्या अर्थाने समाजहिताचे काम करीत आहेत. वर्धापनदिनाच्या औचित्य साधून पुरस्कार कार्यक्रम अनेकांना प्रेरणा देणारा असल्याचे त्यांनी सांगितले.

पुरस्कारामध्ये सिंधुदुर्ग येथील कौसर खान यांना प्रथम, पुणे येथील प्रमोद रोमन यांना द्वितीय तर गोंदिया येथील श्रीकांत येरणे यांना तृतीय पुरस्कार देण्यात आले. उत्तेजनार्थ पुरस्कार ठाणे येथील सुजाता पवार, नांदेड चे बालाजी काजलवाड अमरावतीच्या उज्वला गोपाळ चंदन यांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आले. कार्यक्रमात मंडळाच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून ग्रामोद्योग अंकाचे प्रकाशन करण्यात आले.कार्यक्रमात पुरस्कार्थीचे मनोगत देखील झाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रश्मी म्हाम्बरे यांनी तर आभार रेश्मा माळी यांनी मानले.

## गणपती आगमनापूर्वी रस्त्यांवरील खड्डे युद्धपातळीवर बुजवा

### महापालिकेच्या अधिकाऱ्यांना अतिरिक्त आयुक्तांच्या सूचना

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

पावसामुळे मुंबईतील रस्त्यांवर तयार झालेले खड्डे युद्धपातळीवर भरण्याचे निर्देश मुंबई महापालिकेने दिले आहेत. खड्डे बुजवण्यासाठी जिओ पॉलिमर आणि मॅस्टिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याच्या सूचना यापूर्वीच देण्यात आल्या आहेत. या तंत्रज्ञानाचा वापर करून खड्डे बुजवून ते वाहतुकीसाठी सज्ज करण्यासाठी तीन ते चार तास लागतात. त्यानंतर वाहतूक पूर्ववत होते. मस्कुटिक कूकर मशीनची संख्या वाढवली जात आहे. आता प्रत्येक प्रभागात तीन मशिन देण्यात आल्या आहेत. अशी माहिती अतिरिक्त आयुक्त अभिजित बांगर यांनी दिली.

मुंबईतील रस्त्यांवरील खड्ड्यांचा आढावा घेणाऱ्या २३ अभियंत्यांना महापालिकेने कारणे दाखवा नोटीस पाठवली होती. सर्वांची उत्तरे आली असल्याचे बांगर यांनी सांगितले. त्याचा आम्ही अभ्यास करत आहोत. त्यानंतर पुढे काय कारवाई करायची याबाबत निर्णय घेतला जाईल. ते म्हणाले की, सध्या पाऊस थांबला आहे. खड्डे भरण्यासाठी वातावरण चांगले आहे. त्यामुळे येत्या २ आठवड्यांत खड्डे युद्धपातळीवर भरण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. गणेशोत्सवापूर्वी मुंबईतील सर्व रस्ते खड्डेमुक्त करण्यात येणार आहेत.

### छायाचित्रे जिवंत करणाऱ्या कलाकारांचे प्रदर्शन 'भरारी'



*मुंबई : आपल्या वेगवान छायाचित्रांतून त्या कलाकृतींतील प्राणी, पक्षी आणि निसर्गातील सौंदर्य जिवंत करून थेट डोळ्यापुढे आणणारे जेष्ठ छायाचित्रकार रमेश करमरकर यांचे अफलातून असे 'भरारी' हे छायाचित्र प्रदर्शन वरळीच्या नेहरू विज्ञान केंद्रात भरले आहे. या प्रदर्शनाचे उदघाटन लोकप्रिय सिने आणि मालिका कलाकार अदिती सारंगधर यांच्याहस्ते मंगळवारी सकाळी झाले. करमरकर यांच्या ५० वर्षांच्या अनूबाहूतून ५० वर्षे कॅमेऱ्यात कैद झालेली सुंदर,दिखेचक अशी ६५ छायाचित्रे या प्रदर्शन मांडण्यात आली आहे. हे छायाचित्र प्रदर्शन १९ अगस्स्टपर्यंत रोज सकाळी ११ ते सायंकाळी ७ या वेळेत प्रेक्षकांना विनामूल्य पाहता येणार आहे. वेग ,मूड्स आणि निसर्गातील अफलातून दृश्यांची हि छायाचित्रे करमरकर यांनी देश-विदेशात भ्रमंती करून काढली आहे।*



## मुंबईत विविध ठिकाणी पार पडल्या 'तिरंगा यात्रा'; घरावर झेंडे फडकवण्याचे आवाहन

■ **मुंबई**

स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने आयोजित 'घरोघरी तिरंगा' अभियान अंतर्गत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रत्येक विभाग (वॉर्ड) स्तरावर 'तिरंगा यात्रा'चे काल आयोजन करण्यात आले होते. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत पालिका मुख्यालय ते भारताचे प्रवेशद्वार (गेट वे ऑफ इंडिया) पर्यंत तिरंगा यात्रा पार पडली . तर, महाराष्ट्र राज्याचे शालेय शिक्षण मंत्री तथा मुंबई शहर जिल्हा पालकमंत्री दीपक केसरकर; मुंबई उपनगरे जिल्हा पालकमंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या प्रमुख उपस्थितीत कमला नेहरु उद्यानापासून तिरंगा यात्रा



काढण्यात आली.

भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर ९ ते १५ ऑगस्ट २०२४ या कालावधीत देशभरात 'हर घर तिरंगा' अर्थात 'घरोघरी तिरंगा' अभियान राबविण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर पालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांच्या निर्देशानुसार आणि अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पूर्व उपनगरे) डॉ. अमित सैनी यांच्या मार्गदर्शनात बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने संपूर्ण मुंबई महानगरामध्ये तिरंगा यात्रा, तिरंगा रॅली, तिरंगा मेळा, तिरंगा शपथ, मानवंदना आदी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.


**पुणे महानगरपालिका**
पथ विभाग
**फेरनिविदा**

जाहिरात क्रमांक :-२/४५५
दि. १३/०८/२०२४

पुणे महानगरपालिकेच्या खाली नमुद केलेल्या विभागाकडील कामांना फेरनिविदा देण्यात येत आहे. सदर कामाबाबतच्या निविदा अटी, शर्ती इ. बाबतचा सर्व तपशील निविदा संच मध्ये नमुद केलेला आहे. व निविदा संच WWW.MAHATENDERS.GOV.IN या संकेतस्थळावर निशुल्क पहावयास उपलब्ध आहे.

टेंडर विक्री कालावधी : दिनांक १४/०८/२०२४ सकाळी ९.०० वा ते क. २१/०८/२०२४ दु २:३० पर्यंत
टेंडर स्विकृती कालावधी : दिनांक १४/०८/२०२४ सकाळी ९.०० वा ते क. २१/०८/२०२४ दु २:३० पर्यंत
टेंडर उघडणे कालावधी : दिनांक २२/०८/२०२४ दु:- ०३:०० वाजता ( शक्य झाल्यास )

| अ.क्र. | खात्याचे नाव | फेरनिविदा क्रमांक | कामाचे नाव |
|---|---|---|---|
| १) | पथ विभाग | पीएमसी / रोड / २०२४/२०९ | प्रभाग क्रमांक 1, खेसे पार्क रोडवरील ईस्टरलिया सोसायटी समोरील अस्तित्वातील रस्त्यावरील पावसाळी पाण्याचा निचरा होणेकरीता खोलगट रस्ता पातळी उचलून दुरुस्ती करून घेणे. |

१) वरील टेंडर्सची विक्री व स्विकृती www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून फक्त ऑनलाईन पद्धतीने चालू आहे.
२) बाकी सर्व मजकूर पुर्वी प्रसिध्द केल्या प्रमाणे कायम राहील.

(स्वाक्षरी-/)
(अमर शिंदे)
अधिक्षक अभियंता (पथ)
पुणे महानगरपालिका



**नवी मुंबई महानगरपालिका**

परिमंडळ-1 विभाग
निविदा सुचना क्र. नमुंमपा/परिमंडळ-1/01/2024-25

| अ.क्र | कामाचे नांव | निविदा प्रकार | कालावधी | अंदाजपत्रकीय रक्कम रु. | इसारा रक्कम रू. | कोऱ्या निविदेची रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | नवी मुंबई महानगरपालिकेच्या परिमंडळ-1 अंतर्गत बेलापुर विभाग कार्यक्षेत्रातील 05 स्मशानभूमींमध्ये देखभाल, निगा व परिचलन करणेकामी मनुष्यबळ पुरविणे. | ब-1 | प्रथम वर्ष | रू.75,05,541/- | रु.2,34,000/- | रु.2000+रु. 360 (18% जीएसटी) =रु.2360/- |
| | | | द्वितीय वर्ष | रू.77,71,699/- | | |
| | | | तृतीय वर्ष | रू.80,37,856/- | | |
| | | | एकूण रक्कम | रू.2,33,15,096/- | | |
| 2 | नवी मुंबई महानगरपालिकेच्या परिमंडळ-1 अंतर्गत नेरूळ विभाग कार्यक्षेत्रातील 04 स्मशानभूमींमध्ये देखभाल, निगा व परिचलन करणेकामी मनुष्यबळ पुरविणे. | ब-1 | प्रथम वर्ष | रू.62,54,681/- | रु.1,95,000/- | रु.1000+ रु.180 (18% जीएसटी) = रु.1180/- |
| | | | द्वितीय वर्ष | रू.64,76,479/- | | |
| | | | तृतीय वर्ष | रू.66,98,276/- | | |
| | | | एकूण रक्कम | रू.1,94,29,436/- | | |
| 3 | नवी मुंबई महानगरपालिकेच्या परिमंडळ-1 अंतर्गत नेरूळ विभाग कार्यक्षेत्रातील 04 स्मशानभूमींमध्ये मोफत अंत्यविधी (ऐच्छिक) योजना राबविणेबाबत. | ब-1 | प्रथम वर्ष | रू.48,51,200/- | रु.1,61,000/- | रु.1000+ रु.180 (18% जीएसटी) =रु.1180/- |
| | | | द्वितीय वर्ष | रू.53,36,800/- | | |
| | | | तृतीय वर्ष | रू.58,68,000/- | | |
| | | | एकूण रक्कम | रू.1,60,56,000/- | | |

निविदा पुस्तिका ई-टेंडरिंग (E-Tendering) संगणक प्रणालीच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर या संकेतस्थळावर दि.14/08/2024 रोजी प्राप्त होतील. निविदेचे सादरीकरण https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Online करण्याचे आहे. Online निविदा सादरीकरणाच्या प्रकियेतील कोणत्याही तांत्रिक अडचणीसाठी सदर संकेतस्थळावर दिलेल्या हेल्प डेस्क नंबरवर संपर्क करावे.

निविदाकारांनी कोरी निविदा फॉर्म फी, इसारा अनामत रक्कम व सेवा शुल्क ऑनलाईन पेमेंट गेटवेद्वारे भरावयाचे आहे. वरील नमुद सर्व शुल्क कोणत्याही बँकेचे डेबिट कार्ड, क्रेडीट कार्ड अथवा नेट बँकींग मार्फत भरणा करता येईल. निविदा फॉर्म फी शुल्क नमुंमपाचे लेखा विभागात स्विकारले जाणार नाही, याची निविदाकारांनी नोंद घ्यावी.

कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकरण्याचा अधिकार मा. आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी राखून ठेवलेला आहे.

सही/-
(सोमनाथ पोटरे)
उप आयुक्त ( परिमंडळ -1)
नवी मुंबई महानगरपालिका

जाक्र-नमुंमपा/जसं/जाहिरात/197/2024

## विजयवाड्याच्या दुर्गा मंदिरात 18 दिवसांत करोडो रुपयांची देणगी

**विजयवाडा :** सध्या श्रावण महिना सुरु असून देशातील विविध मंदिरांमध्ये भाविकांची गर्दी होताना दिसून येत आहे. अशातच आंध्र प्रदेशातील विजयवाडा येथील कनक दुर्गा मंदिरात श्रावण महिन्यात पैशांचा पाऊस पडत आहे. दुर्गा मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांनी मोठी देणगी दिली आहे. श्री दुर्गा मल्लेश्वर स्वामीवराला देवस्थानम येथे भाविकांनी दानपेटीत टाकलेल्या रोख रक्कमेसह सोने आणि चांदीच्या वस्तू मोजण्याचे काम कार्यकारी अधिकाऱ्यांच्या निर्देशानुसार सुरु आहे. गेल्या १८ दिवसांत दुर्गादेवीला दान म्हणून दिलेली रक्कम २,९७,४७,६६८ रुपये इतकी जमा झाली आहे. म्हणजेच, मंदिराच्या अधिकाऱ्यांनी सांगितलं की, दररोज सरासरी १६,६२,६४८ रुपये जमा झाले आहेत. याशिवाय, ४१० ग्रॅम सोने आणि ५ किलो चांदी दानपेटीतून देवीला अर्पण करण्यात आली आहे. याचबरोबर, दुर्गा देवीच्या दानपेटीत परकीय चलन सुद्धा दान म्हणून जमा होत आहे. यामध्ये ८७५ ऑस्ट्रेलियन डॉलर, ७६५ अरब दिरहम, ६८१ यूएस डॉलर, २८० थाई बात, १०७ सौदी रियाल, ६२ मलेशियन रिंगिट, ५० दक्षिण



## मंगळावर सापडला पाण्याचा मोठा साठा

**वॉशिंग्टन :** जगभरातील अंतराळ संशोधन संस्था अनेक वेगवेळे संशोधन करत असतात. आता मंगळ ग्रहाबाबत एक नवीन संशोधन समोर आलं आहे. मंगळावर पाणी असल्याची माहिती एका संशोधनामधून समोर आली आहे. या संशोधनानुसार, मंगळ ग्रहाच्या पृष्ठभागाच्या खाली खोलवर पाण्याचा एक मोठा साठा असू शकतो. मंगळाच्या पृष्ठभागाखाली खडकांमध्ये पाण्याचा एवढा मोठा साठा असू शकतो की, ज्यामध्ये एखादा समुद्र भरण्यासाठी पुरेसे पाणी असू शकते, असं नासाच्या इनसाइट लँडरच्या डेटावर आधारित अभ्यासावरून ही माहिती समोर आल्याचं संशोधकांनी म्हटलं आहे.

# देशातील गरीब आणि मध्यमवर्गीयांचा विश्वासघात

## काँग्रेसच्या बैठकीतून खर्गेंचा केंद्रावर हल्लाबोल



### जात जनगणनेची लोकांची मागणी

**ते पुढे म्हणाले की, देशातील शेतकऱ्यांना एमएसपीची कायदेशीर हमी मिळावी, या मागणीसाठी काँग्रेस पक्ष आपला लढा सुरुच ठेवणार आहे. देशातील तरुणांवर लादलेली अग्निपथ योजना सरकारने रद्द करावी. रेल्वे सुरक्षेचा मुद्दा उपस्थित करून ते म्हणाले की, गाड्या रुळावरून घसरणे ही एक सामान्य गोष्ट झाली आहे. हवामान-संबंधित आपत्ती आणि ढासळत चाललेल्या पायाभूत सुविधा ही देखील चिंतेची कारणे आहेत. या प्रश्नांवर राष्ट्रीय मोहीम तयार करून लोकांपर्यंत जाणार असल्याचे खर्गे यांनी सांगितले.**


वृत्तसंस्था
नवी दिल्ली

लोकसभा निवडणूक झाल्यानंतर आता काँग्रेसने आगामी विधानसभा निवडणुकांवर लक्ष केंद्रीत केले आहे. या पार्श्वभूमीवर आज राजधानी दिल्लीत पक्ष मुख्यालयात पक्षाचे सरचिटणीस, प्रदेश प्रभारी आणि राज्यांच्या प्रमुखांची बैठक झाली. या बैठकीत काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, राहुल गांधी, केसी वेणुगोपाल यांच्यासह अनेक ज्येष्ठ नेते उपस्थित होते.

मिळालेल्या माहितीनुसार, या बैठकीत संघटना मजबूत करणे, आगामी विधानसभा निवडणुकीची तयारी, जात जनगणनेची मागणी आणि एससी-एसटी आरक्षणाबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयावर चर्चा झाली. राहुल गांधी यांनी पक्षाच्या नेत्यांकडून त्यांची मते, सूचना आणि पक्षाची राज्यांतील परिस्थितीबाबत प्रतिक्रिया घेतल्या. या वर्षी ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यात महाराष्ट्र, हरियाणा आणि झारखंडमध्ये विधानसभा निवडणुका होत आहेत. जम्मू-काश्मीरमध्येही या वर्षी विधानसभा निवडणुका होण्याची शक्यता आहे. त्यामुळे काँग्रेसची ही बैठक महत्वाची मानली जात आहे.

या बैठकीनंतर काँग्रेस मल्लिकार्जुन खरगे यांनी केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारवर बेरोजगारी, महागाई आणि संविधानाच्या मुद्द्यावरुन हल्लाबोल केला. देशातील गरीब आणि मध्यमवर्गाचा विश्वासघात केल्याचा आरोप त्यांनी केला. ते पुढे म्हणाले की, सेबी आणि अदानी यांच्यातील संबंधाचे धक्कादायक खुलासे झाले आहे, त्यामुळे या प्रकरणाची सखोल चौकशीची गरज आहे. छोट्या गुंतवणूकदारांचा पैसा शेअर बाजारात धोक्यात घालता येत नाही. मोदी सरकारने तात्काळ सेबी अध्यक्षांच्या राजीनाम्याची मागणी करावी आणि या संदर्भात JPC (संयुक्त संसदीय समिती) स्थापन करावी.

# प्रसारण सेवा नियमन विधेयक मागे



## ऑनलाइन सामग्रीवर अतिनियंत्रणाच्या टीकेनंतर सरकारची माघार

वृत्तसंस्था
नवी दिल्ली

माहिती आणि प्रसारण मंत्रालयाने वादग्रस्त 'प्रसारण सेवा (नियमन) विधेयक, २०२४' मागे घेतले आहे. या विधेयकाचा नवीन मसुदा तयार करण्यासाठी पुढील सल्लामसलती केल्या जातील, असे माहिती व प्रसारण मंत्रालयाने सोमवारी 'एक्स'वर जाहीर केले. या विधेयकाच्या माध्यमातून केंद्र सरकार समाजमाध्यमांवर आणि डिजिटल माध्यमांवर निर्बंध आणण्याच्या शक्यतेमुळे चिंता व्यक्त केली जात होती.

नवीन कायद्याच्या माध्यमातून समाजमाध्यमांवरील खाती आणि स्वतंत्रपणे काम करणारे ऑनलाइन ध्वनिचित्रफिती निर्माते यांच्यावरही नियंत्रण ठेवले जाणार होते. त्यामुळे केंद्र सरकार 'ओटीटी'सह (ओव्हर द टॉप) ऑनलाइन सामग्रीवर अतिनियंत्रण आणू पाहत असल्याची टीका झाली होती. त्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने नवीन मसुद्यासाठी १५ ऑक्टोबरपर्यंत सूचना मागवल्या आहेत. या विधेयकामुळे भाषण आणि अभिव्यक्तिस्वातंत्र्यासंबंधी, तसेच त्याचे नियमन करण्याच्या सरकारच्या अधिकारांविषयी अनेक प्रश्न उपस्थित झाले होते. गेल्या महिन्यात माहिती व प्रसारण मंत्रालयाने नवीन मसुदा विधेयक काही निवडक भागधारकांना देऊन त्यांचे अभिप्राय मागवले होते. आता मंत्रालयाने त्यांना मसुदा विधेयक परत पाठवण्यास आणि त्याबरोबर कोणतीही टिप्पणी न पाठवण्यास सांगितले आहे, अशी माहिती मिळाली आहे. यापूर्वी दूरचित्रवाणी वाहिन्यांच्या प्रसारणासाठी १९९५मध्ये केबल टेलिव्हिजन नेटवर्क (नियमन) कायदा लागू करण्यात आला होता. त्याची जागा नवीन अधिनियमन घेणार होते.

### विविध स्तरांमधून विरोध

मिळालेल्या माहितीनुसार, बिगर-वृत्त आशय निर्मात्यांनाही कायदा लागू केला जावा का या मुद्द्यावरून मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांदरम्यानच मोठ्या प्रमाणात मतभेद निर्माण झाले आहेत. 'डिजिपब' आणि 'एडिटर्स गिल्ड ऑफ इंडिया'सारख्या माध्यम संस्थांनी या विधेयकावर टीका केली होती. डिजिटल माध्यम संस्था आणि सामाजिक संघटनांचा सल्ला घेतला नव्हता असा दावा त्यांनी केला होता. सरकारी नियंत्रणाची व्याप्ती वाढण्याच्या भीतीमुळे मोठ्या तंत्रज्ञान कंपन्यांनी खासगीत नाराजी व्यक्त केली होती.

पान ९ वरुन

### बारामती लोकसभेत सुप्रिया सुळेंविरोधात सुनेत्रा पवारांना उभे करणे मोठी चूक होती

पण राजकारण पार घरात शिरू द्यायचे नसते. आज माझे मन मला हे सांगत आहे. तसे व्हायला नको होते. अजित पवार यांच्या या विधानावर विरोधी पक्षांच्या नेत्यांचीही प्रतिक्रिया समोर येत आहे. स्वतः सुप्रिया सुळे यांनी या प्रकरणी प्रतिक्रिया देत आपल्याला अजित पवारांच्या विधानाची कोणतीही माहिती नसल्याचे सांगितले आहे. यावेळी त्यांनी रामकृष्ण हरी म्हणत बोलणे टाळले. तर काँग्रेसच्या एका नेत्याने अजित पवार यांना हळूहळू आपल्या सर्वच चुका लक्षात येतील असा दावा केला आहे. उल्लेखनीय बाब म्हणजे अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसची सध्या जनसन्मान यात्रा सुरू आहे. या निमित्ताने अजित पवार महाराष्ट्रभर फिरत आहेत. या दौऱ्यात ते सरकारच्या लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून राज्यातील सर्वसामान्य मतदारांना विशेषतः महिला वर्गाला आपल्या पक्षाकडे खेचण्याचा प्रयत्न करत आहेत. या दौऱ्यात राष्ट्रवादीच्या सर्वच गाड्यांना गुलाबी रंग देण्यात आला आहे. स्वतः अजित पवारही पांढऱ्या सदऱ्यावर पिंक जॅकेट घालत आहेत. यामुळे राष्ट्रवादीची ही यात्रा पूर्णतः गुलाबीमय झाली आहे.

## युरोपवर आण्विक हल्ल्याचे प्रशिक्षण; रशियन नौदलाची नाटोशी युद्धाची तयारी

**मॉस्को -** रशियानं नाटोसोबत युद्धजन्य स्थितीत यूरोपवर आण्विक हल्ल्याची तयारी सुरु केली आहे. त्यासाठी रशियानं नौदलला विशेष आण्विक मिसाइल फायरिंगचं ट्रेनिंगही दिले आहे. हा खुलासा फायनान्शिअल टाईम्सच्या रिपोर्टमधून पुढे आला आहे. रशियाचं नौदल आण्विक हल्ल्यासाठी फ्रान्सच्या पश्चिमी तटावर आणि ब्रिटनपासून काही दूर टार्गेट निश्चित करत आहे. त्यासाठी खास नकाशा बनवण्यात आला असून हल्ल्याचं प्रशिक्षण दिलं जात आहे. या रिपोर्टमध्ये २९ गुप्त रशियन सैन्याच्या फाईलींचा हवाला देत म्हटलंय की, मॉस्कोनं नाटोसारख्या महासत्तेशी संघर्षाच्या सुरुवातीच्या काळात सामरिक अण्वस्त्रांचा वापराचा अभ्यास केला आहे. पश्चिम युरोपात मोठ्या प्रमाणावर हल्ले करण्याचं रशियाचं प्लॅनिंग आहे. २००८ ते २०१४ यात तयार करण्यात आलेल्या या दस्तऐवजांमध्ये पारंपारिक किंवा सामरिक अण्वस्त्रे असलेल्या क्षे पणास्त्रांच्या टार्गेटचा उल्लेख आहे. अण्वस्त्रांच्या सुरुवातीच्या वापराची योजना यामध्ये लिहिलेली आहे. रशिया युद्धनौकांवर अण्वस्त्रे तैनात करू शकतो, असेही कागदपत्रांमध्ये लिहिले आहे.

# ..तर 'लाडकी बहीण योजना' बंद करण्याचे आदेश देऊ!



## महाराष्ट्र सरकारवर 'सर्वोच्च' ताशेरे

वृत्तसंस्था
नवी दिल्ली

पुणे जमीन अधिग्रहण प्रकरणावरुन आज सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्र सरकारला धारेवर धरलं. पुणे जमीन अधिग्रहण प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने सरकारवर टीका केली आहे. तुमच्याकडे लाडकी बहीण योजनेसाठी पैसे आहेत मग, याचिकाकर्त्यांचा मोबदला द्यायला पैसे नाहीत का? असाही सवाल विचारण्यात आला.

सर्वोच्च न्यायलाने महाराष्ट्र सरकारला भूमि अधिग्रहण प्रकरणाच्या एका खटल्यात लाडकी बहीण योजनेवरुन सुनावलं आहे. महाराष्ट्र सरकारने सुमार साठ वर्षांपूर्वी एका व्यक्तीच्या मालमत्तेवर अवैध कब्जा केला होता. त्याची वनजमीन अधिग्रहीत केली होती. याबाबत सर्वोच्च न्यायालयाने कठोर शब्दांत इशारा देत सांगितलं की ज्या व्यक्तीने जमीन गमावली त्या व्यक्तीला जर योग्य मोबदला दिला नाही तर आम्ही लाडकी बहीण योजनेवर बंदी घालण्याचे आदेश देऊ. तसंच त्या जमिनीवर उभं असलेलं बेकायदा बांधकामही तोडण्याचे निर्देश देऊ.

जस्टिस गवई म्हणाले, लाडकी बहीण, लाडकी लेक सारख्या योजना जाहीर करुन त्याचे पैसे वाटायला महाराष्ट्र सरकारकडे पैसे आहेत. ममग ज्या माणसाची जमीन अधिग्रहीत केली गेली आहे, ज्यावर अवैध कब्जा केलेला आहे त्या व्यक्तीला योग्य मोबदला का दिला नाही?

याचिकाकर्ते टी. एन. गोदाबर्मन यांच्या पूर्वजांनी पुण्यात २४ एकर जमीन खरेदी केली होती. राज्य सरकारने ही जमीन ताब्यात घेतली पण याचिकाकर्त्यांना मोबदला दिला नव्हता. सरकारने ही जमीन डिफेन्सच्या शिक्षासंकुलाला देण्यास सांगितलं. ज्यानंतर याचिकाकर्त्यांनी न्यायालयात धाव घेतली. न्यायालयाने मोबदला देण्याचे आदेश दिले. त्यावेळी राज्य सरकारच्या वतीने हे सांगण्यात आलं की आम्ही त्या व्यक्तीला मोबदला म्हणून जमीन दिली आहे. प्रत्यक्षात संबंधित व्यक्तीला वनजमीन देण्यात आली. यानंतर याचिकाकर्त्यांनी सर्वोच्च न्यायालयाचं दार ठोठावलं. सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणात राज्य सरकारला प्रतिज्ञापत्र दाखल करण्यास सांगितलं.

"न्यायालयाच्या आदेशांना गृहित धरुन वागू नका. आम्ही वर्तमानपत्र वाचतो, तुमच्याकडे फ्रीबीज साठी लाडकी बहीण या योजनांसाठी पैसे आहेत. पण एका सर्वसामान्य माणसाच्या जमिनीचा मोबदला द्यायला पैसे नाहीत का?" अशा शब्दात न्यायालयाने महाराष्ट्र सरकारवर ताशेरे झाडले आहेत. राज्याच्या मुख्य सचिवांनी तात्काळ मुख्यमंत्र्यांशी बोलून या मोबदल्याबाबत तोडगा काढावा असे निर्देश सुप्रीम कोर्टाने दिले आहेत. तसंच जर योग्य मोबदला मिळाला नाही तर लाडकी बहीण योजना बंद करण्याचे आदेश आम्ही देऊ असंही सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं आहे.

## शेख हसीना यांच्यावर पहिला गुन्हा दाखल

### दुकानदाराच्या हत्येचा आरोप ठेवला



ढाका

बांगलादेशच्या पदच्युत पंतप्रधान शेख हसीना यांच्यावर गुन्हे दाखल होण्यास सुरुवात झाली आहे. गेल्या महिन्यात झालेल्या हिंसाचारात एका व्यक्तीच्या मृत्यूवरून हसीना यांच्यावर हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हसीना यांनी त्या पुन्हा बांगलादेशात परतणार असल्याचे म्हटले होते. या पार्श्वभूमीवर हसीना यांना परतल्यास अडचणींना सामोरे जावे लागणार आहे.

हसीना यांच्यावर दाखल झालेला हा पहिला गुन्हा आहे. बांगलादेशी प्रसारमाध्यमांनुसार एका किराणा मालाच्या दुकानदाराच्या हितचिंतकांनी हा गुन्हा दाखल केला आहे. १९ जुलैला पोलिसांच्या गोळीबरात अबू सईद याचा मृत्यू झाला होता. शेख हसीना यांच्याविरोधात जो गुन्हा दाखल करण्यात आला आहे .

## कठुआमध्ये अतिरेक्यांच्या 8 मदतनीसांना अटक

वृत्तसंस्था
श्रीनगर

जम्मू आणि काश्मीरमधील कठुआमध्ये पोलिसांनी सोमवारी (12 ऑगस्ट) 8 ओव्हर ग्राउंड वर्कर्सना अटक केली. जैश दहशतवादी मॉड्यूलच्या या वर्कर्सनी 26 जून रोजी डोडा येथे मारल्या गेलेल्या 3 जैश दहशतवाद्यांना मदत केली होती. या ओव्हर ग्राउंड वर्कर्सनी सीमा ओलांडून दहशतवाद्यांना डोडाच्या जंगलात आणि डोंगरापर्यंत पोहोचण्यास मदत केली होती. शिवाय त्यांना राहण्यासाठी जेवण आणि जागाही देण्यात आली होती.

दहशतवादी मॉड्यूलचे हे वर्कर्स पाकिस्तानमध्ये बसलेल्या जैशच्या हस्तकांच्या संपर्कात होते. 26 जूनच्या चकमकीनंतर हे वर्कर्स गंडोहमध्ये लपल्याची माहिती केंद्रीय यंत्रणांनी पोलिसांना दिली होती. पोलिसांनी सांगितले की, इनपुट मिळाल्यानंतर गंडोहमध्ये 50 हून अधिक लोकांची चौकशी करण्यात आली. पुरावे सापडल्यानंतर 8 जणांना अटक करण्यात आली असून त्यांनी चौकशीदरम्यान दहशतवाद्यांना मदत केल्याची कबुली दिली आहे.

## सुप्रीम कोर्टात पतंजलीवरील अवमानाचा खटला बंद

### बाबा रामदेव-आचार्य बाळकृष्ण यांची माफी स्वीकारली



वृत्तसंस्था
नवी दिल्ली

पतंजली आयुर्वेद आणि योगगुरू स्वामी रामदेव आणि आचार्य बाळकृष्ण यांना दिलासा देत सर्वोच्च न्यायालयाने त्यांच्यावरील न्यायालयाचा अवमान खटला बंद केला आहे.

न्यायालयाने या दोघांनाही कडक ताकीद देताना सांगितले की, न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन करून काही केले तर न्यायालय कठोर शिक्षा देईल. न्यायमूर्ती हिमा कोहली आणि न्यायमूर्ती अहसानुद्दीन अमानुल्ला यांच्या खंडपीठाने मंगळवारी (13 ऑगस्ट) हा निकाल दिला. 14 मे रोजी सर्वोच्च न्यायालयाने अवमान नोटीसवरील निर्णय राखून ठेवला होता.सुप्रीम कोर्टाने इंडियन मेडिकल असोसिएशनच्या याचिकेवर सुनावणी केली होती, ज्यामध्ये कोविड लसीकरण आणि ॲलोपॅथीची बदनामी केल्याचा आरोप होता.

इंडियन मेडिकल असोसिएशनच्या याचिकेवर 17 ऑगस्ट 2022 रोजी हा अवमान खटला सुरू करण्यात आला होता. हे पतंजलीच्या जाहिरातींच्या विरोधात होते. पतंजलीने ॲलोपॅथीला कुचकामी ठरवून काही आजार बरे करण्याचा दावा केला होता.

सर्वोच्च न्यायालयात सुनावणी आणि फटकारल्यानंतर पतंजलीने नोव्हेंबर 2023 मध्ये आश्वासन दिले होते की ते अशा जाहिरातींपासून दूर राहतील.

## जोगेश्वरी पूर्व येथील नवलकर मार्केटच्या पुनर्विकासाचा मार्ग मोकळा

### खा.वायकरांच्या प्रयत्नाने रेल्वे प्रशासनाकडून लवकरच ना हरकत प्रमाणपत्र

नवी दिल्ली

गेली अनेक वर्ष रखडलेल्या जोगेश्वरी (पूर्व) रेल्वे स्टेशन लागत असलेल्या तसेच धोकादायक म्हणून घोषित झालेल्या नवलकर मार्केटच्या पुनर्वसनाचा मार्ग लवकरच मोकळा होणार आहे. रेल्वे प्रशासनाकडून लवकरच ना हरकत प्रमाणपत्र देण्यात येईल असे, आश्वासन केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी मुंबई उत्तर पश्चिम लोकसभा क्षेत्राचे खासदार रविंद्र वायकर यांना दिले. जोगेश्वरी (पूर्व) रेल्वे स्टेशनला लागून असलेल्या मुंबई महागर पालिकेच्या जागेवर १९६४ साली नवलकर मार्केट सुरु करण्यात आले. हे मार्केट बांधून ६८ वर्ष झाल्याने या मार्केटची इमारत धोकादायक झाली आहे.



**नवी दिल्ली ।** गृहनिर्माण सहकारी संस्थांच्या स्वयंपुनर्विकासासंदर्भात एनसीडीसीने कर्ज उपलब्ध करून द्यावे याकरिता आणि सहकारातील विविध प्रश्नांसंदर्भात भाजपा विधानपरिषद गटनेते आमदार प्रविण दरेकर यांनी आज दिल्ली येथे केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शहा यांची भेट घेऊन चर्चा करत मागणी केली. याप्रसंगी सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, अशोक जगताप, केदानाना आहेर हेही उपस्थित होते. मुंबईतील गृहनिर्माण संस्थांच्या पुनर्विकासाला यामुळे गती मिळण्यास मदत होईल.

## कॉन्स्टेबल पत्नी, सासू, 2 मुलांची हत्यानंतर पतीची आत्महत्या

### घरात 5 मृतदेह आढळले; पतीला पत्नीच्या अफेअरचा संशय, बिहारमधील घटना



वृत्तसंस्था
पाटणा

बिहारमधील भागलपूर पोलिस लाईन्सच्या सरकारी क्वार्टरमध्ये पाच मृतदेह सापडले आहेत. महिला कॉन्स्टेबल, तिचा पती, दोन मुले आणि तिची आई यांचे मृतदेह 37 क्रमांकाच्या क्वार्टरमधून सापडले. कॉन्स्टेबलचा पती पंकजने आधी संपूर्ण कुटुंबाचा खून केला आणि नंतर गळफास घेऊन आत्महत्या केली.

पत्नीचे अनैतिक संबंध असल्याच्या संशयावरून एवढी मोठी घटना घडली आहे. पतीने कुटुंबातील चार जणांचा गळा चिरला, स्वत:ही गळफास घेऊन आत्महत्या केली. नीतू एसएसपी कार्यालयात तैनात होती. घटनास्थळावरून पोलिसांना सुसाईड नोट सापडली आहे. ज्यात पंकजने कुटुंबातील चार जणांची हत्या केल्याची कबुली दिली आहे. घटनेची माहिती मिळताच संपूर्ण पोलिस विभागात खळबळ उडाली आहे. वरिष्ठ पोलिस अधिकारीही घटनास्थळी दाखल झाले आहेत. डीआयजी, एसएसपी, सिटी एसपी, सिटी डीएसपी, डीएसपी लाइनसह डझनभर अधिकारी आणि कर्मचारी घटनास्थळी उपस्थित आहेत.

घटनास्थळी पोहोचलेले डीआयजी विवेकानंद यांनी घटनेबाबत सांगितले की, 'कॉन्स्टेबल नीतू कुमारी, तिची दोन मुले आणि नीतूच्या सासूचे मृतदेह सापडले आहेत. चौघांचेही गळे चिरण्यात आले आहेत. तर नीतूच्या पतीचा मृतदेह लटकलेल्या अवस्थेत आढळून आला. सकाळी दूधवाला दूध देण्यासाठी आला असता दरवाजा उघडला नाही, त्यानंतर लोकांनी दरवाजा तोडला. घरात ५ जणांचे मृतदेह पडले होते. मृत कुटुंबीयांच्या नातेवाईकांना माहिती देण्यात आली आहे.

ते म्हणाले की, 'जवळपासच्या पोलिस कर्मचाऱ्यांच्या चौकशीत पती-पत्नीमध्ये अनेक दिवसांपासून भांडण सुरू असल्याचे समोर आले आहे. रस्त्यातही दोघांमध्ये अनेकदा मारामारी झाली. काल संध्याकाळीही दोघांमध्ये हाणामारी झाली. मात्र, ही घटना कल्पनेपलीकडची आहे.

डीआय विवेकानंद म्हणाले की, 'एक सुसाईड नोटही सापडली आहे, ज्यामध्ये पतीने अवैध संबंधांचा आरोप केला आहे. पोलिस या प्रकरणाचा तपास करत आहेत सर्व पैलू तपासले जात आहेत. पोलिस लाईनचे गेट बंद करण्यात आले असून कोणालाही आत प्रवेश नाही.

पोलिसांनी सर्वांना घटनास्थळी जाण्यापासून रोखले आहे. पोलिस लाईनकडे जाणारे सर्व दरवाजे सील करण्यात आले आहेत. पोलिस या प्रकरणाचा तपास करत आहेत

## कमलांच्या आघाडीमुळे बिथरले ट्रम्प; एआयमुळे घोटाळा झाल्याचा आरोप

### कमलांचे सकारात्मकतेला, ट्रम्पचे चिथावणीला प्रोत्साहन

वृत्तसंस्था
न्यूयॉर्क

अमेरिकेत ५ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीत डेमोक्रॅटिक पार्टीच्या उमेदवार कमला हॅरिस सहभागी झाल्यानंतर माजी राष्ट्राध्यक्ष आणि रिपब्लिकन उमेदवार डोनाल्ड ट्रम्प यांच्या अडचणी वाढत आहेत. कमला हॅरिस आल्यानंतर गेल्या ३ आठवड्यांपासून ट्रम्प यांची निवडणूक मोहीम सर्वात वाईट काळातून जात आहे.

ते कमला यांचा सामना करण्यासाठी एखादी बळक रणनीती किंवा मुद्दा बनवण्यात यशस्वी झाले नाहीत. यादरम्यान ट्रम्प यांनी सोमवारी दावा केला की, गेल्या आठवड्यात उपराष्ट्राध्यक्ष कमला हॅरिस यांच्या मिशिगन रॅलीत गर्दी नव्हती. ट्रम्प यांच्या आरोपानुसार, कमला हॅरिस यांच्या रॅलीत गर्दी दाखवण्यासाठी एआयची मदत घेतली होती. त्यामुळे हॅरिस यांना २०२४ च्या निवडणुकीतून अपात्र घोषित केले जावे. कारण बनावट प्रतिमा निवडणूकीत हस्तक्षेप आहे.

एका वृत्तानुसार, ट्रम्प गोपनीय सरकारी दस्तऐवज प्राप्त करण्यासाठी मार-ए-लागो इस्टेटमध्ये सर्च वॉरंट जारी करण्यासाठी अमेरिकी न्याय विभागावर १०० दशलक्ष डॉलरचा खटला दाखल करण्याची योजना आखत आहेत. माजी राष्ट्राध्यक्षांचे वकील ८ ऑगस्ट २०२२ रोजी मार-ए-लागोवर एफबीआयच्या छापेमारीदरम्यान विभागाच्या कार्यपद्धतीसाठी त्यांच्यावर खटला चालवण्याच्या विचारात आहेत. त्यांनी वर्गीकृत रेकॉर्ड ठेवल्याच्या आरोपाची केंद्रीय यंत्रणा चौकशी करत आहे.

अमेरिकेत राष्ट्राध्यक्ष निवडणुकीबाबत झालेल्या सर्वेक्षणात अमेरिकी अर्थवस्थेच्या प्रकरणात डोनाल्ड ट्रम्प यांच्या तुलनेत जास्त लोकांचा कमला हॅरिस यांच्यावर विश्वास आहे. फायनान्शियल टाइम्स आणि मिशिगन विद्यापीठाद्वारे केलेल्या सर्वेक्षणात आढळले की, ४२% मतदार आर्थिक मुद्द्यांवर हॅरिस यांच्यावर विश्वास ठेवतात. हे ट्रम्प यांच्यापेक्षा १ टक्का जास्त आहे. दुसरीकडे, ४१% लोकांना वाटते की, ट्रम्प अमेरिकी अर्थव्यवस्था रुळावर आणू शकतात.

## मुख्याध्यापकांनी केली दिव्यांग विद्यार्थ्याला नॉनव्हेज खाण्याची सक्ती, तक्रारीनंतर निलंबन

मेरठ

सरकारी शाळांमध्ये माध्यान्ह भोजन योजना चालवली जाते. या योजनेच्या अंतर्गत शाळेच्या मुख्याध्यापकांनी एका मुलाला सक्तीने नॉनव्हेज खाऊ घातल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणानंतर शाळेत मोठा गोंधळ उडाला. तसंच पोलिसांपर्यंत हे प्रकरण गेलं. ज्यानंतर या मुख्याध्यापकांना निलंबित करण्यात आलं आहे. माध्यान्ह भोजनात नॉनव्हेज खायला द्यायची सक्ती करण्याचा हा प्रकार उत्तर प्रदेशातल्या मेरठ या ठिकाणी घडला आहे. शाळेचे मुख्याध्यापक मोहम्मद इकबाल यांनी शाळेत मुलांसाठी नॉनव्हेज मागवलं आणि ते एका मुलाला खाऊ घातलं. हा मुलगा दिव्यांग आहे. या मुलाने त्याच्या तक्रारीत सांगितलं की सर मला म्हणाले आज भाजी चांगली नाही. त्यामुळे नॉनव्हेज मागवा.